म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
[illegible] विभाग.
वा. क्र. ४०६२ दिनांक ......
विषय ..ना.य..९.१.. क्र. ..........

# दिवाकरांच्या नाट्यछटा

ख, त्याचप्रमाणें आशा, निराशा, संताप, उद्वेग, तिरस्कार इत्यादि मनोविकार करणारा वाङ्मयप्रकार सांपडला. स्वतः दिवाकर भिडस्त, आपले अंतर्यामींचे विचार सहसा बोलून दाखवायचे नाहींत. परंतु ब्राउनिंगच्या मॉनूलॉगमध्यें ऱ्या व्यक्तीचा बुरखा घेऊन आपले विचार, मनोविकार आणि तत्त्वज्ञान जगापुढें ची त्यांना मोठी सोय सांपडली. १९११ सप्टेंबर तारीख १८ रोजीं दिवाकरांनीं ली नाट्यछटा लिहिली. या आणि याच्या पुढच्या दोन वर्षांत दिवाकरांवर स्फूर्ति- ची बहाल मर्जी होती. नाट्यछटांचें चार-पंचमांश लेखन या काळांतच झालें. ीन वर्षांचा हा लेखनकाल म्हणजे दिवाकरांच्या प्रतिभेचा वसंतऋतुच होय.

ोलिस सुपरिंटेंडंटच्या कचेरींतील नौकरी सुटल्यावर १९१२ जून पासून दिवाकर ड क्रासेस मिशनच्या सेंट्रल प्रायमरी स्कूलमध्यें दरमहा १५ रुपये पगारावर क्षकाचें काम करूं लागले. तेथेंच त्यांना १९१४ ज्यान्युअरीमध्यें दरमहा २० पगारावर असिस्टंट हेडमास्तर नेमलें. नंतर १९१५ च्या जुलै महिन्यांत ना आणखी तीन रुपये पगारवाढ होऊन ते या प्रायमरी स्कूलचे हेडमास्तर ाले. पण लवकरच नोव्हेंबरमध्यें त्यांनीं नौकरीचा राजीनामा दिला. पुढें चार हेने दुसऱ्या नौकरीच्या शोधांत भणभण-वणवण करून १९१६ मार्चपासून नूतन राठी विद्यालयांत प्रथम पंधरा रुपये, पण लवकरच दरमहा वीस रुपये पगारावर ांनीं शिक्षकाची नौकरी पत्करली. एस. टी. सी. परीक्षा पास झाल्यावर १९१६ र्चनंतर त्यांना दरमहा तीस रुपये पगार मिळूं लागला. आतांपर्यंत अतिशय ार्थिक अडचणींत, कष्टानें, कसे तरी दिवस काढले. १९१६ मध्यें झुंजुमुंजु होतें न तें तोंच ९ ऑगस्ट १९१७ गुरुवार रोजीं बाळंतरोगानें दिवाकरांची पत्नी कालवश ली. प्रो. रानड्यांनीं म्हटल्याप्रमाणें पत्नीचा वियोग हा त्यांना मोठाच धक्का बसला. न्माचा सोबती नाहींसा झाल्यावर त्यांचें हळवें मन खचलें. चितेवरील निखाऱ्या- कडे निश्चलतेनें पाहात असतांना ते म्हणाले, " सुटली बिचारी! माझें अर्धें आयुष्य आज कमी झालें!"

१९११ मध्यें रामनवमीला शेक्सपिअर वाचून पुरा झाला. त्याच्याआधींच मोलीएर वाचायला सुरुवात केली होती. टॉलस्टॉयचे ग्रंथ वाचायचा उपक्रम याच र्षी केला.

१९१२ ज्यान्युअरी तारीख १४ या दिवशीं दिवाकरांनीं केशवसुतांचीं काव्यें . तेव्हांपासून त्यांचें केशवसुतांवर जें प्रेम बसलें तें त्यांच्या आयुष्याच्या

अखेरच्या दिवसापर्यंत वाढत गेलें. केशवसुतांचीं काव्यें नीट छापून निघावीं याबद्दल त्यांनीं आपल्या जिवाचें रान केलें. हरिभाऊ आपटे आणि केशवसुतांचे कनिष्ठ बंधु सीतारामपंत दामले या दोघांनींही या बाबतींत दिवाकरांची निराशा केली. वासुदेवराव पटवर्धनांप्रमाणेंच केशवसुतही दिवाकरांचे जिवाभावाचे मित्र. दोघे सारखेच दुर्दैवी. परिस्थितीच्या कचाट्यांत सांपडून दोघेही होरपळून निघाले. केशवसुतांची जशी दुर्दम्य महत्त्वाकांक्षा तशीच दिवाकरांची. प्रो. पटवर्धन त्यांच्याकडे पाहून विनोदानें म्हणत : " अहो काय समजलां आहांत तुम्ही ? आम्हांला इंटरनॅशनल रेप्युटेशन पाहिजे आहे ! नुसत्या हिंदुस्थानांत नांव मिळवून भागणार नाहीं. " केशवसुत कांहींतरी अभिनव लिहीत होते. त्यांनी " स्वहृदय फाडुनि निज-नखरीं गोफण केली छान ! " दिवाकरांचें तसेंच अभिनव लिखाण. पण आपलें शिक्षण कमी. समाजांत आपल्याला दर्जा नाहीं. आपल्यांत उच्च प्रकारची लेखन-कला असून, या जगाच्या बाजारांत तिला मोल नाहीं, या विचारांनीं ते खिन्न होत. येथेंही त्यांचें केशवसुतांशीं साम्य दिसून येतें. केशवसुतांप्रमाणेंच मरण पावलेल्या आपल्या आशांच्या चितांवरून आपण पिशाच्चरूपानें जगांत वावरत आहोंत असें दिवाकरांनाही कधीं कधीं वाटत असे. अर्थात् हें सर्व लक्षणेनेंच खरें आहे.

१९१३ सालीं दिवाकरांनीं इब्सन्, गाल्झवर्दी, मेटरलिंक, हाउप्टमान वगैरे नाणावलेल्या ग्रंथकारांचीं नाटकें वाचलीं. इबसन्च्या लिखाणानें त्यांच्या मनाची एकदम पकड घेतली. एप्रिलच्या १९ तारखेस इब्सनचें ' अ डॉल्स हाउस ' हें नाटक संपविलें. त्या दिवशींच्या रोजनिशींत " नाटकाचा शेवट वाचून सारा दिवस डोकें भणभणत होतें. सारखा शेवटचा प्रवेश डोळ्यांपुढें येत होता ! " असें दिवाकरांनीं लिहिलें आहे. इब्सन्च्या नाटकाप्रमाणेंच दिवाकरांना मेटरलिंकचीं नाटकेंही प्रिय असत. आणखी किती तरी पुस्तकें दिवाकरांनीं या वर्षीं वाचलीं ! त्या सर्वांची यादी येथें देणें शक्य नाहीं.

दिवाकरांना जितकी वाचनाची आवड, तितकीच—किंबहुना जास्तच—त्यांना वाङ्मयचर्चेची हौस असे. श्री. अण्णासाहेब कारखानीस, प्रोफेसर श्रीधरपंत रानडे, गडकरी, बालकवि ठोमरे, अनंततनय, लंभे, गोविंदराव कानिटकर, प्रोफेसर लेले-शास्त्री, प्रा. श्रीकृष्ण नीलकंठ चाफेकर इत्यादि साहित्यभक्तांची ते वारंवार गांठ घेत आणि त्यांच्याशीं काव्य, नाटक, कादंबरी वगैरे विषयांची मनमोकळेपणानें चर्चा करीत. इबसन्, टॉलस्टॉय, मेटरलिंक यांचे ग्रंथ वाचीत असतां त्यांना आपल्या

दारुण परिस्थितीचा विसर पडे.

याशिवाय श्री. नरसिंह चिंतामण केळकर, हरिभाऊ आपटे वगैरे मंडळींच्याकडे दिवाकरांचे जाणें–येणें असे. केळकरांच्या अभिजात रसिकतेमुळें नाटयछटांना प्रथम 'केसरी'त प्रसिद्ध होण्याचा मान मिळाला आणि दिवाकरांच्या इच्छेप्रमाणें 'केसरी'त प्रसिद्ध झालेल्या १० नाटयछटांबद्दल केळकरांनीं त्यांना रु. ७ मोबदलाही दिला. याच वर्षी नोव्हेंबरमध्यें हरिभाऊ आपटयांनीं दिवाकरांची ता. ७ नोव्हेंबर ही केशवसुतांवरची नाटयछटा करमणुकींत प्रसिद्ध केली.

१९१३ नंतर नाटयछटांचें लेखन मागें पडलें. मग शौकांत हा नवीन नाट्याचा प्रकार दिवाकरांनी १९१३ मध्येंच लिहिला. १९१४ सालीं "मी माझ्याशीं" ही नाट्यसंवादांची लेखमाला सुरू केली. पाऊस, निजलेलें मूल, सुट्टी! शाळेला सुट्टी!!, ती विचारी रडतेच आहे! हे सर्व नाटयप्रसंगही १९१४ मध्येंच लिहिले. कारकून नाटक या वर्षीच संपविले. पुढच्या वर्षी १९१५ सालीं–'सगळेच आपण ह्यः! ह्यः' आणि 'ऐट करूं नकोस!' या नाटिका लिहिल्या. हें सर्व लिखाण नाटयाच्या धर्तीवरच पण नाट्यछटांपेक्षां थोडेंसें निराळें. नाटयछटांइतकेंच तें चांगलें आहे, असें म्हणणें धाष्टर्याचें होईल. सगळेच आपण ह्यः ह्यः!, ऐट करूं नकोस!, कारकून, आय. सी. एस. (अप्रकाशित) अशा आणखी कांहीं नाटिका दिवाकरांनीं लिहिल्या आहेत. या दिशेनें त्यांनीं अधिक परिश्रम केले असते तर त्यांना नाटिकांत नाटयछटाप्रमाणेंच सुयश मिळवितां आलें असतें. १९१६ मध्यें दिवाकरांनीं मेटरलिंकच्या 'द साइटलेस' (Les Aveugles) या नाटयकृतीचें रूपांतर केलें. परंतु या रूपांतरावरून त्यांनीं पुनः आपला हात फिरविलेला दिसत नाहीं.

१९१८ पासून दिवाकरांची सांपत्तिक स्थिती सुधारत चालली. नूतन मराठींत दाखल झाल्यानंतर ते प्रथमच इंग्रजी शिकवायला लागले. श्री. आचार्य आणि केशवराव साने या सुप्रसिद्ध शिक्षकांनी दिवाकरांना इंग्रजी शिकविण्याच्या प्रत्यक्ष पद्धतीची माहिती करून दिली आणि नूतन मराठींत पहिल्या तीन इयत्तांना प्रत्यक्ष पद्धतीने इंग्रजी शिकवूनच दिवाकरांनीं इंग्रजीचे आदर्श शिक्षक असा लौकिक मिळविला. शाळेचे मुख्याध्यापक प्रिन्सिपल सबनीस, प्रोफेसर पोतदार, तसेच सरकारी तपासनीस—सर्वांनीच दिवाकरांच्या शिकविण्याच्या हातोटीबद्दल प्रशंसोद्गार काढले आहेत. नूतन मराठी विद्यालयांत त्यांना १९२२ सालीं दरमहा रु. ४५ पगार मिळायला लागला.

## १४ : दिवाकरांच्या नाट्यछटा

१९१८ ते १९२२ या कालखंडांत दिवाकरांनीं ऑस्कर वाइल्ड, पुशकिन, पिनिअरो, गॉर्कि वगैरे लेखकांचे ग्रंथ वाचले. स्नेह्यांच्या गांठीभेटी, वाङ्मयचर्चा हा पूर्वीचा कार्यक्रम चालू होताच. अण्णासाहेब कारखानीस, प्रोफेसर माटे, प्रोफेसर रानडे हे जुने स्नेही. १९१८ नंतर प्रोफेसर लागू., श्री. केशवराव दाते वगैरे नव्या स्नेह्यांची ओळख झाली. रविकिरण मंडळाचेही ते सदस्य होते आणि मंडळाच्या रविवारच्या वाङ्मयचर्चेत ते आनंदाने भाग घेत असत. १९१६ ते १९२२ या सहा वर्षांच्या अवधींत दिवाकरांनीं नवीन असें कांहीं लिहिलें नाहीं. पूर्वी लिहिलेल्या नाटयछटा सुधारून, त्यांना उजळा देऊन, 'उद्यान 'मासिकांत आणि 'ज्ञानप्रकाशांत' छापायला दिल्या. 'उद्यान 'चे कुळकर्णी एका छटेला एक रुपया याप्रमाणें दिवाकरांना मोबदला देत असत.

१९२१ ऑक्टोबर ता. २६ रोजी प्रिन्सिपल पटवर्धन निवर्तले. पत्नीच्या मृत्यु-प्रमाणेंच पटवर्धनांच्या मृत्यूमुळेंहि दिवाकरांना अतोनात दुःख झालें.

दिवाकरांच्या आयुष्याच्या अखेरच्या आठ वर्षांत १९२३ ते १९३१ पर्यंत दिवाकरांचा पगार सारखा वाढत गेला. मृत्युसमयीं त्यांना दरमहा रु. ७० मिळत होते.

आर्थिक परिस्थिती सुधारल्यामुळें दिवाकरांना पुस्तकें घ्यायची, त्याप्रमाणेंच त्यांच्या आवडत्या ग्रंथकाराचे फोटो घ्यायची सवय झाली. शेवटच्या आठ वर्षांत बॅरी, ए. ए. मिलन, ड्रिंकवॉटर, कॅथरिन, मॅन्सफील्ड वगैरे लेखकलेखिकांचीं पुस्तकें वाचून त्या पुस्तकांवरचे टीकावाङ्मयही दिवाकरांनीं वाचून काढलें. आधुनिक मराठी सारस्वत आणि शिक्षणशास्त्रावरचे नवीन ग्रंथ पण ते काळजीपूर्वक वाचीत.

आठ वर्षांच्या या अवधींत जुन्या स्नेह्यांची कवी गिरीश आणि यशवंत, प्रोफेसर माधवराव पटवर्धन, प्रोफेसर गोडे, डॉ. डी. एल. सहस्रबुद्धे इत्यादि मंडळींची मैत्री कायम राहून शिवाय श्री. वासुदेवराव भोळे, श्री. के. नारायण काळे, 'रत्नाकरा 'चे गोखले बंधु इत्यादि मंडळी दिवाकरांचे नवे स्नेही झाले. या सर्वांच्या घरीं जाऊन आणि कधीं कधीं यांना आपल्या घरीं बोलावून दिवाकर आनंदानें काल-क्रमणा करीत.

१९२३ ते १९३१ या आठ वर्षांच्या काळांत दिवाकरांनीं दहा नाटयछटा लिहिल्या. एकदोन अपवाद सोडून दिले तर या अखेरच्या नाट्यछटा दिवाकरांच्या परिणतप्रज्ञेची साक्ष देतात असें म्हणायला हरकत नाहीं. अंतरींची जळजळ, तळमळ

निमाली असली तरी सूक्ष्म निरीक्षण, भाषेची सफाई, मॉन्लॉगचें तंत्र, उत्कृष्ट विडंबन या बाबतींत पूर्वीच्या छटांपेक्षां अखेरच्या छटा कांकणभर सरस भरतील हें निर्विवाद होय. शेवटीं दिवाकरांनीं 'अहो ! मला वाचतां येतंय !, कमीचा मन्या, मसालेदार ताजा चिवडा ' वगैरे पांचसहा भावकथा लिहिल्या. रचनेच्या दृष्टीने या कथा कदाचित् हिणकस ठरतील. परंतु त्यांना भावनेचा ओलावा आहे. यामुळें हळुवार अंतःकरणाच्या वाचकाला या कथा नाटयछटांपेक्षां अधिक मनोहर वाटतील.

'रत्नाकर' मासिकाच्या गोखले बंधूंचें दिवाकरांच्यावर अलोट प्रेम असल्यामुळें दिवाकरांचें अखेरचें जवळजवळ सर्वच लिखाण–नाटयछटा, नाटयसंवाद, नाटिका व छोटया गोष्टी–'रत्नाकरां'त छापून निघाल्या. प्रो. पोतदारांनीं 'साहित्य सोपानां'त त्यांच्या दोन नाटयछटा घेतल्या. तेव्हां त्यांना अपरिमित समाधान झालें. आतां आपल्याला लेखक म्हणून लोक मान द्यायला लागले. लवकरच आपण विश्वविद्यालयाचे परीक्षक होऊं अशी त्यांना उमेद वाटूं लागली. निरनिराळ्या मासिकांत छापलेल्या नाटयछटा एकत्र करून त्यांचें स्वतंत्र पुस्तक काढायच्या तयारीला ते लागले. आरंभींच्या कांहीं छटांच्या–स्वतःच्या सुंदर, वळणदार अक्षरांत–त्यांनीं नकला पण केल्या. चारदोन वर्षांनीं शिक्षकाचा व्यवसाय सोडून देऊन, उर्वरित आयुष्यांत कांहीं तरी नवीन तेजस्वी लिखाण प्रसिद्ध करायचें अशा सुखमय संकल्पानें त्यांची कळी उमलायला लागली. घरच्या मंडळींना त्यांच्या या आनंदित वृत्तीचें कौतुक वाटलें. परंतु अगदीं निःशेष मालवण्यापूर्वी दिव्याची ज्योत जशी विशेषच चमकते तशी ही दिवाकरांची हर्षित वृत्ति. १९३१ सप्टेंबरमध्यें त्यांना इन्फ्लुएंझाचा ताप आला आणि लगेच ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या तारखेस ते कालवश झाले.

## दोन

आपल्या आयुष्याच्या बेचाळिसाव्या वर्षी दिवाकर वारले. याबद्दल आपणां सर्वांना साहजिकच खेद होतो. तथापि ६०, ७०, ८० वर्षें यापेक्षांही ज्यांचें वय अधिक आहे त्यांनीं कांहीं कामगिरी केली असली तर उत्तम, नाहीं 'तर कालः क्रीडति गच्छत्यायुः ' या शांकरोक्तीप्रमाणे आयुष्याची गणना करीत जिवंत राहण्यांत काय तात्पर्य ?

# १६ : दिवाकरांच्या नाट्यछटा

हें झालें दिवाकरांच्या कीर्तिदेहासंबंधीं. खासगी बाबतींतसुद्धा दिवाकरांचें चरित्र स्पृहणीय होतें. त्यांच्या बोलण्याचालण्यांत वागण्यांत दुटप्पीपणा सांपडायचा नाहीं— कोणच्याही व्यवहारांत त्यांचा कांटेकोर प्रामाणिकपणा दिसून येत असे. पुस्तकें विकत घ्यायचीं तीं रोखीनें, आणि कोणाकडून पुस्तकें वाचायला आणलीं तर तीं नियमानें परत करायचीं. सरळ, साधा, एकमार्गी असा त्यांचा स्वभाव. एखाद्यावर निष्ठा ठेवली कीं ती कायम. कधींसुद्धां त्यांत बदल व्हायचा नाहीं. अण्णासाहेब कारखानीस, प्रोफेसर वासुदेवराव पटवर्धन, केशवसुत, प्रोफेसर श्रीधरपंत रानडे या सर्व व्यक्ति दिवाकरांच्या एकांतिक निष्ठेचीं उदाहरणें म्हणून देतां येतील. बारीकसारीक गोष्टींत-सुद्धां या त्यांच्या एकमार्गी, निष्ठावंत स्वभावाचें प्रत्यंतर दिसून येई. काळे बाइंडर-कडे पुस्तकें बांधायला द्यायचीं आणि नारायणदास छबिलदास यांच्या दुकानीं टोपी विकत घ्यायची.

घरांतील माणसांना त्याप्रमाणेंच त्यांच्या मित्रांना, शाळेंतील सहकाऱ्यांना आणि वर्गांतील मुलांना दिवाकरांच्या एकमार्गी, स्वावलंबी, सरळ स्वभावाची ओळख पटायला वेळ लागत नसे. त्यांच्या पत्नीवर त्यांचें अत्यंत प्रेम होतें. तिला बिचारीला दिवाकरांच्या शेक्सपिअरब्राउनिंगचा गंधही नव्हता. पण दिवाकरांनीं तिच्या अज्ञानाची कधीं कींव केली नाहीं आणि तिला कधीं एक वावगा शब्द ते बोलले नाहींत. पत्नी आणि दोन अपत्यें निवर्तल्यावर काळानें शिल्लक ठेवलेल्या एकुलत्या एक कन्येवर त्यांचा सर्व जीव होता. असें हें त्यांच्या प्रेमाचें एकांतिक स्वरूप. स्वावलंबनाचीही तीच तऱ्हा. आपले कपडे आपण धुवायचे आणि आपलें ताट आपण उचलायचें.

शाळेंत शिकवितांना त्यांची अशीच 'टीपबंद' वागणूक असे. कितीही वेळां धडा शिकविला असला तरी त्याचीं टिपणें केल्याशिवाय ते वर्गांत पाऊल टाकायचे नाहींत. नेमल्या वेळीं शाळेंत जायला निघायचे. प्रत्यक्ष पद्धतीनें इंग्रजी शिकवायचें म्हणजे शिक्षकाला फार श्रम पडतात. दिवाकरांनीं या बाबतींत कधींच अंगचुकार-पणा केला नाहीं. तसेंच शिकविण्याच्या पद्धतींत नवीन झालेल्या सुधारणा आपल्याला कशा आत्मसात् करतां येतील याबद्दलही ते जागरूक असत.

पराकाष्ठेचा प्रामाणिकपणा, शिस्त आणि स्वावलंबन या गुणांप्रमाणेंच दृढनिश्चय हाही दिवाकरांच्या स्वभावाचा एक अनुकरणीय विशेष होता.

दिवाकरांना आपलें शिक्षण अपुरें आहे याची जाणीव होती; पण सतत वाचनानें

आणि कवि, नाटककार, विद्वन्मान्य प्रोफेसरमंडळी यांच्या सहवासानें आपण ती भरून काढूं असा त्यांना भरंवसा वाटे. सर्व तऱ्हेच्या व्याख्यानांना आणि साहित्य-विषयक संमेलनांना ते हजर असत. हेतु हा कीं उत्तम वाङ्मय कशाला म्हणतात, निर्दोष लिखाणाचीं लक्षणें कोणतीं तीं आपल्या नीट ध्यानांत यावीं आणि जगद्वंद्य लेखकांनीं चोखाळलेल्या मार्गानें जाऊन आपणही आपलें लिखाण निर्दोष करावें. दिवाकरांना कोणीं त्यांची चूक दाखवून दिली तर त्याचा त्यांना राग येत नसे. आपल्या चुकीची ते आनंदानें दुरुस्ती करीत.

दिवाकर नम्र, आणि विनयशील, तसेच करारी, बाणेदार आणि स्वाभिमानी होते.

आपल्या योग्यतेचें चीज होत नाहीं हें शल्य त्यांना सारखें बोंचत असे. आपल्यांत जो एक अभिनव लिखाणाचा विशेष गुण आहे त्याचा लोकांनीं गौरव करावा, विद्वज्जनांनीं आपल्याकडे सहानुभूतीनें पाहून आपल्या लिखाणाचा परामर्श घ्यावा याकरतां ते भुकेले असत. आणि हें जमत नाहीं याचें कारण आपलें एस्. एफ्. पर्यंतचें शिक्षण, आणि आपला मास्तराचा हीन दर्जा आणि दारिद्र्य अशी त्यांची समजूत, आणि ती खरी होती. मी नुसता मास्तर म्हणून मरणार नाहीं असें ते म्हणत. त्यांतील रहस्य हेंच. दिवाकरांना केवळ शिक्षक म्हणून जगायचें नव्हतें. त्यांना नामांकित ग्रंथकार असा लौकिक मिळवायचा होता.

‘ केसरीं ’त नाट्यछटा प्रसिद्ध झाल्या तेव्हां आकाशांत भरारी मारणाऱ्या या पतंगाला दिव्यानंदाचा एक क्षणभर अनुभव आला. पण तें वैभव फार वेळ टिकलें नाहीं. दुर्दैवानें त्यांना खालीं ओढलें. पुढें त्यांनीं नाट्यसंवाद लिहिले ते त्यांचे त्यांनाच पसंत पडले नाहींत. नाटिकांचा व्हावा तितका बोलबाला झाला नाहीं.

स्वच्छता, नीटनेटकेपणा, टापटीप, व्यवस्थितपणा या सर्व गुणांचें दिवाकर एक चालतेंबोलतें प्रतीकच होते. खोलींत जें कांहीं थोडें सामान असे – पुस्तकांचीं चार-दोन कपाटें, आपल्याला आदरणीय वाटणाऱ्या पुरुषांचे फोटो, छोटेंसें एक मेज आणि त्याच्यावरचें लेखनसाहित्य – टोंक केलेली पेन्सिल, स्वच्छ दौत आणि टांक – यांपैकीं कोणत्याही वस्तूवर एकही धुळीचा कण पडूं नये म्हणून कोण दक्षता ! यामुळें खोलींत शिरणाऱ्या माणसाची स्थिति चमत्कारिक होई. आपण बरोबर आणलेल्या धुळीमुळें हें पवित्र विद्यामंदिर दूषित व्हायचें नाहीं ना अशी त्याला भीति वाटे. आणखी एक गोष्ट म्हणजे कपाटावर चिकटवलेल्या – कृपा करून पुस्तकें मागूं

नयेत – अशा अर्थांच्या चिठ्या.,या चिठ्या पाहिल्या म्हणजे त्यांच्याकडे येणारे त्यांचे मित्रसुद्धां थोडे बिचकत असत.

## तीन

दिवाकरांच्या मित्रमंडळींचा परिवार फार मोठा होता. निरनिराळ्या आपल्या मित्रांशीं कसें वागायचें याच्याही मर्यादा त्यांनीं ठरवून टाकल्या होत्या. प्रोफेसर मंडळी, श्री. हरिभाऊ आपटे, श्री. नरसिंह चिंतामण केळकर आणि इतर अशाच त्यांच्याहून जरा श्रेष्ठ दर्जाच्या मित्रांशीं बोलतांना चुकूनसुद्धां आपला अपमान होऊं नये आणि आपल्यांत जें लेखनाचें कसब आहे त्याची या मंडळींकडून बूज व्हावी अशा बेतानें ते आपलें धोरण आंखीत.

अण्णासाहेब कारखानीस, वासुदेवराव भोळे, केशवराव दाते वगैरे मित्रांशीं बोलतांना आणि वागतांना त्यांना यत्किंचित् संकोच वाटत नसे. नट, नाट्य, नाटक हे त्यांचे जिव्हाळ्याचे विषय. या विषयांची चर्चा करीत असतां कारखानीस, दाते, भोळे वगैरे त्यांच्या स्नेह्यांना ते आपले विचार आणि अनुभव मोकळेपणानें सांगत. एका समाजाच्या पातळीवरून ही चर्चा होत असल्यामुळें अशा प्रसंगीं दिवाकरांच्या मनांतलीं अंतस्थ दालनें खुलीं होत. दिवाकरांच्या मित्रांचा हा दुसरा वर्ग.

तिसरा त्यांच्या मित्रांचा वर्ग म्हणजे बाळाभाऊ सहस्रबुद्धे, डॉ. राहतेकर, श्री. त्रिंबकराव पंडित वगैरे मंडळी. प्रो. पोतदारांना याच वर्गांत घालतां येईल. येथें नाट्य नाहीं आणि छटाही नाहीं. या मंडळींचा आणि दिवाकरांचा बाळपणापासूनचा स्नेह. दिवाकरांच्या लिखाणाबद्दल व त्यांनीं मिळविलेल्या लौकिकाबद्दल या त्यांच्या मित्रांना आदर आणि समाधान वाटे. परंतु दिवाकर ही व्यक्ति त्यांना अधिक प्रिय होती.

धार्मिक बाबतींत संध्या, देवपूजा वगैरे गोष्टींना ते महत्त्व देत नसत. पण त्यांची ईश्वरावर अढळ श्रद्धा होती. दरवर्षीं ज्यान्युअरीच्या पहिल्या तारखेस ते नियमानें परमेश्वराचें नामस्मरण करीत. शेक्सपिअर वाचून झाला तेव्हां ते ईश्वराला शरण गेले. ईश्वरावर जशी अढळ श्रद्धा तशीच नीतीवरची त्यांची श्रद्धा अचल होती. नैतिकदृष्ट्या त्यांचें चारित्र्य निष्कलंक होतें.

## चार

दिवाकरांना कल्पनाशक्तीची देणगी होती आणि भावनावश व्हायलाही त्यांना वेळ लागत नसे. एखादी साधी गोष्ट जरी त्यांच्या मनाविरुद्ध झाली तरी त्यांना अतिशय दुःख होत असे. तशीच एखादी साधी गोष्ट त्यांच्या मनाप्रमाणें झाली म्हणजे त्यांना धन्यता वाटे. राईचा पर्वत करायची ही करामत कल्पनाशक्तीची. वाङ्मयाच्या सृष्टींत या करामतीचें आपण कौतुक करतों. पण खऱ्या सृष्टीमध्यें कल्पनाशक्तीची ही देणगी असल्यामुळें दिवाकरांना असह्य क्लेश होत. आपल्याला पंधरा रुपये पगार, कुटुंबांतील माणसांचे आपण एकटेच पोशिंदे. अशा स्थितींत डोळे विघडले. झालें. आंधळेपण आल्यानंतरच्या स्वतःच्या आणि स्वतःवर अवलंबून असलेल्या कुटुंबाच्या भावी दुर्दशेचें भयानक चित्र कल्पनाशक्तीनें रंगविलें. आपण दरिद्री, आपल्या पत्नीची हौस आपल्याला पुरवितां आली नाहीं, तेव्हां आपलें आयुष्य म्हणजे नरकच अशी त्यांनीं आपल्या मनाची समजूत करून घेतली. पत्नी वारली त्या दिवशींच्या रोजनिशींत — एक दुर्दैवी प्राणी या नरकांतून सुटला म्हणायचा — असें लिहून ठेवलें. एकदां — १९१८ सप्टेंबर तारीख १६ रोजीं — ते घराच्या बाहेर निघाले आणि त्यांना दोन सवाष्णींचीं प्रेतें दिसलीं — तेव्हां कशाचें लिहिणें आणि वाचणें ! हे शेवटले त्यांचेच रोजनिशींतले शब्द.

दिवाकरांची भावनावशता आणि कल्पनाशक्तीची देणगी याचाच एक परिणाम म्हणजे त्यांचा गूढवादाकडे असलेला कल. सान्तापलीकडलें अनंत, दृश्य जगाच्या पाठीमागें असलेलें अदृश्य तत्त्व याची त्यांना जाणीव होती. या बाबतींत ब्राउनिंगपेक्षां वर्ड्स्वर्थ, मेटरलिंक्, केशवसुत हेच त्यांचे गुरू होत. हें काय उगीचच ? ही छटा आणि दिवा मोठा कसा झाला !, आले कोठून गेले कोठें...? ह्या गोष्टी वाचल्या म्हणजे दिवाकरांचा सृष्टींतील गूढरहस्यांवर विश्वास होता हें आपल्या ध्यानात येतें.

कल्पनाशक्तीची देणगी आणि सहज भावनावश होणारें हृदय, तिसरी गोष्ट म्हणजे नाट्यकलेची जन्मतःच असलेली आवड. श्री. भालचंद्रपंत सहस्रबुद्धे यांनीं आपल्या 'ज्योत्स्ने'मधल्या लेखांत सांगितल्याप्रमाणें मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात, या न्यायानें दिवाकरांचें नाट्यावरचें प्रेम त्यांच्या बालपणींच्या खेळांतही दिसून येत असे. अकरा वर्षांचे असतांना ते आपल्या चारदोन मित्रांना घरीं बोलावून, खोलींत अंधार करून, एका लहानशा दिव्याच्या प्रकाशांत, कापलेल्या चित्रांचा

छोटासा सिनेमाप्रयोग दाखवीत. खेळाच्या शेवटीं त्यांच्याच प्रेरणेनें प्रयोग पाहायला जमलेली मंडळी खूप टाळ्या वाजवीत. पुढें शिक्षक झाले तेव्हां त्यांनीं मुलांसाठीं नाटक लिहिलें. शाळेच्या संमेलनप्रसंगीं स्वतः अनेक भूमिका यशस्वी करून दाखविल्या. डोळे अधू असूनसुद्धां त्यांना नाटकें पाहण्याचा मनस्वी नाद. अशा वेळीं बरोबर असणारे मित्र तेही बहुधा नट नाहींतर नाटककार.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांशीं दिवाकरांचा थोडासा परिचय होता. परंतु नाटककार किरातांचा व त्यांचा फार जुना स्नेहसंबंध. अण्णासाहेब कारखानीस तर घरचेच. कारखानिसांच्याकडे दिवसांतून एखादी खेप झाली नाहीं असें व्हायचेंच नाहीं. सुप्रसिद्ध नाटककार राम गणेश गडकरीही दिवाकरांना अत्यंत प्रेमळपणानें वागवीत. एकदां त्यांनीं दिवाकरांना " चला आपण सिनेमाला जाऊं " असें म्हटलें. जवळ पैसे नसल्यामुळें दिवाकर मागें घेताहेत हें गडकऱ्यांच्या लक्षांत आलें आणि ते म्हणाले, " अहो, पैसे माझे खर्च होतील इतकेंच ना ? पुण्यप्रभावाचे पैसे आतां मिळायचे आहेत ते कोणाच्या बापाचे ? " पुढें नाटककार श्री. औंधकर यांच्याशीं दिवाकरांची ओळख झाली आणि मग सरलादेवीचे कर्ते वासुदेवराव भोळे यांच्यांशीं. श्री. वासुदेवराव भोळ्यांचा आणि दिवाकरांचा स्नेह लवकर जमला आणि तो शेवटपर्यंत टिकला.

नटवर्य गणपतराव जोशी यांच्याबद्दल दिवाकरांना फार आदर वाटत असे. १९१३ जूनच्या १८ व्या तारखेस ते शाहूनगरवासी मंडळीच्या बिऱ्हाडीं गेले आणि रा. गणपतराव जोशी यांच्या चरणांवर मस्तक ठेवून त्यांनीं पुढीलप्रमाणें आपली कृतज्ञता व्यक्त केली : लहानपणीं आपलीं नाटकें पाहावयास मिळालीं तेव्हांपासून इच्छा ही कीं, शेक्सपिअरचीं नाटकें मुळांतून वाचून व्हावींत. ईश्वरकृपेनें सबंध शेक्सपिअर माझा अभ्यासून झाला आणि याला कारण आपण आहांत तेव्हां दर्शनार्थ आलों. रा. गणपतराव प्रसन्नपणें हंसले व पंधरावीस मिनिटें त्यांनीं आपल्याजवळ गादीवर मला बसवून घेतलें. ' गणपतराव जोश्यांच्या भेटीची ही हकीकत दिवाकरांनीं आपल्या रोजनिशींत लिहून ठेविली आहे. महाराष्ट्र नाटक मंडळीचे नामांकित नट श्री. भागवत यांच्याविषयींहि दिवाकरांची अशीच आदराची भावना होती. श्री. केशवराव दाते तर त्यांचे जिवलग मित्र.

## पांच

ब्राउनिंगच्या मॉनूलॉग्ज्‌वरून नाट्यछटा लिहायची कल्पना आपल्याला सुचली हें

दिवाकरांनीं स्वतःच सांगून टाकलें आहे. यामुळें नाट्यछटांच्या उगमाविषयीं कोणीं संशोधन करायची जरुरी उरली नाहीं. आणि मॉन्लॉग्ज् वाचल्यानंतर दिवाकरांनीं नाट्यछटा लिहायला प्रवृत्त व्हावें हेंही साहजिकच. कारण ब्राउनिंगची जशी नाटयाकडे प्रवृत्ति होती तशीच दिवाकरांची नाटयानुकूल वृत्ति.

दिवाकरांनीं ब्राउनिंग वाचला असला तरीं आपल्याला काय झेपेल, काय पचेल याची त्यांना जाणीव होती. स्वतःच्या बुद्धिमत्तेच्या मर्यादा ते ओळखून होते. ब्राउनिंगचीं मोठीं नाटयगीतें आपल्या आवांक्याबाहेरचीं हें त्यांना केव्हांच समजलें असलें पाहिजे. म्हणूनच त्यांनीं ब्राउनिंगच्या छोटया नाटयगीतांचें अनुकरण केलें. अर्थात् नाटयगीताच्या तंत्रापुरतीच ही उसनवारी. आपल्या अनुभवांची आणि विचारांची नाटयाच्या पद्धतीनें आणि कलात्मक मांडणी कशी करावी हें त्यांना ब्राउनिंगनें शिकविलें. मूळची त्यांची वृत्ति नाटयप्रवण असल्यामुळें ब्राउनिंगच्या नाटयगीतांच्या धर्तीवर लिहिलेल्या त्यांच्या नाटयछटा यशस्वी झाल्या. The seed fell on fertile soil. काव्य करायची देणगी नसल्यामुळें दिवाकरांनीं आपल्या नाटयछटा गद्यांतच लिहिल्या. ब्राउनिंगच्या छोटया नाटयगीतांचें हें अनुकरण असल्यामुळें, प्रो. पटवर्धनांनीं त्यांना दिलेलें नाटयछटा हें नांव अत्यंत समर्पक होय.

अशा तऱ्हेनें ब्राउनिंगच्या नाटयगीताच्या पद्धतीचें दिवाकरांनीं अनुकरण केलें यांत दिवाकरांना कसलाच कमीपणा नाहीं. " प्रवर्तितो दीप इव प्रदीपात् " हा योगायोग. वाङ्मयाच्या इतिहासांत दोन निरनिराळ्या ग्रंथकारांची अनपेक्षित भेट होते आणि एकाचें काव्य दुसऱ्यानें वाचलें म्हणजे त्याची स्वतःची सुप्त प्रतिभा जागृत होते. आपले सध्यांचे राजकवि मेसफील्ड यांनीं चॉसरची कविता वाचल्यावरोबर त्यांची प्रतिभा प्रज्वलित झाली. वर्ड्स्वर्थच्या वहिणीने त्याला सहज एकदां मिल्टनचीं सुनीतें वाचून दाखविलीं. त्या दिवशींच वर्ड्स्वर्थनें मिल्टनच्या धर्तीवर सुनीतें लिहायला सुरुवात केली, आणि पुढें त्यानें जवळजवळ ५०० सुनीतें लिहिलीं. ब्राउनिंगचीं नाटयगीतें वाचून दिवाकरांना नाटयछटा लिहायची स्फूर्ति झाली, याचा अर्थ इतकाच कीं ब्राउनिंगनें त्यांना एक सांचा करून दिला, रूपरेषा आंखून दिली, किंवा एक चित्राची चौकट तयार करून दिली. परंतु या चौकटींत बसविलेलें मनोहर चित्र दिवाकरांनीं आपल्या स्वतंत्र प्रतिभेनेंच काढलेलें आहे. चौकट आणि चित्र यांना परस्पर महत्त्व किती द्यावयाचें हें सुज्ञ वाचकाला सांगायला नकोच.

जगाचें ज्ञान मर्यादित, स्वतःचे अनुभव मर्यादित, शिक्षण बेताबेताचें, तथापि

छोटासा सिनेमाप्रयोग दाखवीत. खेळाच्या शेवटीं त्यांच्याच प्रेरणेनें प्रयोग पाहायला जमलेली मंडळी खूप टाळ्या वाजवीत. पुढें शिक्षक झाले तेव्हां त्यांनीं मुलांसाठीं नाटक लिहिलें. शाळेच्या संमेलनप्रसंगीं स्वतः अनेक भूमिका यशस्वी करून दाखविल्या. डोळे अधू असूनसुद्धां त्यांना नाटकें पाहण्याचा मनस्वी नाद. अशा वेळीं बरोबर असणारे मित्र तेही बहुधा नट नाहींतर नाटककार.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांशीं दिवाकरांचा थोडासा परिचय होता. परंतु नाटककार किरातांचा व त्यांचा फार जुना स्नेहसंबंध. अण्णासाहेब कारखानीस तर घरचेच. कारखानिसांच्याकडे दिवसांतून एखादी खेप झाली नाहीं असें व्हायचेंच नाहीं. सुप्रसिद्ध नाटककार राम गणेश गडकरीही दिवाकरांना अत्यंत प्रेमळपणानें वागवीत. एकदां त्यांनीं दिवाकरांना " चला आपण सिनेमाला जाऊं " असें म्हटलें. जवळ पैसे नसल्यामुळें दिवाकर मागें घेताहेत हें गडकऱ्यांच्या लक्षांत आलें आणि ते म्हणाले, " अहो, पैसे माझे खर्च होतील इतकेंच ना ? पुण्यप्रभावाचे पैसे आतां मिळायचे आहेत ते कोणाच्या बापाचे ? " पुढें नाटककार श्री. औंधकर यांच्याशीं दिवाकरांची ओळख झाली आणि मग सरलादेवीचे कर्ते वासुदेवराव भोळे यांच्याशीं. श्री. वासुदेवराव भोळ्यांचा आणि दिवाकरांचा स्नेह लवकर जमला आणि तो शेवटपर्यंत टिकला.

नटवर्य गणपतराव जोशी यांच्याबद्दल दिवाकरांना फार आदर वाटत असे. १९१३ जूनच्या १८ व्या तारखेस ते शाहूनगरवासी मंडळीच्या बिऱ्हाडीं गेले आणि रा. गणपतराव जोशी यांच्या चरणांवर मस्तक ठेवून त्यांनीं पुढीलप्रमाणें आपली कृतज्ञता व्यक्त केली : लहानपणीं आपलीं नाटकें पाहावयास मिळालीं तेव्हांपासून इच्छा ही कीं, शेक्सपिअरचीं नाटकें मुळांतून वाचून व्हावींत. ईश्वरकृपेनें सबंध शेक्सपिअर माझा अभ्यासून झाला आणि याला कारण आपण आहांत तेव्हां दर्शनार्थ आलों. रा. गणपतराव प्रसन्नपणें हंसले व पंधरावीस मिनिटें त्यांनीं आपल्याजवळ गादीवर मला बसवून घेतलें. ' गणपतराव जोश्यांच्या भेटीची ही हकीकत दिवाकरांनीं आपल्या रोजनिशींत लिहून ठेविली आहे. महाराष्ट्र नाटक मंडळीचे नामांकित नट श्री. भागवत यांच्याविषयींहि दिवाकरांची अशीच आदराची भावना होती. श्री. केशवराव दाते तर त्यांचे जिवलग मित्र.

## पांच

ब्राउनिंगच्या मॉनोलॉग्ज्‌वरून नाट्यछटा लिहायची कल्पना आपल्याला सुचली हें

दिवाकरांनीं स्वतःच सांगून टाकलें आहे. यामुळें नाट्यछटांच्या उगमाविषयीं कोणीं संशोधन करायची जरूरी उरली नाहीं. आणि मॉनूलॉग्ज् वाचल्यानंतर दिवाकरांनीं नाट्यछटा लिहायला प्रवृत्त व्हावें हेंही साहजिकच. कारण ब्राउनिंगची जशी नाटयाकडे प्रवृत्ति होती तशीच दिवाकरांची नाटयानुकूल वृत्ति.

दिवाकरांनीं ब्राउनिंग वाचला असला तरीं आपल्याला काय झेपेल, काय पचेल याची त्यांना जाणीव होती. स्वतःच्या बुद्धिमत्तेच्या मर्यादा ते ओळखून होते. ब्राउनिंगचीं मोठीं नाटयगीतें आपल्या आवांक्याबाहेरचीं हें त्यांना केव्हांच समजलें असलें पाहिजे. म्हणूनच त्यांनीं ब्राउनिंगच्या छोटया नाटयगीतांचें अनुकरण केलें. अर्थात् नाटयगीताच्या तंत्रापुरतीच ही उसनवारी. आपल्या अनुभवांची आणि विचारांची नाटयाच्या पद्धतीनें आणि कलात्मक मांडणी कशी करावी हें त्यांना ब्राउनिंगनें शिकविलें. मूळची त्यांची वृत्ति नाटयप्रवण असल्यामुळें ब्राउनिंगच्या नाटयगीतांच्या धर्तीवर लिहिलेल्या त्यांच्या नाटयछटा यशस्वी झाल्या. The seed fell on fertile soil. काव्य करायची देणगी नसल्यामुळें दिवाकरांनीं आपल्या नाटयछटा गद्यांतच लिहिल्या. ब्राउनिंगच्या छोटया नाटयगीतांचें हें अनुकरण असल्यामुळें, प्रो. पटवर्धनांनीं त्यांना दिलेलें नाटयछटा हें नांव अत्यंत समर्पक होय.

अशा तऱ्हेनें ब्राउनिंगच्या नाटयगीताच्या पद्धतीचें दिवाकरांनीं अनुकरण केलें यांत दिवाकरांना कसलाच कमीपणा नाहीं. "प्रवर्तितो दीप इव प्रदीपात्" हा योगा-योग. वाङ्मयाच्या इतिहासांत दोन निरनिराळ्या ग्रंथकारांची अनपेक्षित भेट होते आणि एकाचें काव्य दुसऱ्यानें वाचलें म्हणजे त्याची स्वतःची सुप्त प्रतिभा जागृत होते. आपले सध्यांचे राजकवि मेसफील्ड यांनीं चॉसरची कविता वाचल्याबरोबर त्यांची प्रतिभा प्रज्वलित झाली. वर्ड्स्वर्थच्या बहिणीने त्याला सहज एकदां मिल्टनचीं सुनीतें वाचून दाखविलीं. त्या दिवशींच वर्ड्स्वर्थनें मिल्टनच्या धर्तीवर सुनीतें लिहायला सुरुवात केली, आणि पुढें त्यानें जवळजवळ ५०० सुनीतें लिहिलीं. ब्राउनिंगचीं नाटयगीतें वाचून दिवाकरांना नाटयछटा लिहायची स्फूर्ति झाली, याचा अर्थ इतकाच कीं ब्राउनिंगनें त्यांना एक सांचा करून दिला, रूपरेषा आंखून दिली, किंवा एक चित्राची चौकट तयार करून दिली. परंतु या चौकटींत बसविलेलें मनोहर चित्र दिवाकरांनीं आपल्या स्वतंत्र प्रतिभेनेंच काढलेलें आहे. चौकट आणि चित्र यांना परस्पर महत्त्व किती द्यावयाचें हें सुज्ञ वाचकाला सांगायला नकोच.

जगाचें ज्ञान मर्यादित, स्वतःचे अनुभव मर्यादित, शिक्षण बेताबेताचें, तथापि

वाचन, मनन, वाङ्मयचर्चा, अखंड उद्योग यांच्या साहाय्यानें दिवाकरांनीं ही आपली छोटीशी नाटयछटांची सृष्टि निर्माण केली. उत्कृष्ट कलाकृति या दृष्टीनें नाटयछटेला किती मजल गांठतां येईल हें दिवाकरांच्या नाटयछटांत पाहायला सांपडतें. खरें म्हटलें तर या बाबतींत ब्राउनिंग हा एकच त्यांचा गुरु आणि येथेंही उसनवारी तंत्रापुरतीच. त्यांत दिवाकरांना कसलाच कमीपणा नाहीं, कारण अशा प्रसंगीं It does not matter what you borrow, but what you make of your borrowing हें तत्त्व आपण लक्षात ठेवलें पाहिजे. इंग्रजी कविगीतें (Lyrics) वाचून केशवसुतांना मराठींत तशींच काव्यें लिहायची स्फूर्ति झाली. त्याच्या आधींही अशीं कविगीतें कोणीं लिहिलीं असतील. ही गोष्ट खरी असली तरी महत्त्वाची नव्हे. मुख्य मुद्दा हा कीं, कविगीतांच्या प्रांतांत केशवसुतांनीं अद्वितीय कामगिरी करून दाखविली, म्हणूनच त्यांना युगप्रवर्तक म्हणायचें, पाणिनीच्या पूर्वी अनेक व्याकरणकार होऊन गेले. यास्कांनीं निरुक्त लिहिलें, त्यांच्याआधीं पुष्क- ळांनीं व्युत्पत्तिशास्त्राचा विचार केला होता ! तथापि नक्षत्रताराग्रहसंकुलापि ज्योति- ष्मति चंद्रमसैव रात्रिः—या कविकुलगुरूच्या म्हणण्याप्रमाणें पाणिनी आणि यास्क युगप्रवर्तकच होत. आपापल्या परीनें केशवसुतांची आणि दिवाकरांची तीच स्थिति.

दिवाकर हयात असतांना बरेच लेखक नाटयछटा लिहीत. अजूनही नाटयछटा लिहिण्याची प्रथा बंद झाली आहे असें नाहीं. तथापि दिवाकरांचें नांव निघालें म्हणजे त्यांच्याबरोबर दुसऱ्या एखाद्या छटालेखकाचें नांव घ्यावें असें कुणाला वाटत नाहीं. नाटयछटेच्या प्रांतांत ते एकटेच चक्रवर्ती सम्राट आहेत. याचें कारण शोधा- यलाही दूर जायला नको. निर्माणकुशल कल्पनाशक्ति, भावनावशता, विनोदबुद्धी, वाचन, मनन, नाटयानुकूल चित्तवृत्ति, सूक्ष्म अवलोकन, सुश्लिष्ट रचनेची आवड, संयम, मोजक्या वेचक शब्दांनीं आपलें मनोगत व्यक्त करायची रीत, भाषेवरील प्रभुत्व, आपलें लिखाण दोषातीत व्हावें म्हणून जिवापाड मेहनत करायची हौस— हे दिवाकरांच्या प्रतिभेचे आणि स्वभावाचे विशेष दुसऱ्या कोणा छटा लेखकांत सध्यां तरी दिसत नाहींत. पण पुढें असा एखादा लेखक जन्माला येईलही——कुणीं सांगावें ? कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी !

रा. कृ. ला.

# १. महासर्प

आरंभाला बरेच दिवस दिवाकर त्यांच्या नाट्यछटांना ‘ नाट्यप्रसंग ’ म्हणत.

यांपैकी हा एक नाट्यप्रसंगच.

दिवाकरांनी ज्यांच्यापासून स्फूर्ती घेतली ते ब्राउनिंगचे ‘ मोनोलॉग्ज ’ मुख्यतः मनोविश्लेषणात्मक आणि ‘ स्वगत ’पर होते. दिवाकरांच्या या पहिल्या ‘ नाट्यप्रसंग ’ ऊर्फ नाट्यछटेत मनोविश्लेषण नाही. हिचा विषय आहे निसर्ग आणि माणूस. माणसातल्या क्रौर्याने मनोमन कुठेतरी व्यथित झालेले हळव्या मनाचे कलावंत दिवाकर, क्षणभर निसर्गावर हळवेपणाचा आरोप करून भयावह, दुष्ट, विषारी मानल्या जाणाऱ्या एका महासर्पा-करवी माणसाला त्याच्या क्रौर्याबद्दल सुनावतात :

“ ....कोण रे तूं? चल दूर हो ! – या गुलाबाच्या फुलाला पुनः हात लाव कीं तुला अगदीं कडकडून डसलोंच म्हणून समज ! – अरे तुम्ही माणसें आपसांत काय वाटेल तें करा – एकमेकांचे गळे कापा – रक्त प्राशन करा – आणि खुशाल मजेनें ढेकर देत बसा ! त्या तुमच्या सुखाच्या आड कोणी येत नाहीं ! – जा बरें, बाबा ! असंतोषानें रात्रं-दिवस डोकीं कोरीत बसणाऱ्या त्या आपल्या मनुष्यसृष्टींत खुशाल जाऊन बैस ! अरे, आपलीं मनें उजाड करतां तीं करतां – आणि आमच्या या सुंदर वनालाहि उजाड करूं पाहतां ! किती सुंदर गुलाबाचें फूल हें ! पाहा, कसें आनंदानें उड्या मारीत आहे ! तो पाहा ! तो ढग आकाशांत दूर एकटाच फिरत आहे ! – त्यालासुद्धां याच्या बाललीला पाहून किती आनंद झाला आहे ! या वनांतील मौज पाहात तो कसा स्वस्थ उभा आहे ! – नको ! हें सुंदर – चिमुकलें – फूल तोडूं नकोस

अरे, हें आमचें भावंड आहे! समज, हें तूं तोडून नेलेंस, तर – मला, माझ्या या सगळ्या भावंडांना, या ढगाला, आणखी आमच्या प्रेमळ आईला किती दुःख होईल! – तुमचें लहानसें बालक काळानें आपल्या घरीं खेळायला नेलें, तर तुम्हांला किती बरें शोक होतो! कमलाकरा, या सुंदर – सुवासिक – फुलाला आमच्या हातून हिसकावून नेऊन तूं काय करणार? आपल्या पत्नीलाच देणार ना! अरे, आईच्या स्तना-पासून तूं तटकन् ओढून आणलेलें हें मूल तिनें पाहिलें, तर ती चटकन् रडायला लागेल! – जा, तुझ्या प्रियेलाच येथें घेऊन ये, म्हणजे ती या पुष्पाचें चुंबन घेईल, त्याच्याकरितां गाणीं गाईल, – आणखी, तिचें मधुर गायन ऐकून मला – आमच्या आईला – या वनाला – एकंदर सर्व सृष्टीला – किती आनंद होईल! तुझी लाडकी प्रेमाचा वीणा वाज-वायला लागूं दे, कीं आनंदानें मी अगदीं डोलायला लागेन! मी अति-शय रागीट आहें खरा, – पण प्रेमानें मला कोणी जवळ घेतलें, तर कधीं कोणावर मी रागावेन का?....”

१८ सप्टेंबर १९११

## २. एका हलवायाचें दुकान

मागल्या नाट्यछटेत नाट्यावर–त्या काळीं रूढ अर्थानें नाट्य गणले जाई त्यावर–दिवाकरांनी जाणता-अजाणता विशेष भर दिलेला दिसतो. माणसाचे क्रौर्य परिणामकारक ठरावे म्हणून एका महासर्पाला त्यांनी हळवा, भावनाशील बनवले आणि कृत्रिमपणाचा, अतिरेकीपणाचा, एकांगीपणाचा दोष लावून घेऊनही 'छटे'तले नाट्य वाढवले आणि त्याद्वारे 'छटे'चा इष्ट तो परिणाम साधला. या 'छटे'तल्या आशयावर आज अनेक शंका, आक्षेप उपस्थित करता येतील.

परंतु आता ही दुसरी 'छटा' जरा पाहा. 'माझे कामच असे गोड आहे' म्हणून गिऱ्हाइकाला आर्जवीपणे सांगणाऱ्या हलवायाच्या स्वभावातला तिखट, कडवट भागही इथे किती अकृत्रिमपणे, सहजपणे व्यक्त झाला आहे तो पाहा, या छटेतली शब्दांची निवड, वाक्यांची रचना, मांडणी अभ्यासण्याजोगी आहे. याही 'छटेत' 'नाट्य' आहे; पण ते ओढून आणलेले नव्हे.

"...काय कारट्यांची कटकट आहे पाहा! मरत नाहींत एकदांचीं! – हं, काय म्हटलेंत रावसाहेब! आपल्याला पुष्कळशीं साखरेचीं चित्रें पाहिजे आहेत? घ्या; आपल्याला लागतील तितकीं घ्या. छे! छे! भावामध्यें आपल्याशीं बिलकूल लबाडी होणार नाहीं! अगदीं देवाची शपथ घेऊन सांगतों कीं, माझ्याजवळ फसवाफसवीचा असा व्यवहारच नाहीं! – अग ए! कोठें मरायला गेली आहे कोणाला ठाऊक! गप बसा रे! काय, काय म्हणालांत आतां आपण? हीं साखरेचीं चित्रें फार चांगलीं साधलीं आहेत? अहो, आपणच काय – पण या दुकानावरून जाणारा प्रत्येकजण असेंच म्हणतो कीं, हीं

साखरेचीं केलेलीं पांखरें – झालेंच तर हीं माणसेंसुद्धां ! – अगदीं हुबेहूब साधलीं आहेत म्हणून ! – काय ? मीं दिलेले हे पांखरांवरचे रंग कदाचित् विषारी असतील ? छे हो ! भलतेंच एखादें ! हा घ्या. कावळ्याच्या पंखाचा एक तुकडा आहे, खाऊन पाहा ! अहो, निव्वळ साखर आहे साखर ! फार कशाला ? हीं सगळीं चित्रें जरी आपल्याच सारखीं जिवंत होऊन नाचायला उडायला लागलीं – तरी देखील यांच्यांत असलेला साखरेचा कण – एक कणसुद्धां कमी होणार नाहीं ! रावसाहेब, माझें कामच असें गोड आहे ! – अरेच्या ! काय त्रास आहे पाहा ! अरे पोरट्यांनो, तुम्ही गप बसतां कीं नाहीं ? का या चुलींत घालून तुम्हा सगळ्यांना भाजून काढूं ? तुमची आई कोठें जळाली वाटतें ? – का हो रावसाहेब, असे गप कां बसलात ? बोला कीं मग किती चित्रें घ्यायचें ठरलें तें ?...."

२३ ऑक्टोबर १९११

# ३. ए: ! फारच बोवा !

मागली ‘ छटा ’ दिवाकरांची एक चांगली ‘ छटा ’ ठरण्याला हरकत नाही. जवळ जवळ तोच—माणसाच्या स्वभावातल्या विरोधाभासाचा—विषय अधिक गंभीरपणे, अगदी भेसूरपणे आणि त्यासाठी नाटकीपणे हाताळणारी ही तिसरी ‘ छटा ’. नाटयछटेच्या छंदाने आता भारलेले असल्याने दिवाकरांना शेक्सपीअरच्या ‘ ऑथेल्लो ’ नाटकाचे वाचन व त्यावर प्रकट-अप्रकट चिंतन करताना केव्हा तरी ही स्फुरली असावी असे वाटते. कारण हिच्यातला ‘ नायक ’—नाटयछटेचा उद्गाता—प्रत्यक्ष जीवनातून अच्चळ--गेल्या छटेतल्या ‘ हलवाया ’प्रमाणे—न उचलता दिवाकरांनी ‘ आयागो ’च्या वळणावर तो घडवलेला वाटतो. म्हणून काहीसा कृत्रिमपणा, भडकपणा, किंचित फसलेला हिशेबही आढळतो. शेक्सपीअरच्या ‘ आयागो ’च्या वळणावरची अवास्तव दुष्ट व्यक्तिरेखा नाटयछटेच्या त्रुटित आणि वास्तवदर्शी माध्यमाला पुरून कितीतरी उरली. परिणामी आशय लक्षात येऊनही त्यापोटी मिळणे आवश्यक असलेला पुनःप्रत्ययाचा आनंद मिळत नाही.

“....आमचे वासुदेवराव शेक्सपीअर किती उत्तम शिकवितात म्हणून सांगूं तुला ! त्यांतून अथेल्लो तर, फारच, फारच चांगले सांगतात ! तिकडे काय पाहात आहेस रे ? अरे ती एक तरुण विधवा उगीच रडत आहे झालें ! तुला काय करायचें आहे तिच्या रडण्याशीं ? – हो, तुला एक असें विचारायचें आहे कीं, या नाटकांतल्या यागोच्या कॅरेक्टरविषयीं तुझें काय मत आहे रे ? – फारच बेमालूम साधली आहे म्हणतोस ? – छे: ! आपलें तर मत अगदीं साफ विरुद्ध आहे ! कसें म्हणून विचारशील, तर असें पाहा कीं, मनुष्याच्या दुष्ट स्वभावाला शेक्सपीअरनें वाजवीपेक्षां

फाजील – अगदीं लाडभडक – असा रंग चढविला आहे झालें ! – नाहीं, तें कबूल आहे रे ! नाट्यसृष्टींत हें पात्र उत्तम – चांगलें उठावदार दिसत असेल, हें मलासुद्धां मान्य आहे ! पण तेंच आपल्या खऱ्या सृष्टींत दुष्टपणाचा पारा इतका वर चढेल कीं नाहीं याची मला तर बोवा शंकाच आहे ! इतका कठोरपणा माणसाच्या अंगीं असणें शक्य तरी आहे ? ए: फारच बोवा ! तूं कांहीं म्हण. निदान अशीं दुष्ट माणसें माझ्या तरी पाहण्यांत आजपर्यंत कधींहि आलीं नाहींत, हें मात्र खास ! – स्सुक् ! ती पाहा, ती पाहा ! त्या खिडकींत उभी आहे ती ! – का ? कशी सुंदर आहे ? आहे कीं नाहीं ? – हं, हं ! – तरी रडून रडून, हिच्या तोंडावरचा तजेला पुष्कळच कमी झाला आहे ! नाहींतर किती सुंदर ! आहे, त्या धुरकटलेल्या घरामध्यें, माझें जाळें विणण्याचें काम चांगलेंच पार पडत आलें आहे ! एकदां संपण्याचा अवकाश, कीं ही येऊन त्याच्यांत अडकलीच म्हणून समज ! ह: ह:....”

२९ ऑक्टोबर १९११

## ४. आनंद ! कोठें आहे तेथें ?

येथवर Contrast – विरोध – हाच दिवाकरांच्या पहिल्या नाट्यछटांचा आधार दिसतो. हळुवार निसर्ग आणि क्रूरकर्मा मानव, गिऱ्हाइकांशी गोड आणि कुटुंबियांशी तितकाच तिखट बोलणारा साधाबगडा हलवाई, शेक्सपीअरच्या आयागोला अवास्तव म्हणून तितकाच खलप्रवृत्तीने वागणारा प्रतिष्ठित, या प्रत्येक कल्पनेत विरोध अभिप्रेत आहे. परंतु या नव्या ' छटे 'त विरोध नाही. एक नुकते जन्माला आलेले अर्भक, जुन्या काळच्या बाळंतिणीच्या खोलीतला भोवतालचा अंधार, कोंदटपणा, तेलकट घाण, ओल, धूर यांनी कळवळून आणि गुदमरूनच मरते, एवढीच या नाट्यछटेची कल्पना, निव्वळ कारुण्य हा या छटेचा स्थायीभाव. दिवाकरांनी या ' छटे 'च्या रूपाने एक पाऊल पुढे टाकले असे म्हणता येईल. ' छटे 'ला केवळ विरोधापलीकडे एक वेगळा विषय त्यांनी उपलब्ध करून दिला.

तरुण विधवांचा त्या काळचा प्रश्न सहजगत्या मागील ' छटे 'त येऊन गेला. या ' छटे 'त बाळंतिणीच्या खोलीचे त्या काळचे रोगट, भेसूर स्वरूप कळवळून व्यक्त केले आहे.

" .... देवानें शेवटीं माझी अशी निराशा केली ! हाय ! स्वर्गलोकाला सोडून मी येथें कशाला बरें आलों ? जिकडे तिकडे अगदीं अंधार—अंधार आहे येथें ! भूलोक समजून मी चुकून नरकांत तर नाहीं ना आलों ? अरे मला घोडा घोडा खेळायला कोणी एक तरी सूर्यकिरण द्या रे ! तीन दिवस झाले, पण मला प्यायला, एकसुद्धां स्वच्छ व गोड असा वायूचा थेंब अजून मिळाला नाहीं ! देवा ! तूंच नाहीं का मला सांगितलेंस कीं, या मृत्युलोकांत आनंद आहे म्हणून ? मग कोठें आहे रे तो

आनंद ? हाय ! नऊ महिने सारखा अंधारांत धडपडत, ठेंचा खात, वारंवार नरड्याला वेलींनी घट्ट बसविलेले कांटेरी फांस सोडवीत खोल अशा घाणेरड्या चिखलाच्या डबक्यांतून रडत रडत, मोठ्या आशेनें मी प्रवास केला, पण शेवटीं काय ? – नको ! अरे काळोखा ! असे कडकडा दांत खाऊन जिकडे तिकडे अशी तेलकट घाण पसरूं नकोस ! – माझ्या जिवाला आग लागली ! मला तडफडून मारूं नका रे ! – आ ! माझ्या तोंडावरचा हा धुराचा बोळा काढा ! नाहीं ! मी पुनः येथें येणार नाहीं ! अरेरे ! माझ्या आशेचा उंच डोलारा शेवटीं या काळोखांत विरून गेला ना ! काय ? येथें मोठमोठ्यानें रडायला सुरुवात झाली ? चला ! आधीं आपल्या स्वर्गाला परत चला ! ...."

२ नोव्हेंबर १९११

## ५. म्हातारा इतुका न । अवघें पाउणशें वयमान ॥

'एः ! फारच बोवा !' या छटेत दिवाकरांना साधले नाही, ते या 'छटे'त चांगले जमून गेले. दुष्ट माणसाचे या छटेतले चित्र किती वास्तव, अकृत्रिम, परिपूर्ण आणि ओळखीचे वाटते पाहा. मोजके, मार्मिक शब्द, वाक्यांची हिशेबी मांडणी, छटेचा विषय, त्या व्यक्तीच्या विशेषांची उत्तम जाण, आणि दुष्टपणा व संभावितपणा यांच्या नेमक्या मिश्रणातून वाढत्या उपरोधाचा आशय 'छटे'ला देण्यातले कलात्मक कसब, हे गुण वाखाणण्यासारखे आहेत. एका दीर्घकथेतही जे इतक्या परिणामकारकपणे जमणार नाही, ते दिवाकरांनी या सत्तावीस ओळींच्या 'छटे'त जमवून 'नाट्यछटा' या माध्यमाची मौलिकताच जणू सिद्ध केली आहे.

"...अहो छे हो ! तिला आणखी तिच्या मुलाला मरून अजून पुरते दोन महिनेसुद्धां झाले नाहींत ! प्लेगचेच दिवस होते ते ! कांहीं फार दिवसांची गोष्ट नाहीं मी सांगत तुम्हांला. – हं ! तिला बिचारीला स्मशानांत एकटीला चैन पडलें नसेल, म्हणून माझ्या दामूलाहि घेऊन गेली असेल झालें ! असो, जशी ईश्वराची इच्छा ! – यमू म्हणजे माझी प्रत्यक्ष सख्खी चुलतबहीण ! ती प्लेगानें आजारी पडून, तिला वायु झाला आहे. हीं अक्षरें दामूच्या पत्रांत दिसायचा अवकाश, तों मला जें कांहीं रडूं कोसळलें, तें कांहीं पुसूंच नका ! किती वेळां तरी मनांत आलें कीं, तिच्याकडे जावें म्हणून ! पण अगदीं नाइलाज होता ! – एक तर ते प्लेगचेच दिवस; व दुसरें असें कीं, घरामध्यें इकडे माझ्या नातवाचा दिवाळसण ! आणि त्यांतून, पुण्यापासून, मुंबईपर्यंतच्या प्रवासाची दगदग ! या वृद्धावस्थेंत, दम्यानें अगदीं गांजलेल्या या जिवाला, कशी बरें सहन झाली असती ! नाहीं तुम्हीच सांगा ! – अनंतराव काय सांगूं तुम्हांला !

ते दोन दिवस माझा जीव कसा अगदी काळजीच्या भोंवऱ्यांत सांपडला होता ! – अहो, पुढें काय ? प्रारब्ध माझें ! दामूच्या पत्रानंतर अगदीं चौथ्या दिवशीं सकाळींच, त्याच्या एका स्नेह्याचें पत्र आलें कीं, माझी यमू व तिचा तो दामू, दोघेंहि विचारीं प्लेगाच्या वणव्यांत सांपडून तडफडून मेलीं म्हणून ! दुःखाचा अगदीं पर्वत कोसळला होता माझ्यावर ! – पण तसाच धडपडत कसा तरी एकदांचा चार-पांच तास मुंबईस जाऊन, दामूच्या मित्रानें – मोठा सच्चा माणूस ! जें कांहीं त्याचें किडूकमिडूक ठेवलें होतें, तें सगळें कांहीं मी येथें घेऊन आलों ! – आतां त्यांच्या घरादारांची व शेतांची कांहींतरी व्यवस्था मला नको का करायला ? माझ्या यमूला आतां मीच काय तो एकटा वारस – हर हर ! या प्लेगाच्या वादळानें त्यांचा वंशवृक्षच कीं हो कोसळून पडला ! कठीण ! – काळ मोठा कठीण येत चालला आहे ! असो ! पण का हो अनंतराव, माझ्या यमूचीं घरेंदारें व शेतें आतां माझ्या कबजांत यायला मार्गांत कांहीं अडचणी तर नाहीं ना येणार ? ....”

४ नोव्हेंबर १९११

## ६. मग तो दिवा कोणता !

दिवाकरांच्या प्रतिभेचा एक विशेष पैलू इथे या ‘ छटे ’च्या निमित्ताने पुन्हा एकवार — अधिक स्पष्टपणे — चमकून गेला आहे. ‘ आनंद ! कोठें आहे येथें ? ’ ही मागली ‘ छटा ’ प्रथम वाचू लागले म्हणजे काहीतरी abstract — गूढ, सखोल — वाचत असल्यासारखे वाटते. त्या ‘ छटे ’ सोबतच्या एका टीपेत दिवाकर बाळंतिणीच्या खोलीचा तपशीलवार उल्लेख करून ‘ छटे ’मागचा हेतू उघड करतात आणि मग सारे कोडे चुटकीसरशी उलगडते, कोडेच उरत नाही. तसे याही छटेचे मुळात होते. नावापासून सारे उखाणा घातल्यागत होते. ‘ काजळाचा वर्फ ’, इ० शब्दयोजनांनी गोंधळ वाढतो. वाचकांना काहीतरी जवळचेच वाचत असल्यासारखे वाटते, पण काय ते नक्की हाती सापडत नाही, आणि पुन्हा एकवार ‘ छटे ’सोबतच्या टीपेत कळते की, हे स्वप्न आहे. यातला दिवा म्हणजे आपले अंतःकरण. परंतु या खेपेला कोड्याची किल्ली हाती येऊनही ‘ छटे ’च्या दुसऱ्या वाचनात ताजेपणा राहतोच.

या ‘ छटे ’तले नाट्य विरोध वा विशिष्ट रसाच्या उत्कर्षापेक्षा त्यातल्या चमत्कृतीत–Fantasy–त आहे.

“…सखे ! दुसरा दिवा आणतेस ना ? – अरेरे ! या माझ्या दिव्यांत कितीतरी किड्यांचा बुजबुजाट झाला आहे ! माझ्या तेलाची घाण झाली ! – घाण झाली ! ! – काय ? काजळाचा वर्फ पडत आहे ? – सखे ! अग सखे ! येतेस ना लवकर ? – अग, माझ्या खोलींत जिकडे-तिकडे हा दिवा काजळ उधळीत आहे ! अरे दिव्या ! माझ्यावर जितका काजळाचा वर्षाव करावयाचा असेल तितका कर ! – पण माझ्या या शेक्सपीअरवर व ब्राउनिंगवर एक कणसुद्धां टाकूं नकोस ! – हाय ! हें

तेल किती स्वच्छ होतें ! पण आतां ! – हे किडे उसळून उड्या मारायला लागले म्हणजे हेंच तेल, निळें, पिवळें, हिरवें, तांबडेंलाल ! – पाहा, पाहा ! कसें आतां काळें झालें आहे तें ! – दिवा भडकला ! – काय म्हटलेंस ? दुसरा दिवा नाहीं ? तुला कोणीं धरून ठेवलें आहे ! – हाय ! माझ्या तुळईला आग लागली ! – माझें घर पेटलें ! – धांवा ! धांवा ! ! मी भाजून मेलों ! मला कोणी तरी वांचवा हो ! काय हा आगीचा डोंब ! देवा ! देवा ! ! – हं ! येथें तर कांहीं नाहीं ! शांततेच्या मांडीवर काळोख तर स्वस्थ घोरत आहे ! आग नाहीं, कांहीं नाहीं ! मग, तो दिवा कोणता बरें भडकला होता ?...."

९ नोव्हेंबर १९११

## ७. दिव्याभोंवतीं पतंग उडत आहेत !

या छटेतही मागल्या छटेसारखाच, बोलकी प्रतीके आणि त्याद्वारे एका भव्य आशयाची रेखीव, नाट्यपूर्ण अभिव्यक्ती, हाच आत्मा आहे. या नाट्यछटेतले नाट्य रूढ स्वरूपाचे — विरोधातले वा रसोत्कर्षातले नाही. ते निराळे आहे, अधिक सूक्ष्म आहे — म्हणजेच कल्पनेची जोड असलेले आणि मुख्यतः चिंतनपर, वैचारिक आहे. दिवाकरांची नाट्यछटा कशी एकेक टप्प्याने समृद्ध होत होती ते पाहा.

" ....काय म्हटलेंस ? आपल्या जीविताचा तुला कंटाळा आहे ? — हे बघ, हे बघ, या दिव्याभोंवतीं कसे पतंग उडत आहेत — कसे पण प्रेमानें अगदीं तर्रर होऊन भोंवतालच्या जिनसांवर तडातड उड्या मारीत आहेत ! हा पाहा, या लहानशा पुस्तकावर कसा सारखा घिरट्या घालीत आहे ! प्रेमशोधनच आहे हें ! अग नको, नको, त्याला हात नको लावूंस ! — बाबांनो, या दिव्याच्या ज्योतीला खुशाल आनंदानें प्रदक्षिणा घाला ! — काय पाहा ! त्या ज्योतीच्या लाटांमध्यें पोहण्यासाठीं बिचारे चिमणीवर कसे धडक्यावर धडक्या घेत आहेत ! — कशाला ! अंतःकरणांतील प्रेमाची प्रखरता, प्रकाशाच्या — ईश्वरी प्रेमाच्या — प्रखरतेमध्यें मिसळायला ? — तें ज्योतीमध्यें बुडून गेलेलें दीपगृह आहे ना ? — अग तें अंगुस्तानासारखें दिसत आहे तें ? — तेथें जायचें आहे त्यांना ! अरेरे ! बिचारे पाहा कसे मरून पडले आहेत ते ! ! धडपड, धडपड केली खरी, त्यासारखें, यांच्या आत्म्यांना तर तें दीपगृह मिळालें ! — त्या लहानशा ठिकाणीं कितीतरी जोडपीं आनंदानें, प्रेमानें दांतन असतील नाहीं ! — आपल्या या अफाट जगांत सारखा कलह

सुरू आहे! पण तेंच त्या चिमुकल्या स्वर्गांतून, कलहाचा एक तरी— अगदीं लहानसा तरी – सुस्कारा आपल्याला ऐकूं येत आहे का! खरेंच! या पतंगांचें जीवित कितीतरी सुखाचें, प्रेमाचें आहे! आपलेंहि – !...."

१० नोव्हेंबर १९११

# ८. अहो, आज गिऱ्हाईकच आलें नाहीं!

जीवनातले सूक्ष्मतर नाट्य भडक रंग न मारता शब्दांत पकडण्याचा हा दिवाकरांचा एक समर्थ प्रयत्न. स्मशानातला गोवऱ्या विकणारा दुकानदार आणि गावात प्लेग. खूप माणसे मरत असताना त्याला होणारा हर्ष हा वास्तविक रूढ व्याख्येतल्या नाट्याचा उत्कृष्ट नमुना. त्यातल्या सरळ, साध्या विरोधाने तो व्यक्त होण्यासारखा होता. उद्वेग, चीड, भय यांपैकी काहीही वाचकांच्या मनात या स्वरूपाच्या नाट्यछटेने मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले असते. दिवाकरांनाही हे जाणवले नसेल असे नव्हे. परंतु त्यांनी हा मोह टाळला आहे. त्यांच्या या 'छटे'त, गावात प्लेग आहे, पण गोवऱ्यांचा दुकानदार 'कडका' आहे, असे म्हणतो. तो म्हणतो, "खिशात दारूलाबी पैशे नाहीत!" एकीकडे गोवऱ्या वाहण्यावर पोट भरणारी कोंडाबाई कुरकुरते आहे, दुसरीकडे घरात बायको 'गागते' आहे, त्यातच शेठजी येऊन दिल्या पैशांच्या वसुली-साठी तगादा करतो. या सगळ्या किचकिचीत दुकानदार फक्त एकच मोठ्या आत्मविश्वासाने, सांगतो, "उद्या संध्याकाळच्या आत सगळे पैशे चुकते करतो!" एकाच वेळी 'छटे'त सच्ची वास्तवता आणि उत्कृष्ट कलाकृतीस आवश्यक तो संयम राखून साधलेला परिणाम मनोज्ञ आहे.

"...काय करावें! आज दारूलाबी खिशांत पैशे नाहींत! – काय कोंडाबाई! अहो कोंडाबाई! काय तुमचें भांडण तरी काय आहे? अशा आमच्यावर रागावलांत कां? – काय म्हटलेंत? काल तुम्हांला ओझ्याला बोलावलें नाहीं, म्हणून तुम्ही माझ्यावर इतक्या रागावलां? जाऊं द्या कीं! उद्यां लागतील तितकीं गिऱ्हाइकें येतील! मग सगळ्या गवऱ्या तुम्हीच मसणांत नेऊन टाका! मग तर झालें? अहो, गिऱ्हाइकें येऊं द्या कीं, मग तुम्हाला पैशेच पैशे! काय त्रास आहे पाहा! अग

ए ! कां उगीच गागत आहेस ? गांवांत कोण प्लेग चालला आहे ? – अहो कोणाचे जीवबी सुचित नाहींत, – आणि ही सटवी मघाधरून उगीचच भांडत आहे ! – बरें झालें घरांत तेल नाहीं तर ! आणूं कोठून पैसे ? – काय सांगूं कोंडाबाई ! हिच्या रोजच्या या काहारामुळें मला आपल्या जिवाचा अक्शी कंटाळा आला आहे ! – कोण आहे ? दौलतशेट ! या शेटजी, जयगोपाळ, बसा. खरोखर, तुम्हीं तर माझी अगदीं पाठ पुरवली आहे बुवा ! किती पंचवीसच रुपये बाकी राहिली आहे ना ? देऊन टाकीन – उद्यां संध्याकाळच्या आंत, सगळे पैसे चुकते करतों ! – आतां काय सांगावें ! रामाशपथ, या वेळेला खिशांत एक पैसुद्धां नाहीं ! अहो, आतांपर्यंत मुळीं गिऱ्हाईकच आलें नाहीं !....”

१२ नोव्हेंबर १९११

# ९. अहो कुंभारदादा ! असें कां बरें रडतां ?

मागल्या ‘ छटे ’त मसणवटीतल्या गोवऱ्यांच्या व्यापाऱ्याच्या तोंडी ‘ पैशे ’, ‘ गवऱ्या ’, ‘ गागत आहेस ’, ‘ जीवबी सुचित नाही ’, ‘ सटवी ’ असे काही शब्द, शब्दप्रयोग दिवाकरांनी टाकले आहेत. त्याही मागल्या एका ‘ छटे ’तल्या हलवायाच्या तोंडी त्यांनी तद्दन पांढरपेशी भाषाच वापरली आहे. या नव्या ‘ छटे ’चा नायक आहे कुंभारदादा. हा केवळ पांढरपेशी भाषा बोलतो, इतकेच नव्हे तर त्याला सुचणारी प्रतीके आणि विचारही पांढरपेशे आहेत. ‘ छटां ’द्वारे दिवाकर व्यक्त करीत असलेला आशय त्या त्या व्यवसायापलीकडे पोहोचणारा, मूलभूत मानवी स्वभावाशीच निगडित होता. हलवाई किंवा कुंभारदादा ही निमित्ते—केवळ सोयिस्कर साधने—होती. दिवाकर त्यांचाच बाऊ करते तर व्यर्थ तपशिलाने आणि त्या त्या व्यवसायाच्या बोलीने—परिणामी कृत्रिमतेने—लादून छटा चिरडून गेली असती.

माणूस अकाली मरणाला मनस्वी घाबरतो, ते टळले म्हणजे बहुधा क्षणमात्र सुखावतोही; परंतु पुढे जीवनातल्या एकेक कटुतम अनुभवांनी तो इतका व्यथित होतो, शिणतो की, त्याला मरण अव्हेरल्याचा, जगल्याचा पश्चात्ताप पदोपदी होत राहतो. “ रात्री झोपेकरता डोके टेकायचा अवकाश, की ‘ नको ! नको ! ’ म्हणून उशी भेसूर गळा काढून रडायला लागते ! ”

“...‘ कां रडतों ! ’ रावसाहेब, मी आपल्या जन्माकरतां रडतों आहें ! हीच ती जागा ! आणखी, याच दिवशीं सकाळीं – नुकतें अकरावें वर्ष लागलें होतें मला – कोंवळ्या उन्हामध्यें, वाऱ्यानें भुरभुर उडणाऱ्या या भट्टींतल्या त्रिस्तत्राच्या कुरळ केसांवर हात फिरवीत, मोठ्या मजेमध्यें बसलों होतों मी ! इतक्यांत दोन गोळ्या माझ्या पाठींत शिरल्या ! बाबा अन् आई रडायला लागलीं ! पण मी मात्र येथें, मृत्युलोक व परलोक यांच्यामध्यें झोके घेत खुशाल निजलों होतों ! पुढें, अंधारांत वाट चुकलेल्या कालाचा चुकून माझ्या जखमेवर हात पडला मात्र, तोंच सगळ्या शिरा झणाणून

'नको !' म्हणून ओरडल्या ! डोळे उघडून जों पाहतों तोंच, एक मोठी थोरली बंदूक घेतलेला घिप्पाड पुरुष – त्याच्या अंगाभोंवतीं कितीतरी लहान – मोठे तारे इकडून तिकडे फिरत होते ! – माझ्या हृदयावरून आपला हात उचलतांना दृष्टीस पडला ! – व हंसत हंसत तो काय म्हणाला, 'नको ! तर राहिलें ! असाच रडत बैस, पुन: मात्र मी लवकर येणार नाहीं !' पुढें काय ? अंधार ! रावसाहेब, या गोष्टीला आज पन्नास वर्षें झालीं. आई मेली, बाप मेला ! पण मी मात्र दुर्दैवामध्यें तडफडत आहें ! मधून मधून काय सुखाचे झुळझुळ वारे वाहतील तेवढेच ! – ऐका. साताचे ठोके पडत आहेत. रावसाहेब, हा शहराच्या मध्यावर असलेला घड्याळाचा उंच मनोरा या माझ्या भट्टींतून तयार झालेल्या विटांनी बांधलेला आहे ! हा मनोराच काय, पण गांवांत दिसणाऱ्या मोठमोठ्या इमारतींनाहि मींच विटा पुरविल्या आहेत ! – हा मनोरा बांधल्याला जवळ जवळ आठ वर्षें झालीं, पण आकाशांत मोठ-मोठ्या वावटळी सुटून जरी सारखा धो धो पाऊस पडत होता, वर आणखी विजाहि कडकडत होत्या, तरी हा आपला छाती काढून त्यांच्या-कडे टक लावून पाहात उभाच ! कितीहि कडक ऊन पडो, पण एक वेळसुद्धां यानें हुश्श म्हणून केलें नाहीं ! माझ्या हातच्या विटांचा मनोरा हा ! – नरकामध्यें माझ्या पापकर्मांचाहि मनोरा उभारलेला आहे ! नाहीं असें नाहीं ! – पण हाय ! माझीं हीं व्यसनी मुलें व त्यांचे फाजील लाड करणारी माझी बायको, या प्राण्यांच्या दुर्दैवाला मदतीला घेऊन सर्व जण, रोज सकाळपासून रात्रीं दिसेनासें होईपर्यंत मीं राबून तयार केलेला – या हृदयांतील प्रचंड असा आशेचा मनोरा रोजच्या रोज भांडणांचीं वादळें उत्पन्न करून ढासळून कीं हो टाकतात ! काय सांगूं ! रात्रीं झोंपेकरतां डोकें टेकायचा अवकाश, कीं ! 'नको ! नको !!' म्हणून भेसूर गळा काढून माझी उशी रडायला कीं हो लागते ! अरे पांडुरंगा ! हाय रे पांडुरंगा !!..."

१४ नोव्हेंबर १९११

# १०. “ तनू त्यागितां कीर्ति मागें उरावी ! ” कशाला ? येवढ्याचकरितां कीं नाहीं ?

‘ खाइस्ट लेन ’, ‘ इमर्सन चौक ’, ‘ बिस्मार्क कंपनी ’, ‘ पैगंबर चिरूट ’, ‘ नेपोलिअन शू ’ अशा थोरामोठ्यांच्या नावांच्या सवंग चेष्टा फार ऐकून, वाचून, दिवाकरांना ही छटा सुचली असावी. यातली विसंगती आणि काही वेळा चमत्कारिक संगती हा या ‘ छटे ’चा विषय. परंतु चांगल्या नाट्यछटेला आवश्यक ती मार्मिकता, सहजता आणि तरलता या ‘ छटे ’तल्या आशयात दिवाकरांना तितकीशी आणता आलेली नाही. या ‘ छटे ’त दिवाकरांनी पार्श्वभूमी म्हणून विलायत वापरली आहे हे जाता जाता ध्यानी घ्यायला हवे. परंतु ही विलायतही कुंभारदादा-प्रमाणेच अभिव्यक्तीसाठी एक सोयिस्कर साधन, म्हणून. तेवढेच तिचे महत्त्व.

“....या आळीला का ? ‘ खाइस्ट लेन ’ असें म्हणतात. त्या समोरच दिसणाऱ्या खांबाच्या कपाळावर काळ्या अक्षरांनी लिहिलेली पाटी ठोकलेली आहे, तिकडे आपण पाहिलेंच नाहीं वाटतें ? – ते पाहा अजून रक्ताचे डाग आहेत त्या खांबांवर ! फळीवरहि थोडेसे शिंतोडे उडालेच आहेत. – अहो, परवां रात्रीचीच गोष्ट. दारूबाज नवऱ्यानें घराबाहेर हाकून दिलें म्हणून ज्या बिचारीनें – किती गरीब आणि सद्गुणी होती ती ! – रागाच्या आवेशांत त्याच, त्याच खांबावर आपलें कपाळ फोडून जीव दिला, त्याच बाईच्या आत्म्यानें जातां जातां ‘ खाइस्ट ’ या अक्षरांवर ते रक्ताचे शिंतोडे उडविले आहेत ! – हें झालें ? तसेंच एकदां त्या खांबाजवळ एक मूल – अरेरे ! त्या अर्भकाच्या नरड्याला व छातीला पांच-पंचवीस खिळे ठोकलेले ! – असें तें मूल, कोणीं चांडाळानें आणून

टाकलें होतें! – जाऊं द्या कीं! आपल्याला काय करायचें आहे या गोष्टीशीं म्हणा! – काय चिरूट? कोणत्या छापाचा आहे? वेलिंग्टन चिरूट असेल, तर मग हरकत नाहीं! अहो, परवां काय झालें! जवळच इमर्सन चौकांत बिस्मार्क कंपनीचें दुकान आहे – तेथें मीं जवळ जवळ दोन शिलिंगांचे पैगंबर छापाचे चिरूट – जो तो त्यांची स्तुति करायला लागला, म्हणून मोठ्या हौसेनें विकत घेतले! – झालें! थोड्या वेळानें मी जो त्यांतला एक ओढून पाहतों तों काय! सारखा अर्धा तास ठसका! – असा कांहीं संताप आला कीं, ते सगळे चिरूट घेतले, अन् लागलीच शेजारच्या गटारांत फेंकून दिले! – नांवें मात्र मोठमोठ्यांचीं, पण येथून तेथून बदमाषगिरी! – अरे वा! तुमचा नेपोलिअन शू बराच टिकला आहे कीं! – मी तुम्हांला सांगत नव्हतों कीं, तो सॉक्रेटिस बूट घेऊं नका म्हणून? असो. आपण आमच्या देशामध्यें, माझ्या घरीं पाहुणचार घेत कांहीं दिवस तरी राहिलेंच पाहिजे. पहिल्यानेंच येथें आलां आहांत – तो पाहा! आमच्या वाइजमनच्या बहिरी ससाण्यानें कसा पक्षी धरून आणला आहे –! मोठा चलाख आहे! जवळ जवळ रोज तीसपासून पस्तीसपर्यंत पांखरें धरून आणतो! त्याचें नांव काय ठेवलें आहे ठाऊक आहे का? – शेक्सपीअर! – कारण तो म्हणतो की, जसा कविराज शेक्सपीअर, माणसाच्या अंतःकरणांत अगदीं सांदी-कोपऱ्यांत दडून बसलेले विचार पकडून आणण्यांत मोठा हुशार होता, तस्सा माझा हा ससाणा पांखरें धरून आणण्यांत मोठा वस्ताद आहे! हः हः हः का? आहे कीं नाहीं!...

१७ नोव्हेंबर १९११

# ११. कार्ट्या ! अजून कसें तुला जगांतलें ज्ञान नाहीं ?

'हलवायाचे दुकान' या 'छटे'तला विषय — मानवी स्वभावातली विसंगती — याही 'छटे'चा विषय आहे. परंतु हलवाई नीच नाही. अजाणता तो आहे तसा आहे. आणि या 'छटे'तला पांढरपेशा बाप नीच आहे. 'व्यवहारज्ञान', 'जगाचे ज्ञान' म्हणून तो अनुभवी अधिकाराने म्हणतो ते दुसऱ्याच्या नोटा चोरण्याचे ज्ञान. असल्या गोष्टींत काही गैर आहे ही त्याची जाणच त्याने व्यवहाराच्या सबबीखाली मारून टाकली आहे. दोन व्यक्तींतला हा फरक दिवाकरांनी किती काळजीपूर्वक राखला आहे पाहा !

मानवी स्वभावातला विरोध, विसंगती चितारण्याचा दिवाकरांचा एक साचा आता अस्पष्टपणे तयार होऊ पाहात होता. या दृष्टीने 'हलवाई', 'एः फारच बोवा !', 'म्हातारा इतका न', 'कार्ट्या ! अजून कसें तुला...' या 'छटां'चे आरंभ आणि शेवट अभ्यासून पाहा. त्यांत एकसारखेपणा जाणवतो.

तीस ओळींच्या मर्यादेत दिवाकरांच्या लेखणीने इथे कितीतरी सूत्रे कसबाने संभाळली आहेत.

" ....थांब ! अशानें थोडाच तूं ताळ्यावर येणार आहेस ! नुसत्या छडीनें नाहीं भागायचें – चांगला या चाबकानेंच तुला सडकला पाहिजे ! – चूप ! खबरदार ओरडशील तर ! आणलीस तापलेली पळी ? ठीक. आण ती इकडे ! धर याला नीट, – अस्सा ! चांगला चरचरून डाग बसला तोंडाला ! – रडूं दे, रडूं दे लागेल तितका ! काय ग, या त्रिंब्याला अक्कल तरी केव्हां येणार ? आतां का हा लहान आहे ?

चांगला सहा वर्षांचा घोडमा झाला आहे! पण अजून कसें तें व्यवहार-ज्ञान नाहीं! – नाहीं पण मी म्हणतों, कांहीं जरूर पडली होती मध्यें बोलण्याची याला? मी इकडे गणपतरावांना सांगतों आहें कीं, तुमची दहा रुपयांची नोट पडलेली इथें कांहीं कोणाला सांपडली नाहीं म्हणून! पण इतक्यांत आमचे हे दिवटे चिरंजीव आले ना! आल्याबरोबर यानें त्या गृहस्थाला सांगितलं कीं, – तरी मी इकडे चांगला डोळ्यांनीं दाबतो आहें! – पण या गाढवाचें लक्ष असेल तर! – म्हणे 'तुमच्या खिशांतून काल कागद पडला होता, तो किनई मीं बाबांच्याजवळ नेऊन दिला' – चूप बैस! खोटें बोलतोस आणखी? असें नाहीं तूं त्यांना म्हणालास? – अग यानें सांगितल्याबरोबर माझ्या जिवाची कोण इकडे त्रेधा! मग कांहींतरी आठवल्यासारखें केलें, मुद्दाम कागदपत्रांचीं दहा-पांच पुडकीं उलथींपालथीं केलीं, अन् खिशांत असलेली नोट हळूच कशी तरी त्या गणपतरावांना काढून दिली! – असा संताप आला होता त्या वेळेला या कार्ट्याचा! – पण त्यांच्या देखत 'नेहमीं अशीच मला शहाणपणानें आठवण करीत जा बरें बाळ!' असें म्हणून ते जाई-पर्यंत या त्रिंब्याची मला वरचेवर पाठ थोपटावी लागली! कशी लक्ष्मी चांगली घरांत चालून आली होती! पण या कार्ट्यापायीं, – अरे कार्ट्या! अजून कसें तुला जगांतलें ज्ञान नाहीं! – तें कांहीं नाहीं! या पोरट्यांना उठतां बसतां नेहमीं सडकलेंच पाहिजे! त्याशिवाय नाहीं यांना जगांतलें ज्ञान यायचें! – स्वयंपाक झाला आहे म्हणतेस? चला तर घ्या आटपून. चंडिकेश्वराच्या देवळांत लवकर मला गेलेंच पाहिजे! आजपासून तिथें प्रख्यात काशीकरशास्त्री श्रीमद्भगवद्गीतेवर पुराण सांगायला सुरुवात करणार आहेत! चला तर लवकर! – त्रिंब्या, थांबलें कीं नाहीं तुझें अजून रडणें? का पाहिजे आहेत तडाखे आणखी?'...”

१८ नोव्हेंबर १९११

# १२. किती रमणीय देखावा हा !— पण इकडे ?

आणखी एक ‘ स्वप्न ’मय ‘ छटा ’. दिवाकर तिच्या सोबतच्या टीपेत म्हणतात, ‘ हे स्वप्न मला स्वतःलाच पडले. ’ आणि या स्वप्नातल्या एका उद्‌बोधक विरोधाबरोबरच माणसाला पडणाऱ्या स्वप्नांतला Crudeness—आकारहीन ओबडधोबडपणाही — या ‘ छटे ’त दिवाकरांनी अजाणता उतरविला. दिवाकरांची कल्पना, प्रतिभा, त्यांची जाणिवेची सखोलता, अभिव्यक्तीतला बोलका संयम, हे सारे गुण या ‘ छटे ’त वजा वाटतात. त्यांची शब्दसंपत्तीही या ‘ छटे ’ पुरती तोकडी पडली आहे. शाळकरी काव्यातले आणि निबंधातले वापरून झिजलेले शब्दच दिवाकरांनी इथे वापरून टाकले आहेत असे वाटते. एक चमत्कृती सोडली तर बाकी ‘ छटा ’ वर्णनात्मक निबंधाला जवळची आहे.

“ देवि ! तुझी बाग किती सुंदर आहे ही ! राघू – मैना, कोकिळा – बदकें – कबुतरें – सगळीं निजलीं आहेत ! दिवसां बदकांमध्यें मिसळून त्यांच्याबरोबरच आनंदानें उड्या मारणारें तें लहानसें सरोवर – अहाहा ! – कांहीं कमळांचीं काव्यें आतांच पुरीं झालीं आहेत, व कांहीं दिवसभर हृदयांत सांठविलेल्या सूर्यतेजानें अगदीं रसरसून जाऊन आपलीं काव्यें लिहिण्यामध्यें काय पण गढून गेलीं आहेत ? पाहिलेंस ना ? तेंच सरोवर चंद्रबिंबाशीं आतां कसें तन्मय होऊन गेलें आहे ! खरेंच, किती तरी तुझें ऐश्वर्य हें ! अहाहा ! मुग्धावस्थेंतून नुकतींच बाहेर पडून, आपल्या प्रियकराच्या गालावर गाल ठेवून, ती कलिका आपल्या पतीकरितां – त्या गुलाबाकरितां – आपलें प्रेमळ हृदय हळूहळू

उमलायला लागली हें पाहून त्या गुलाबाच्या नेत्रांतून – बघ – कसे – दोनच – दोनच प्रेमाश्रु बाहेर पडले आहेत ते! तसेंच इकडे पाहिलेंस ना? या जोडप्याच्या खालींच किती तरी मोगऱ्यांचीं फुलें उमललीं आहेत! झालेंच तर, त्या प्रेमळ पतिपत्नीला चंद्रकिरणांचा फारसा ताप लागूं नये, म्हणून वर दोन गुलछबूचीं फुलेंही उगवलीं आहेत! वा! तुझ्या या बागेमध्यें किती तरी चित्रविचित्र आणि सुंदर फुलझाडें आहेत हीं! कांहीं सुवासिक आहेत, कांहीं सुंदर आहेत, आणि कांहीं तर दोनहि गुणांनीं नटलेलीं आहेत! पण सगळीं फुलझाडें परस्परांना व शेजारच्या लतावृक्षांना कशा प्रेमाच्या गुजगोष्टी सांगत आहेत! भगवति, तुझ्या या वनसृष्टीचा प्रेमळ आत्मा, आकाशांत प्रकाशणाऱ्या या स्वर्गीय आत्म्याशीं एकरूप होऊन गेल्यामुळें – अहाहा! काय चोहोंकडे प्रेमाचा उज्ज्वल – शांत! असा हा प्रकाश पडला आहे! अरे! पण हें काय? – हें काय? किती उंच प्रचंड असा हा प्रेतांचा पर्वत तरी! अबब! किती माणसें या पर्वतावर चढावयाला लागलीं आहेत हीं! – काय? 'तूं चढूं नकोस! मी चढणार!' हा! काय भयंकर कत्तल चालली आहे ही! कडकडणाऱ्या रक्तामध्यें – ते पाहा – किती तरी आत्मे तडातड उडत आहेत! नका ओरडूं! अरे, असे रडूं नका! – अरे बापरे! – रक्ताचा काय महासागर उसळला आहे हा! – अरे! अंधार पडायला लागला वाटतें? छे! अगदीं पाहवत नाहीं कीं! तापलेल्या लाल गोळ्याप्रमाणें हा सूर्यच दिसत आहे का? – कोण? कोण आहेस तूं? – हावरेपणा? – किती लांबलचक मुंडक्यांची माळ तरी ही – अरे नको! माझ्या नरड्यावर पाय देऊं नकोस! मेलों! मेलों!! – हुश! काय भयंकर स्वप्न तरी? – अरे! चांगलेंच फटफटलें आहे कीं!..."

२१ नोव्हेंबर १९११

# १३. अशा शुभदिनीं रडून कसें चालेल?

नाट्यछटेच्या सामर्थ्याने भारावलेले प्रतिभावंत दिवाकर जोमाने आणि न थबकता एकसारखे लिहीत सुटले होते. विरोध-विसंगती-कारुण्य-दंभ क्रौर्य...शिकाऱ्याच्या जागरूकतेने दिवाकर 'छटे' साठी लक्ष्ये हेरीत असतील.

घरात विधवा तरुण मुलगी ठेवून थाटाने आपले दुसरे लग्न करणारा बाप हा या 'छटे'चे निमित्त. या परिस्थितीत त्या विधवा मुलीची मनःस्थिती हा या 'छटे'चा विषय. आरंभाला त्या विधवेच्या कल्पने-पासून आरंभ करून ती विधवा आहे, ती पतीच्या निकट सहवासाच्या खोट्या भासाबरोबर उत्कटतेने खेळते आहे, हा भास भंगणार आहे, हा भास भंगतो, तिची आई तिला नुकतीच टाकून देवाघरी गेली आहे, तिच्या बापाच्या दुसऱ्या लग्नाची मिरवणूक थाटाने बाहेर निघाली आहे, या घटनामालिकेची अत्यंत नेटकी मांडणी करून एखाद्या कसबी नाटक-काराच्या कौशल्याने दिवाकरांनी साधलेला कारुण्याचा उत्कर्ष अभ्यासण्या-जोगा आहे.

"...एकूण तें सगळे खोटेंच तर? माझ्या या कपाळावरचें कुंकूं हळूच आपल्या प्रेमळ – हो! कसचें प्रेमळ! – बोटानें – हेंच नव्हे का तें? – यानेंच पुसून टाकून आपण कोणीकडे बरें गेलां होतां? स्वर्गाला? – नाथ! या हृदयांतून – सदैव प्रेमाचीं गाणीं म्हणणाऱ्या माझ्या या अंतःकरणांतून – बाहेर पडायला आपण मला कधीं बरें विचारले होतें? आणि मी कधीं जा म्हणून सांगितलें? – पण जाऊं द्या आतां! तें सगळें स्वप्नच होतें! कारण, या स्वच्छ व झुळझुळ वाहणाऱ्या प्रवाहामध्यें माझ्या कपाळावरचा कुंकुमतिलक कसा नक्षत्रासारखा आनंदानें चमकत आहे! प्रेमानें नाचत आहे! प्राणनाथ! या हिरव्यागार गालिच्यावर आपणाला बसवून – मी नाहीं जा! या मांडीवर बसून

अशी मी या गळ्याला निरंतर मिठी मारून बसणार! अग बाई! पाऊस पडत आहे! अहाहा! नाथ! कसें सुंदर इंद्रधनुष्य उगवलें आहे इकडे! काय म्हटलेंत? हें स्वर्गाचें महाद्वार उघडलें आहे? खरेंच! या सायंकाळच्या वेळेला आपल्या मेंढ्यांना – पाहिलेंत ना? – कशी चकचकीत सुवर्णासारखी नुकत्याच उमललेल्या गुलाबासारखी, लोंकर आहे त्यांच्या अंगावरची! – या मेंढ्यांना घेऊन हा मेघ – हा वृद्ध मेंढपाळ – नेत्रांतून आनंदाश्रु गाळीत कसा त्या स्वर्गद्वाराकडे हळूहळू चालला आहे पण! – असें काय गडे! कोठें जायचें आहे आपणांला! – हंसतां काय? – बोला गडे! – मी आपणाला आतां क्षणभरसुद्धां कोठें जाऊं द्यायची नाहीं! – थांबा! कोठें जायचें आहे तें मला नाहीं का सांगत? नाथ! मी येऊं का? – येऊं का आपल्या-बरोबर? खरेंच सांगतें, आपण जर मला टाकून गेलां, तर तडफडून मरेन हो! आपल्याशिवाय मला आतां कोण बरं प्रेमानें जवळ घेणार आहे? – दोनच महिने झाले. माझी आई किं नाहीं मला टाकून गेली आहे! – नाहीं! नाहीं!! माझ्या या घट्ट मिठींतून मी आपणाला मुळींच जाऊं देणार नाहीं! प्राणनाथ! माझे हात तुटले तरी – हाय! हाय!! येथें कोण आहे! – काय? मला कायमचे टाकून गेले? आत्तां त्यांना मीं मिठी मारली होती ना? मग या घट्ट मिठींत काय आहे! तडफडणारें! – न मरणारें! – हें माझेंच हृदय आहे! – काय? बाहेर बेंडबाजा वाजत आहे! समजलें! बाबा आतां नव्या आईला आणायला चालले आहेत! – इतकी कशी गाढ झोंप मला लागली पण? – किती गोड स्वप्न! पण तें स्वप्नच! आई! – आई!! – तडफडूं नकोस!! हृदया! तडफडूं नकोस!! बाबा, हंसायला लाग! कारण – अशा शुभदिनीं रडून कसें बरें चालेल?....”

२३ नोव्हेंबर १९११

# १४. बाळ? या नारळाला धक्का लावूं नकोस बरें !

ही एक चांगली नाटयछटा. कोणत्याही रसाच्या उत्कर्षाने भावनेला आवाहन करण्याऐवजी ही पांढरपेशा माणसातल्या अर्धवट श्रद्धेवर आणि अर्धवट बुद्धिवादावर एकच नेमका, पण हलका आघात करते. वाचकाला मनोमन खूण पटते; पण मोठेसे चिडायला किंवा अस्वस्थ व्हायला होत नाही. उलट चांगली ' छटा ' वाचल्याचा आनंद त्याला लाभतो. या ' छटे 'तली विसंगती, यातला विरोध मुळात सौम्य; आणि तो साजेशा सौम्यपणे, हळूच व्यक्त झाल्याने ' छटे 'ला विशेष सौंदर्य प्राप्त झाले आहे. आजही ही ' छटा ' चांगली वाटते.

" ...बाळ वेणूबाई ! असें काय बरें वेडयासारखें करावें ? हें बघ, हा नारळ कि नाहीं, फोडण्याकरितां देव्हाऱ्यांत ठेवलेला नाहीं ! याला रोज सकाळीं गंध, अक्षता, फुलें वाहून याची पूजा करायची ! – पूजा कशाला करायची ! वेडी पोर ! .ऐक, मी काय सांगतों तें. एके दिवशीं रात्रीं काय झालें, – आपल्या बागेंत बंगल्याशेजारीं नारळाचें झाड आहे तें ? – त्या झाडाखालीं, श्रीरामचंद्र, लक्ष्मण – सीतामाईबरोबर गोष्टी सांगत बसलेले तुझ्या पणजोबांना स्वप्नांत दिसले ! सकाळीं ते जे उठून पाहतात, तों आपला एक नारळ त्या झाडाखाली पडलेला ! झालें ! देवाचा प्रसाद म्हणून पणजोबांनीं तो घरीं आणला, त्याचीं सालपटें काढलीं. मग देव्हाऱ्यांत ठेवून त्याची पूजा केली ! रोज या नारळाची पूजा करावयाची असा त्यांनीं आपला नेम चालविला. पुढें देवाच्या दयेनें त्यांना पुष्कळ पैसा मिळाल्यावर, त्यांनीं याला चांगला सोन्यानें

मढविला ! बघ, कशी खऱ्या नारळाच्या शेंडीसारखी जरीची शेंडी आहे ती ! झालेंच तर ही मखमलीची पिशवी, त्याला बसायला रेशमी कापडाची मऊ मऊ गादी – पाहिलीस ना कशी छानदार आहे ती ? – काय ? काय म्हटलेंस ? या नारळांत – या जरीनें, सोन्यानें मढविलेल्या नारळांत – गोड गोड पाणी ! – चांगलें खोबरें असेल ? हं: हं: वेडी रे वेडी ! बेटा वेणूबाई ! या नारळांत आतां कोठून खोबरें व पाणी असायला ? पणजोबांना ज्या वेळेस तो झाडाखालीं सांपडला त्या वेळेस त्याच्यांत खोबरें आणि पाणी असेल ! त्या गोष्टीला जवळ जवळ आतां दोनशें वर्षे व्हायला आलीं ! आतां या नारळातलें पाणीहि नाहींसें झालें आहे, व खोबरेंहि नाहींसें झालें आहे ! – मग यांत आहे काय ? बेटा, कवटी सोन्याची, शेंडी जरीची, पण आंत किं नाहीं, सडलेली, कुजकी, अशी निव्वळ घाण आहे ! आतां कांहीं तो खाण्याच्या उपयोगाचा नाहीं ! समजलें आतां ? तो देण्याबद्दल आतां पुनः नाहीं ना कधीं हट्ट धरायची ?...”

२४ नोव्हेंबर १९११

# १५. सगळें जग मला दुष्ट नाहीं का म्हणणार ?

१९११ सालची अखेर. दिवाकरांना नीटसे दिसू शकत नव्हते. डोळे अधिकाधिक अधू होत होते. कचेरीतले कामही नीट जमेना. अशा वेळी कोणत्याही मध्यमवर्गीय कुटुंबवत्सलाचे ओढगस्तीचे अस्थिर जिणे जगणाऱ्या दिवाकरांच्या हळव्या मनात एकेकदा फार मोठा कल्लोळ माजत असावा. " आंधळा झालो तर ? " हा मेसूर विचार त्यांना वारंवार सतावीत असेल. अशा मनःस्थितीत सुचलेली ही ' छटा '.

स्वतःच्या अनुभूतीवर लेखक उत्कृष्ट साहित्य लिहू शकतोच असे नाही.

स्वतःला पडलेल्या स्वप्नावर दिवाकरांनी ' किती रमणीय देखावा हा ! ' ही सामान्य ' छटा ' लिहिली आणि आता स्वतःच्या डोळयांच्या अधूपणापोटी सुचलेली ही आणखी एक सामान्य ' छटा '. आरंभाला ही जेवढी पटते तेवढी पुढे पुढे पटत नाही.

"....उगीच कशाला खोटें सांगू ! डॉक्टरसाहेब, माझी सगळी दौलत जर म्हणाल, तर दोन हजार रुपये. ते मीं कधींच बायकोच्या नावानें बँकेंत करून ठेवले आहेत. घर नाहीं, शेत नाहीं, कांहींसुद्धां नाहीं. बरें आपण विचाराल, कीं हे दोन हजार रुपये तरी कोठून आले ? तर, माझ्या वडिलांनीं मरायच्या आधीं, जे घरामध्यें काय डागडागिने होते ते सगळे मोडून टाकले. अन् त्यांचे जे हे रुपये आले, ते त्यांनीं आईच्या नांवानें बँकेंत ठेवून दिले, झालें ! वडील वारले तेव्हां मी अगदींच लहान होतों. आई नुकतीच वारली ! आणि मीहि पण लवकरच – हं ! डॉक्टरसाहेब ! माझ्या डोळ्यांवर दुर्दैवानें रचीत आणलेली ही काळोखाची भिंत,

चारपांचशें रुपये खर्च केल्याशिवाय, कांहीं आतां उतरतां यायची नाहीं ना ? अहो ! महिना बारा-पंधरा रुपये मिळविणारा मी माणूस – हा ! वर्षभर तर जवळ जवळ मी घरींच बसून आहें कीं ! आतां मी आणूं कोठले इतके रुपये ! – काय निघालां ? हे घ्या. ही तुमची डोळे तपासायची पांच रुपये फी. – कांहीं नाहीं ! अशक्तपणामुळें माझा हात इतका कांपत आहे ! – घेतलीत ? आपले माझ्यावर फार उपकार झाले ! डॉक्टर-साहेब ! या बरें ! – ”

“....माझ्या या त्रासानें नासलेल्या मस्तकांतील किड्यांचें गुणगुणणें आतां थांबणार तरी केव्हां ? – ‘ तूं आपले डोळे लवकर बरे कर, नाहीं तर जन्मभर ही काळतोंडी मध्यानरात्र – बावा रे ! – एकसुद्धां, अगदीं लहानसा तारासुद्धां आतां चमकलेला दिसायचा नाहीं ! – जिवाचें रक्त शोषीत सारखी तुझ्या डोळ्यांत बसेल ! आयुष्यभर रडत बसावें लागेल ! डोळे मुठींत धरून, तुला रडत बसावें रे लागेल ! ’ – काय ? माझ्या – नाहीं, माझ्या लाडकीच्या दोन हजारांतले चारशें रुपये खर्च करूं ? आणि डोळे बरे झालेच नाहींत तर ? मग कसें ! – थांबलें कीं नाहीं अजून तुमचें गुणगुणणें ? का अशी ताडकन् थप्पड – अरे ! हें काय ! माझ्या हाताच्या एका फटकाऱ्यानें हा ग्लासच फुटला वाटतें ? हाताला किती बारीक बारीक तुकडे लागत आहेत हे ! – हं: काय पाहा ! हाताच्या एका फटकाऱ्यासरशीं हें काचेचें भांडें फुटलें ! – पण, अहोरात्र मन:-संतापाचें कडकडून दांत चावणें, व जोरानें वळलेल्या मुठींचे धडाधड प्रहार होणें चाललेलें असतें, तरी हा जीव कांहीं केल्या फुटतच नाहीं ! आंधळ्या ! तूं आतां जगून तरी काय करणार ? अरे ! आपल्या मेलेल्या जिवंतपणानें तिला आतां नको रे छळीत बसूं ? – सखे ! – अरे नको, नको, निजूं दे तिला. चांगली गाढ झोंप लागली आहे – ही काय वाटी सांपडली वाटतें ? फार छान झालें ! या काचांचे बारीक तुकडे करून,

देतों या नरड्यांत ती पूड ओतून; म्हणजे चांगलीं आंतडीं तुटून जिवाची कायमची सुटका तरी होईल ! पण थांबा, मीं जर असा जीव दिला, तर माझ्यामागें हिचे किती बरें हाल होतील ! हिला किती यातना सोसाव्या लागतील ! – सखे ! माझ्यामागें तुला कोण बरें प्रेमानें वागवील ? – नको ते मरणाचे भयंकर विचार ! – हो, हा हातांतला काचेचा चूर फेंकूनच द्यावा; पण – जिवंत राहून हिला जन्मभर रड-विण्यापेक्षां, एकदाचें मरून जाऊन थोडेच दिवस रडविणें बरें नव्हे का ? – अरे नको थांबूं आतां ! आटप लवकर ! जिवा ! अशी घाई कां ? बाबा रे, आत्महत्या करून आपल्या बायकोला जर दुःखांत लोटलें, तर जग मला काय बरें म्हणेल ? दुष्ट नाहीं का म्हणणार ? – काय ? तुझ्या तडफडण्यापुढें जनापवादाला मान देऊं नको ? – जा ! – अशा धडक्या घेऊं नकोस ! सोडतों तुला ! सगळा चुरा पोटांत गेला ! – आतां मी कायमचा सुटणार ! – हाय ! सखे ! मी तुला आतां टाकून – हां चूप रहा ! निजूं दे तिला ! – देवा ! या जगांतल्या प्रत्येक वस्तूला आपल्या पापी नजरेनें भ्रष्ट केल्यामुळें, आंधळा झालेला हा दुरात्मा आतां नरकांत – आलों ! थांबा ...”

३० नोव्हेंबर १९११

## १६. देवा ? मीच मंगळ जर जन्माला आलों नसतों ?

दिवाकरांना दारिद्र्याचा फार अनुभव होता. नोकरी लागल्यापासून कित्येक वर्षे त्यांना दरमहा पंधरा रुपयांवर रखडावे लागले. मनात असूनही कुटुंबात कोणाची हौस म्हणून पुरवता आली नाही.

भोवतालची नजर काढून स्वतःच्या जाणिवेतच विषयासाठी पुनःपुन्हा डोकावणाऱ्या दिवाकरांना आपले दारिद्र्य हा आणखी एक विषय सापडला. मनातली साचलेली तडफड, उपरती, उद्वेग सारे त्यांनी या ' छटे 'त एका दरिद्री दुर्दैवी माणसाच्या आत्मगताच्या निमित्ताने बाहेर टाकले आहे. परंतु हे करतानाच एकीकडे त्यांनी काही उपरे, भडक फटकारे मागल्या ' छटे 'प्रमाणे याही ' छटे 'च्या ' कॅन्व्हास 'वर ओढून ठेवले आहेत; आणि खरे आणि खोटे यांचे एक अजब, समसमान मिश्रण ' छटे 'च्या रूपाने वाचकांपुढे राहिले आहे. यातले काही विचार मनाला भिडतात आणि काही वाक्ये मनाला तेवढाच, कोरडा उबग आणतात.

"....अरे ! जिन्यांत तर अगदीं अंधार आहे ! अजून आठहि वाजले नाहींत, तोंच जिकडे तिकडे अगदीं सामसूम ? ही कोठें बाहेर तर नाहीं गेली ? – छे: ! दाराच्या फटींतून दिव्याचा अंधुक अंधुक उजेड तर दिसत आहे. आणि अशा रात्रीच्या वेळेला ती कशाला उगीच बाहेर – पण हें काय ? कोणाच्या बरें फुटक्या हृदयांतून हा रडका हुंदका बाहेर पडला ! – माझें हृदय कसें धडधडायला – चला, हळूच वर जाऊन दाराच्या फटींतून, आपल्या फाटत चाललेल्या संसाराचें चित्र पाहूं ! – जिवा, असा मधेंच खचून जाऊं नकोस ! आधीं वर चल ! – पाहा !

आपला हा संसार नीट डोळे उघडून पाहा ! — दारिद्र्याने संतापून जाऊन अगदीं त्रासानें अंगावर फेकलेले तें फाटकें-तुटकें लुगडें नेसून माझी बायको कशी हुंदके देऊन रडत आहे ती ! तो पाहा ! ढणढण जळणाऱ्या त्या घासलेटच्या डब्याशेजारीं, आगपिणीनें खाजवून — बाळ ! नको रे आपल्या चिमुकल्या जिवाला असा नखांनीं ओरबडूस ! — रक्ताने न्हालेल्या, व मधून मधून आपल्या आईकडे, व दोन-तीन वर्षांनीं वडील अशा आंधळ्या बहिणीकडे, केविलवाण्या मुद्रेने रडत रडत पाहणाऱ्या, माझ्या त्या दोन वर्षांच्या लेकराकडे पाहिलेंस का ? — काय म्हटलेंस ? माझी गोदी कशानें अशी आंधळी झाली ? दोनअडीच वर्षें झालीं, देवीच्या तडाख्यातून अगदीं मरतां मरतां वांचली ! पण विचारी जिवा-ऐवजीं डोळेच घालवून बसली आहे ! — एकंदरींत, माझें आयुष्य या गरीब बिचाऱ्या आत्म्यांचे हाल हाल करण्यांतच चाललें आहे कीं नाहीं ! ऐकलेंस ? तिघेंहि माझ्या या अस्तित्वाच्या लोखंडी चरकांत सांपडून, कशीं रडक्या स्वरानें मोठमोठ्यानें कण्हत आहेत तीं ! — हा ! — आगपिणीनें कुरतडला जाणारा, अहोरात्र अंधारांत तळमळणारा, व माझ्या हृदयाचें हें भिकार डबडें मिळाल्यामुळें हा ढणढण जळणारा ! — अरेरे ! असे हे तीन आत्मे देवाला काय बरें म्हणत असतील ? — जिवा ! तुला नाहीं का रे ऐकूं येत ? — अरे ! ते म्हणत आहेत कीं, ‘ देवा, हा नरकलोक निर्माण झाला ! म्हणूनच आम्ही असे तडफडत आहों बरें ! ’ — खरेंच ! माझी बायको लग्नापूर्वीं आपल्या श्रीमंत पित्याच्या घरीं, कशी सुखांत आणि आनंदांत होती नाहीं ? पण शेवटीं, स्वर्गांत हंसणाऱ्या व येथें रडविणाऱ्या मंगळानें — या आनंदानें चिरकाल हंसूं इच्छिणाऱ्या मुक्या प्राण्याचा, आपल्या पापकर्मांत चिलबिलणाऱ्या या दुरात्म्याशीं विवाह — मंगल विवाह ! — लावून दिला ! परमेश्वरा ! तुझीं स्वर्गांत आनंदानें प्रकाशणारीं नक्षत्रें आम्हां माणसांच्या दृष्टीला, आमच्या

मेंदूलाच, रडकीं कशीं रे दिसतात ! – बाळांनो ! आपला बाप जन्माला कां आला, म्हणून देवाला विचारीत असेच निरंतर रडत बसा ! – पण मी म्हणतों, या मुलांचें तरी आयुष्य असें दुःखात कां बरें जावें ? बरोबर ! – कां नाहीं या मुलांनीं तडफडावें ? – अरे ! निष्प्रेमाच्या अत्यंत विषारी जागेमध्यें दारिद्र्यरसानें अधिकाधिक फोंफावणाऱ्या कामवासनेला गोड फळें येतील, का कडू जहर ? – नासकीं अशीं फळें येतील ? हां, बरोबर विचारलेंस. मला जर एवढें कळत होतें तर मी या गरीब बिचारीशीं विवाह करून तिला अशी दुःखसागरांत कां लोटली ? – पण जिवा ? या घरांत निर्माण झालेल्या दुःखाला मीच कारण आहे असें मी कधीं बरें म्हणत नाहीं ? – आतां मीं विवाहच कां केला, तर बाबा रे, मीच तुला उलट असें विचारतों कीं, पापकर्मांत गटांगळ्या खाणाऱ्या प्राण्याला कधीं एकटें मरावेंसें वाटेल का ? – जितके आपल्या मिठींत सांपडतील, तितक्यांना घेऊन तो रसातळाला जाणार ! मग मीच एकटा या जगांत कसा बरें तडफडूं ! देवा ! मीच मंगळ जर जन्माला आलों नसतों – ! !”

६ डिसेंबर १९११

## १७. मुंबईंत मजा गमतीची ।
## जीवाची हौस करण्याची ॥

एका पांढरपेशा माणसाच्या गुणावगुणांचा एक उत्तम आणि जिवंत नमुना दिवाकरांनी या 'छटे त' रेखाटला आहे. थोड्याफार फरकाने हे एक व्यक्तिचित्रच आहे. मूलतः सामान्य पांढरपेशा माणूस दुबळा असतो, थोडाफार पापभीरू असतो आणि मोहवशही असतो. या 'छटे'तला छोटासा सावकार एकीकडे मुंबईचा दीपोत्सव बेळगावच्या चंद्राजी नायकिणीला बरोबर घेऊन मजेने पाहावा म्हणून तळमळतो आहे आणि दुसरीकडे घरी बाळंतरोगाने 'कुजणाऱ्या' मरणोन्मुख बायकोला सोडून त्यासाठी निघायला हवे ते त्याला जमत नाही. घरात बाळंतीण बायको टाकून प्लेगच्या ऐन कहरात घरातली दोन मोठी भांडी गहाण टाकूनही मुंबईला गेलेल्या गणू शिंप्याविषयी त्याला हेवा वाटतो, अगदी आदर वाटतो, परंतु त्याचे अनुकरण त्याला जमण्यासारखे नाही, थोड्याफार सुसंस्कृत माणसाच्या दौर्बल्याचे इतके खरे आणि संयत—इतके संयत की, किंचित फिकेच—चित्रण विरळा. नाट्य म्हणजे भडक, कृत्रिम, असे घटनाप्रधान काहीतरी. या तत्कालीन व्याख्येच्या आहारी दिवाकर काही वेळा गेले असले तरी त्याच काळात आपली 'नाट्यछटा' घेऊन ते त्या व्याख्येपुढेही कसे सरकले होते ते येथवर स्पष्टपणे जाणवू लागते.

"....अहो तें सगळें खरें ! पण माझ्या मागची ही ब्याद टळेल, तेव्हां तुमची मुंबई, आणखी तिची मजा ना ! तुमची शपथ, मला अगदीं त्रास आला आहे ! वर्ष होत आलें, पण माझी बायको बाळंतरोगानें आपली अधिकाधिक कुजंतेच आहे ! अहो, मी म्हणतों, एकदां बरें तरी व्हावें, किंवा कायमचें मरून तरी जावें ! प्लेगचीं माणसें नाहीं, कशीं चोवीस

अगर छत्तीस तासांत निकाल ! – रागावूं नको तर काय करूं ? सगळें जग लोटलें आहे मौज पाह्यला ! फार लांब कशाला ? माझ्या शेजारचाच तो गणू शिंपी. घरांत बायको एक दिवसाची बाळंतीण, गांवांत तर प्लेगचा कहर, असें असून घरांतलीं दोन मोठीं भांडीं घेतलीं, तीं माझ्याकडे आणून ठेवलीं, पंधरा रुपये घेतले, आणि लागलीच पठ्या मुंबईस चालता झाला ! – का ? आहे कीं नाहीं ? नाहींतर आम्ही बसलों आहोंत कीं नाहीं असे रडत ! – नाहीं, आपणच सांगा कीं, अशी मौज, अशी लाइट, कधीं या जन्मांत तरी फिरून आपल्याला पाह्यला सांपडेल का ? – अहो बाबूराव, मीं चांगलें ठरविलें होतें कीं, बेळगांवास जावें, चंद्राजीला घ्यावी, आणि तसेंच मुंबईस परस्पर चालतें व्हावें ! पण म्हण आहे ना, कीं माणूस योजितो एक, आणि देव घडवून आणतो दुसरेंच ! चांगला बेळगांवास जायला निघालों, तोंच आमच्या बाईसाईहेबांची प्रकृति एकाएकीं बिघडली. आणि काय ? घटकेंत जीव जातो, घटकेंत येतो, असें आतांशा चार दिवस सारखें चाललें आहे ! शपथ ! मी तर अगदीं रडकुंडीस आलों आहें बुवा !....”

७ डिसेंबर १९११

बाल वाङ्मय विभाग.
बा. क्र. ७०८२ दिनांक ......

## १८. म्याऊं–म्याऊं–म्याऊं !

'महासर्प' या दिवाकरांच्या अगदी पहिल्या 'छटे'प्रमाणे प्राण्याला बोलके करणारी ही आणखी एक 'छटा' यात मांजरी तिच्या पिलांशी सुसंस्कृत माणसाच्या शब्दांत बोलते; आणि ही मांजरी गेल्या जन्मीची माणूस—एक आई—आहे असे दिवाकर सांगतात. आपल्या गत-जन्मीच्या मुलांच्या घरीच तिला सर्व प्रकारची अवहेलना, उपेक्षा सहन करावी लागते, हे तिचे—तसे म्हटले तर वरवरचे—दुःख आहे. ती बोलते त्यातून व्यक्त होणारा आशय माणसाच्या मूलभूत सापेक्ष वागण्याचा ठाव घेणारा आहे. त्याचे प्रेम, आदर, कदर, सारे सापेक्ष; यामुळे फार अन्याय घडतात. दिवाकरांना याबद्दल म्हणायचे होते आणि ते परिणाम-कारकपणे म्हणण्याच्या हेतूने त्यांनी मांजरी—गेल्या जन्मी माणूस असलेली मांजरी—या 'छटे'ची नायिका बनवली.

तसे म्हटले तर दिवाकरांचे कोणतेही पात्र पूर्णांशाने पात्र नसून दिवाकरांचे आशयाच्या अभिव्यक्तीचे एक सोयिस्कर साधन आहे हे आपण पाहिले. परंतु असे साधन म्हणून दिवाकरांनी हाताळलेली माणसे जेवढी पटतात, तेवढी ही मांजरी—किंवा त्यांचा 'महासर्प'—पटत नाही. कारण एक : नाट्यछटेच्या वास्तवदर्शी माध्यमाला इतकी कृत्रिमता मानवत नाही. मांजरी बोलते इथूनच 'छटा' खटकू लागते. पुढे तिला गतजन्मीची माणूस, आई करून तिच्या मुलांच्याच घरात दिवाकर तिला प्रस्थापित करतात तेव्हा जास्तच खटकू लागते

"...दवा ! माझीं पिलें भुकेनें कशीं व्याकुळ रे झालीं आहेत ! तीन वाजून गेले, पण अजून यांच्या पोटांत, घासभर कीं रे अन्न गेलें नाहीं ! बाळांनो ! उगी, नका रडूं ! मी पुनः खालीं जातें – अगदीं हलूं नका. या गलथ्यांतच अमळ एकमेकांशीं खेळत बसा ! – स्वयंपाकघरांत जातें,

आणि कांहीं उष्टें अन्न पडलें असेल, तें माझ्या बाळांकरितां घेऊन लवकर येतें! जाऊं? – आज घरांत एवढें काय आहे? काय सांगूं तुम्हांला! मुलांनो, आज किं नाहीं माझा वाढदिवस – माझ्या पूर्वजन्मींच्या मनुष्यदेहाचें वर्षश्राद्ध आहे! खरें म्हटलें, तर हें माझेंच घर— हीं माझींच मुलें – पण या घरांतल्या मुलांना काय ठाऊक, कीं मी त्यांचीच आई आहें म्हणून! त्यांना वाटतें – त्यांनाच काय? – सर्व जगाला वाटतें कीं, आपले सगळे पूर्वज स्वर्गाला जातात म्हणून! पण किती तरी ठिकाणीं, मनुष्यदेहाचें जीर्ण वस्त्र फेंकून देऊन पशुपक्ष्यांचें कातडें अंगावर घेऊन आम्ही! – आम्ही आपल्या मुलांलेंकरांभोंवतीं प्रेमानें वावरतों, त्यांची सेवा करतों – आणि उलट त्यांच्या लाथाबुक्यांचे – चावकांचे – तडाखे सोशीत धाय मोकलून रडत कीं रे असतों! पण बाळांनो, जगाला निव्वळ देह – कातडें – माती! – प्रिय आहे! आत्म्यावर जगाचें खरें प्रेमच नाहीं! जोंपर्यंत मी मनुष्यदेहानें नटलें होतें, तोंपर्यंत हीं घरांतलीं माझींच मुलेंलेंकरें कशीं मजवर प्रेम करीत होतीं! पण मी मांजर होऊन घरांत फिरूं लागल्यापासून, मला कोणी जवळसुद्धां उभें राहूं देत नाहीं! देवा! आज माझाच वाढदिवस, आणि मलाच का रे अन्न – पानांतलें घासभर उष्टें अन्नसुद्धां मिळूं नये! पण या घरांतल्या मुलांना तरी काय ठाऊक, कीं मी त्यांचीच आई आहें? तसें असतें तर मघाशीं मी नुसती स्वयंपाकघरांत डोकावलें मात्र, तोंच 'रांडे! नीव!' असें म्हणून वेणूनें – प्रत्यक्ष माझ्या लेकीनें! – ताडकन् माझ्या डोक्यांत लाटणें फेंकून कशाला बरें मारलें असतें! – बाळांनो! नका रडूं! मी आतां खालीं जाऊन येतें!...."

८ डिसेंबर १९११

## १९. जातिभेद नाहीं कोठें ?

बहुधा एखाद्या चर्चेतून दिवाकरांना सुचलेली—स्फुरलेली—ही 'छटा'. माणसांतल्या अन्यायमूलक जातिभेदाचे समर्थन करण्याच्या भरीला पडलेल्या एका बेरक्या माणसाने निसर्गावर केलेले जातिभेदांचे आणि त्याबाबतच्या संतोषाचे एकेक दांभिक आरोप या 'छटे'त एका वादाच्या अर्ध्या भागाच्या रूपाने दिवाकरांनी मांडले आहेत. उपरोधाची धार इतकी ओझरती आहे की, क्षणभर त्या गृहस्थाचेच म्हणणे दिवाकरांना आपले म्हणून मांडायचे होते की काय असे वाटते. परंतु वृत्तीने दिवाकर पुरोगामी आणि माणसाने माणसावर चालवलेला अन्याय जाणणारे होते, हे 'एः फारच बोवा !' आणि 'आनंद ! कोठे आहे येथे ?' यांसारख्या 'छटां'मधून पुरेसे ध्वनित होते; आणि शिवाय केवळ एक युक्तिवाद मांडणे, एवढ्याच हेतूने ते नाट्यछटा लिहितील हेही अशक्य होते.

संयम हा दिवाकरांच्या लेखणीचा एक गुण इथे आशय काहीसा अस्पष्ट ठेवण्याला कारणीभूत झाला आहे.

"....ही अशी लटपट नको आहे ! म्हणे पुष्कळांचं मत आहे कीं, ईश्वरानें जातिभेद निर्माण केला नाहीं म्हणून ! असेल ! एका पुष्कळांचें जसें हें मत आहे, तसेंच जगांतल्या दुसऱ्या पुष्कळांचेंहि मत आहे कीं, ईश्वरानें जातिभेद निर्माण केला आहे ! – मी असें विचारतों कीं, आपल्या मानव-सृष्टीखेरीज इतर जीवसृष्टींत परमेश्वरानें जातिभेद निर्माण केला आहे कीं नाहीं ? फार कशाला ? या वनांतलीच मौज पाहा कीं ! अहो, कांहीं झाडांना नुसतीं सुवासिक फुलेंच आहेत, तर कांहीं दिखाऊ – पण अत्यंत सुंदर – अशाच फुलांनीं नटलेलीं आहेत ! पाहा, तो आम्रवृक्ष

पाहा ! त्याला सुवासिक मोहरहि आहे व गोड फळेंहि येतील ! बिचाऱ्या सुरूच्या झाडांना तर फुलेंहि नाहींत आणखी फळेंहि नाहींत ! पण त्यांची, वायूच्या लहरीमध्यें डुलत डुलत स्वर्गाला जाऊन भिडण्याची धडपड अव्याहत चालू असते कीं नाहीं ! तसेंच पक्ष्यांचें ! कोणी गाणारे आहेत, कोणी सुंदर आहेत, तर कांहीं – पाहा ती घार ! ओहोहो ! आकाशांत उंच भराऱ्या मारीत चालली आहे ! – हो, मग, मी तरी तेंच म्हणतों कीं, पशूंमध्येंहि हाच प्रकार आहे ! अहो, इतकेंच नाहीं, पण गुलाबाच्या झाडांमध्येंसुद्धां किती तरी जाती आहेत ! मला सांगा, सगळ्या जगांत पोपट तरी एकाच जातीचे आहेत का ? मुळींच नाहीं. अहो, प्रत्यक्ष माणसाला कोठें नको आहे जातिभेद ? हो, आपल्यालाच मी असें विचारतों कीं, तुम्ही आपल्या बागेंत नुसतीं गुलाबाचींच झाडें कां नाहीं लावीत ? पाहिजे कशाला जाईजुई-मालती-मोगरा ? – तें कांहीं नाहीं ! माणसाचा स्वभावच हा कीं, आपल्या वर्तनांतील दोषांचा डेरा कोणाच्या तरी माथीं तो आदळीत असतो ! –

वा ! काय कोकिळा मधुर गात आहे ! का हो त्रिंबकराव, आपल्या-भोंवतीं मधून मधून जें एवढें गवत पसरलें आहे, त्यामध्यें रडून रडून वाळलेली एक तरी गवताची पात तुम्हांला दिसत आहे का ? तीं नारळाचीं झाडें आमच्यापेक्षां कां उंच आहेत, आणि आम्हांला तूं इतकें उंच कां करीत नाहींस ? – अशी यांची ईश्वराजवळ चालू असलेली ओरड कोठें ऐकूं येत आहे का ? कोकिळा गात आहे म्हणून इतर पक्षी गायचे थोडेच थांबले आहेत ! आपल्या बंधूजवळ जितका मोहर आहे तितका आपल्याजवळ नाहीं, म्हणून हा आम्रवृक्ष मत्सरानें सुकून गेला आहे का ? सांगा, अगदीं लहानशा गवताच्या पातीला जितका आपल्यांतील ईश्वरी तेजाविषयीं अभिमान वाटतो, तितकाच, उंच हात पसरून आपल्या लहान भावंडांना वारा घालणाऱ्या त्या नारळाच्या

झाडालाहि वाटतो ! जगाचें सौंदर्य वाढविण्याची परमेश्वरानें आपल्यावर सोंपविलेली कामगिरी, जितक्या उत्साहानें व कळकळीनें तें गुलाबाचें फूल बजावीत आहे, तितक्याच उत्साहानें व कळकळीनें हें झेंडूचें फूलहि नाहीं का बजावीत ? – ! हें पाहा ! या आनंदानें स्मित करणाऱ्या व शांत वनांत दुःखाचा एक तरी सुस्कारा ऐकूं येत आहे का ? – नाहीं तर आपल्या शहराकडे नजर फेंका ! जिकडे तिकडे मीपणाची आग भडकून त्यांत तडफडून – भाजून निघणाऱ्या तूंपणाच्या हृदयांतून अव्याहत बाहेर पडणाऱ्या धुराचें – त्रिंबकराव ! – कसें हें आच्छादन पसरलें आहे ! – काय म्हटलेंत ? हा सगळा धूर जातिभेदानें धुमसणाऱ्या तंट्यांतून बाहेर पडत आहे ? – नाहीं ! तसें नाहीं ! अहो, ईश्वराला जाणूनबुजून पायांखालीं तुडवून सर्व जगाचा मी एकटा मालक असावा, या इच्छेनें अनावर होऊन, एकमेकांवर टाळकीं फोडून घेणाऱ्यांच्या मेंदूंतून या वाफा निघत आहेत – वाफा ! ' मी ! मी ! ' अशी रणगर्जना जिकडे तिकडे ऐकूं येत आहे !...."

३१ डिसेंबर १९११

## २०. कोकिलाबाई गोडबोले

'हलवायाचे दुकान' या 'छटे'शी बरेच साम्य दाखविणारी आणि त्या 'छटे'चे चांगुलपण निर्विवाद सिद्ध करणारी दिवाकरांची ही एक सरळ साधी 'छटा'.

हिच्यातली मार्मिकता, उपरोध, सर्वस्वी हिच्या शीर्षकातच आहे. 'छटे'त पोरेबाळे आणि पतिदेव यांना शिवीगाळी करणारी आणि टाकून बोलणारी एक लेकुरवाळी बाई — नाव काय तिचे? कोकिलाबाई गोडबोले.

'नाव सोनूबाई आणि हाती कथलाचा वाळा' या म्हणीचे हे अकारण फुलविलेले रूप.

"....मेले हात धुऊन पाठीस लागले आहेत जसे! काडीइतकें सुद्धां कार्ट्यांपासून सुख नाहीं!—करूं, करूं तरी कसें आतां! जेवा मुकाट्यानें! नाहीं तर चांगली फुंकणी घालीन पाठींत एकेकाच्या!—काय, काय म्हटलेंस गण्या?—मेल्या! मी मोठमोठ्यानें ओरडतें का?—ऊं!—चूप! ओक्साबोक्शी रडतो आहे मेला! जीव गेला? का घालूं आणखी पाठींत?—का ग बेणे? गप कां बसलीस?—भाकरीवर तूप हवें?—मेलें माझें तोंड नाहीं धड आतां! बापानें ठेवलें आहे तूप तुझ्या टवळे! तूप पाहिजे नाहीं? हें घे!—गप्प! नाहीं तर आणखी रपके घालीन चांगले!—मिटलें का नाहीं तोंड! का असा आणखी!—हात् तुला घातलें चुलींत नेऊन अवदसे! कोण आहे? कोण हांका मारतें आहे बाहेर?—आहेत हो. आहेत! आलें, आलें!—या पोरट्यांच्या गागण्यानें अमळ ऐकूं येईल तर ना? लग्न होऊन घरांत आल्यापासून सारखी पाहात आहें, रात्रंदिवस मेला जंजाळ पाठीमागें!—

सांडलेंस पाणी ? – बाई ! बाई ! भंडावून सोडलें आहे या पोरट्यांनीं – ! पाहा, आहे ? नीट मुकाट्यानें जेवायचें, त्या मिटक्या रे कशाला वाजवायच्या ? – थांब ! ! हा झारा तापवून चांगला चरचरून डाग देतें तोंडाला ! – दळिद्री कारटीं ! खाऊन पिऊन मेलीं झालीं आहेत पाहा कशीं ! मरूं घातलीं आहेत जशीं ! आलांत ? आज लवकर येणें केलें ? स्वारीचें भटकणें लवकरच संपलें म्हणायचें ! रोज उठून तीं मेलीं मंडळें का फंडळें ! कर्माचीं करा आपल्या मंडळें ! उद्यां जा तर खरें, कीं हीं सगळीं कारटीं आणून तिथें उभीं करतें अन् पाहतें तमाशा ! – आलें हो, आलें – केव्हांच्या त्या मुरलीबाई हांका मारीत आहेत, तेव्हां अमळ – ऐकलें का ? – असें घुम्यासारखें बसायचें नाहीं ! संभाळा या कारट्यांना, नाहीं तर मेलीं आग लावून देतील घरादाराला ! – आलें बाई ! ! ”

१ जानेवारी १९१२

## २१. वर्ड्‌स्‌वर्थचें फुलपांखरूं

' म्याऊं-म्याऊं-म्याऊं ', ' जातिभेद नाही कोठे ? ', आणि ' कोकिळाबाई गोडबोले ', या लागोपाठच्या तीन ' छटां 'च्या लेखनानंतर दिवाकरांमधला विकासशील कलावंत अवस्थ झाला तर आश्चर्य नव्हते. लिहिल्याविना राहवत नव्हते, आणि मनाजोगते काही लिहून होत नव्हते.

आणि एक नवी ' छटा '. स्वतःचाच गमतीशीर अनुभव. घोळवावा तेवढा अर्थपूर्ण. वर्ड्‌स्‌वर्थचे हळवे काव्य बटाबटा पितानाच ढेकणाची केवळ चिरडून नव्हे तर चांगली जाळून हत्या. विसंगती विरोध. मनुष्य-स्वभावातली मौज. भावनावशतेतले क्रौर्य.

मागे म्हटला तो मानवी स्वभावातल्या विरोधविसंगतीवर टराविक पद्धतीने ' छटा ' लिहिण्याचा दिवाकरांचा साचा या ' छटे 'त चांगलाच स्पष्ट उमटला. तरीही या ' छटे 'चा तिच्यातल्या मिस्किलपणामुळे, मनःपूर्वकतेमुळे, पुनःप्रत्ययाचा आनंद देणाऱ्या वास्तवतेमुळे, अकृत्रिम हाताळणीमुळे भोवतालच्या रसिक मंडळीत काहीसा बोलबाला झाला आणि दिवाकरांना धीर आला.

"....ओ ! स्प्लेंडिड ! ब्यूटिफुल ! – छे ! वर्ड्‌स्‌वर्थची कविता म्हणजे काय ! – मौज आहे ! फारच सुंदर, फारच उत्कृष्ट ! या महाकवीचें अंतःकरण किती प्रेमळ – अगदीं मेणासारखे आहे नाहीं ? आनंदामध्यें इकडून तिकडे घिरट्या घालणाऱ्या सूक्ष्म अशा किड्याला अगर मुंगीला, किंचित् कोणीं अडथळा केला, तर या कवीच्या हृदयाला लागलीच चटका बसून, अश्रूंनीं डबडबलेले नेत्र त्याच्या कवितेंत ठिकठिकाणीं कसे स्पष्ट दिसतात ! – हीच पाहा कीं ' फुलपांखरूं ' ही कविता –

किती बहारीची आहे! ही एकच काय, वर्डस्वर्थच्या सर्वच कविता गोड, मधुर रसानें भरलेल्या आहेत! – म्हणे माझी बहीण एमिलाईन आमच्या बागेंत बागडणाऱ्या फुलपांखराला – त्यांच्या पंखावर बसलेली धूळ प्रेमानें हळूच पुसायलासुद्धां बोट लावीत नसे! कां? तर आपल्या नखाचा स्पर्श होऊन त्या बिचाऱ्याचा नाजूक पंख कदाचित् दुखावेल – आणि त्याच्या आनंदाचा विरस होईल! अहाहा! वर्डस्वर्थ कवीची सृष्टि, म्हणजे जिकडे तिकडे आनंद आहे! धन्य तो कवि, आणि धन्य तो इंग्लंड देश! खरोखर, अशा कवीच्या अध्ययनानें खडक देखील मेण होऊन जाईल! मग माणूस तर – अरे! हें काय? या पुस्तकांत हा ढेकूण कोठून आला? – हां थांब चोरा! पळून जातोस काय? अस्सा! बरा सांपडलास! आतां जा, कसा पळून जातोस तो! तरी म्हटलें सकाळीं एवढें चावत काय होतें! द्यावें याला खिडकीवाटें टाकून नाहीं? – नको! नाहीं तर, तसें नको! कारण, हा पुनः घरांत येऊन चावेल! चिरडून टाकूं? इश्! हाताला उगीच घाण येईल अशानें! मग? – हां हां! या दिव्यांतल्या चिमणीवाटें द्यावा आंत फेकून! म्हणजे चांगला भाजून मरेल! पाहा, पाहा! कसा चिकटून बसला आहे तो! पडतो आहे का खालीं? स्स्! हाय! बोट भाजलें! पड खालीं – अस्सा! मर आतां! – कोण बाबू? जेवायची तयारी झाली! – चला तर लवकर. – आपल्याला काय, जेवण झाल्यावर आणखी वर्ड्स्वर्थ वाचूं!...”

१० जानेवारी १९१२

## २२. फाटलेला पतंग

दिवाकरांच्या प्रतिभेने नवी भरारी घेतली. ही त्यांची एक फार चांगली नाट्यछटा. हिचा विषय म्हटला तर दिवाकरांचेच आयुष्य. परंतु तसे म्हटले तर स्वतःच्या आयुष्याकडे अंतर्मुख होऊन पाहतानाच दिवाकरांना त्यातल्या वैफल्याची व्यापकता जाणवली. शोधून पाहता बहुसंख्य ध्येयवादी कलावंत, द्रष्टे यांची एकच गत आढळू लागली. त्यांच्या वृत्ती आभाळाच्याही मर्यादा ओलांडणाऱ्या; तर जगाचा क्षुद्र व्यवहार त्यांना खाली खेचीत असलेला, पाडीत असलेला, फाडीत असलेला. या व्यथित परंतु महान आत्म्यांची वेदना दिवाकरांनी एका फाटक्या पतंगाच्या रूपकाद्वारे या 'छटे'त परिणामकारकपणे मांडली.

पतंगाचा. अखेरचा गाऱ्हाणे व्यक्त करताना पडलेले लहानमोठे वाक्यांचे तुकडे, झालेली शब्दांची द्विरुक्ती रस-निर्मितीच्या दृष्टीने अभ्यासण्याजोगी आहे. ही हिशेबापेक्षा तद्रूपतेने साधली आहे. परंतु हिशेब नाहीच असे नव्हे. कितीही उत्स्फूर्त लेखन करताना चांगल्या लेखकातला कसबी जागाच असतो.

माणसे, प्राणी यांना 'छटा'च नायक-नायिका म्हणून वापरणाऱ्या दिवाकरांनी इथे पतंगासारखी निर्जीव वस्तूही सजीव आणि बोलकी बनवली आणि त्यांच्या 'महासर्प' किंवा 'मांजरी'पेक्षा ही छटेच्या तंत्रात चपखल बसलीही. कारण इथे पतंगाला केवळ एका साधनापलीकडे एका भव्य रूपकाचे महत्त्व होते आणि 'छटे'त मनःपूर्वकता होती, अव्वल प्रतिभाविलास होता.

"....छे! आतां कोठून मी धड व्हायला! अशा फाटलेल्या स्थितींतच फडफड - रडरड – करीत मला किती काल कंठावा लागणार आहे, तें एका ईश्वरालाच ठाऊक! अहो! नका! त्या आकाशाकडे पाहूं नका!

हर हर! हेंच निरभ्र आकाश निराशेची घरघर लागलेल्या प्राण्यालासुद्धां, गोड – सुंदर – अशीं मोठमोठीं स्वप्नें पाडून – बिचाऱ्याला नादीं लावून – कधीं म्हणून लवकर मरूं देत नाहीं बरें! अशा स्वच्छ आकाशांत, अमळ वारा आनंदानें खेळूं लागला कीं, अंतःकरणांत गुंडाळून ठेवलेली – सदैव आनंदाश्रु व दुःखाश्रु यांनीं भिजलेली माणसाची कल्पनाशक्ति – जगाच्या दुर्लक्षपणानें हूं म्हणतांच – जिवाला इतक्या कांहीं उंचच उंच भराऱ्या मारीत घेऊन जाते कीं, शेवटीं पश्चिमेच्या अंकावर अर्धवट झोंपी गेलेला सूर्य एकदम जागा होऊन विचारतो कीं, 'नभोमंडलांत माझ्यामागें इतक्या वैभवानें हा कोण बरें महात्मा तळपतो आहे?' – पण अरेरे! तो वैभवाचा क्षण आत्म्याला मिळतो – न मिळतो – तोंच 'ओढा खालीं – खालीं खेंचा! नाहीं तर तो वेडा होऊन, कोठें तरी भडकेल!' अशी एकच जगाची हाकाटी सुरू होते! मग काय खालीं जग, वर स्वर्ग, या उभयतांच्या जोरानें – अगदीं निकरानें – चाललेल्या ओढाताणीमध्यें बिचाऱ्या जिवाची – हाय! – किती भयंकर दशा होते म्हणून सांगूं तुम्हांला! नको! त्या दिवसाची – त्या स्थितीची आठवणसुद्धां नको! अहो! एके काळीं धड असलेला हा फाटका पतंग, अशाच जगाच्या व स्वर्गाच्या ओढाताणीमध्यें सांपडला होता बरें! अहाहा! किती सुखाचा – माझ्या पूर्ण भाग्याचा – दिवस होता तो! ब्रह्मानंदाकडे न्यायला आलेला शीतल वायु कसा अगदीं मिठी मारून कीं हो मला घेऊन चालला होता! जगाला मी पूर्ण विसरून – पण हाय! जग कोठें मला विसरलें होतें? माझी किंमत किती? पण तिचासुद्धां जगाला कांहीं केल्या लोभ सुटत नाहीं! शेवटीं! जग मला खेंचूं लागलें – 'स्वर्ग जातो! स्वर्ग जातो!' असें म्हणून मी मोठमोठ्यानें रडूं लागलों – अगदीं सुचेनासें होऊन संतापाच्या – सोसाट्याच्या – वावटळींत सांपडून धाडकन् –

या बाभळीच्या झाडावर येऊन आदळलों ! आतां हें फाटलेलें हृदय कधीं तरी धड होईल का हो ! – नाहीं ! नाहीं ! – नाहीं ! ! – उलट मी आतां दिवसानुदिवस अधिकाधिक असा विरतच जाणार ! अहो ! माझ्या स्थितीबद्दल रडूं नका ! आधीं ऐका ! एकदां धड असलेल्या पतंगाचें – या बाभळीच्या कांट्यावर बसून अहोरात्र रडणारें – कण्हणारें – फाटत चाललेलें पिशाच्च ! – काय सांगतें तें ऐका ! गर्वानें भराऱ्या मारूं नकोस ! भराऱ्या मारूं नकोस ! नाहींतर अस्सा फाटून – जन्मभर, जन्मभर – रडत वसशील !...."

७०८२

२६ जानेवारी १९१२

## २३. चिंगी महिन्याची झाली नाहीं तोंच ?

दिवाकरांची सर्वश्रेष्ठ मानली जाणारी नाट्यछटा. आजतागायत आपल्या शानीने मराठी साहित्याच्या वारंवार बदलत्या स्वरूपातही कायम टिकून राहिलेली. एकाच वेळी विचक्षणांना पटणारी आणि सामान्यांना भुलविणारी. लहानांपासून थोरांपर्यंत कोणालाही समजणारी, भुरळ घालणारी.

'चिंगी' या नावाची निवड, 'छटे'चा आरंभ, शब्दांची श्रेण, बालबोध योजना, बोलणाऱ्या स्त्रीच्या धाटणीने वाक्यांची रचना, मधून मधून आणलेला लाडिक तोरा, मनोराज्यातला भाबडेपणा आणि 'छटे'ची अखेर, या साऱ्याच गोष्टी आदर्श 'नाट्यछटे'ची लक्षणे म्हणून मुद्दाम पडताळण्याजोग्या आहेत.

तसे म्हटले तर या महिन्याभराची चिंगी आणि तिच्या आईची तिच्या लग्नाबद्दलची मनोराज्ये ही गमतीशीर विसंगती आहेच; परंतु या विसंगतीपोटच्या नाट्याबरोबरच दिवाकरांनी चिंगीच्या आईच्या मनोराज्यातून तिच्याच शब्दांत खुलविलेले तिचे अस्सल भाबडे व्यक्तिचित्र स्थलकालाच्या मर्यादा ओलांडूनही टिकणारे आहे आणि म्हणून तेच 'छटे'चा दर्जा वाढविण्याला फार उपयोगी पडले आहे.

"....काळी आहे का म्हणावें मी ? कशी गोरी गोरी पान आहे ! – हो हो ! आतां आमच्या चिंगीला सरी करायची, बिंदल्या करायच्या, झालंच तर वाळे, सांखळ्या, सगळे सगळे दागिने करायचे ते ! – कसा छानदार मग परकर नेसायचा, पोलकें घालायचें, अन् ठुमकत ठुमकत शाळेंत जायचें, नाहीं बाई ? – शहाणी होईल बबी माझी ! मोठीं मोठीं बुकं वाचील ! अन् मग महाराज छोनीचं आमच्या लगीन ! – खरंच सोने, तुला नवरा काळा हवा, कीं गोरा ? – का....ळा !

– नको ग बाई ! छबीला माझ्या कसा नक्षत्रासारखा, अगदीं चित्रासारखा नवरा मिळेल हो ! – अस्सें थाटाचें लगीन करीन, कीं ज्याचें नाव तें ! आहांत कुठें ! हजार रुपये हुंडा देईन, हजार ! ताशे, वाजंत्री, चौघडा – हो हो तर ! बेंडबाजासुद्धां लावायचा ! वरात पण वरात निघेल म्हणावें ! नळे, चंद्रज्योती, झाडें यांचा काय लकलकाट होईल ! – पण खरंच गडे चिंगे, तूं मग भांडायसवरायची नाहींस ना ? जर का घरांत भांडलीस, तर पाहा मग ! माणसाला कसं मुठींत ठेवायला हवं बरं का ? संसार पण संसार झाला पाहिजे ! आणि हें बघ, आपलें आधींच सांगून ठेवतें, पहिलं तुझं बाळंतपण की नाहीं, इथें व्हायला हवें ! पुढचीं करा हवीं तर खुशाल आपल्या घरीं ! – मोठी दैवाची होईल चिंगी माझी ! पुष्कळ मुलं होतील माझ्या बबीला ! पण काय ग, तुला मुलं झालेली आवडतील, का मुली ? मुली ! – नको ग बाई, कारट्यांचा मेला तो जंजाळ ! एकापेक्षां एक, असे सगळे मुलगे होतील म्हणावें, मुलगे ! – तसेंच, गाडी-घोडे, कपडा-लत्ता, कश्शा कश्शाला म्हणून कांहीं कमी पडायचं नाहीं ! – बरं बरं ! इतक्यांतच नको कांहीं चढून जायला ! मोठा दिमाख दाखवते आहे मला ! – पाहा, पाहा ! फुगते आहे पाहा कशी ! – पण कार्टे, बोलूं तर नकोस माझ्याशीं कीं अस्सा हा गालगुच्चा....अग बाई !....हें ग काय ! कसें सोन्यासारखें बोलतें आहें. अन् तूं आपली ... नाय ... नाय, उगी, उगी माझी बाय ती....”

२ फेब्रुवारी १९१२

## २४. अरेरे ! ओझ्याखालीं बैल मेला ! धांवा !

माणसाच्या कुडीतल्या मन नावाच्या पदार्थाची सदाची कुतरओढ हा दिवाकरांच्या लेखनाचा एक प्रमुख विषय होता. माणसाच्या सुखदुःखांचे, वरवरचे, अतिरिक्त आणि अलिप्त चित्रण करण्याच्या त्या काळात दिवाकरांनी नाटयछटेद्वारे केलेले हे मनोविश्लेषणाचे प्रयत्न बरेच वास्तव तर आहेतच, पण त्या काळाचा विचार करता धाडसीही आहेत, असे म्हटले पाहिजे. आजच्या मनोविश्लेषणप्रधान नवकथेची काही लक्षणे त्यामुळे दिवाकरांच्या नाटयछटांत तेव्हा उमलली. त्यातले एक : दुर्बोधतेचा भास निर्माण करणारी गूढता. आणि दुसरे : चित्तात उबग उत्पन्न करणारे ‘ रक्त ओकणारा हाडांचा सापळा ’ अशा पद्धतीचे अनोळखी शब्द-प्रयोग. तेव्हा तर हे जास्तच खकटले असतील, टीकास्पद ठरले असतील.

ही फार उत्तम ‘ छटा ’ आहे असे नव्हे. परंतु हिचे असलेले थोडेफार सौंदर्यही तेव्हा कोणास जाणवले नसेल. सरळ, साधे बैलाचे आत्मकथन म्हणून वाचले तर ‘ या बैलाने, चांडाळाने छळून कि हो मला मारले ! ’ या वाक्याने गोंधळ उडतो. बैलाचा आत्मा हे म्हणतो आहे असे मानले तर तो पुन्हा “ जिवा ! ” म्हणून कोणाला हाकारतो तेव्हा नवा गोंधळ होतो. आणि ‘ बैलाने मला मारले ’ या वाक्याचा अर्थही लागत नाही.

वास्तविक हे माणसाचे आत्मकथन आहे. लहानमोठ्या ऐहिक महत्त्वाकांक्षांपोटी प्रथम उत्साहाने, मग जिद्दीने आणि अखेर रक्त ओकत नाइलाजाने धपापणारा ‘ बैल ’ हा माणसाचा एक भाग; आणि वास्तविक यापासून अलिप्त असूनही ‘ रक्त ओकणाऱ्या हाडांच्या सापळ्यावर प्रचंड ओझी लादून तोंडाबाहेर दुःखांनी चघळून चघळून जिवाचा फेस काढीत फरकटणाऱ्या ’ बैलाच्या ठेचांनी अपरिहार्यपणे कळवळणारा आणि यातनांनी हळवा होणारा, मुळात जीवनाचा अधिक खोल आशय शोधण्यामागे रंगणारा, स्वप्नरंजनात गुंगणारा, काव्यात रमणारा, सौंदर्य लांबून पाहून संतुष्ट होणारा, चिंतनशील, मृदू, हळवा असा माणसाचा दुसरा भाग. हा दुसरा भाग या ‘ छटे ’त कासावीस होऊन, गुदमरून बोलतो आहे.

तरीही हे दोन भाग एकमेकापासून अलग, स्वतंत्र नाहीत, असूच शकत नाहीत, एकमेकांशी त्यांची कायमची कडी बसलेली आहे, म्हणून तर एकाच्या यातना दुसऱ्याला जाणवतात, प्राणांतिक वेदना देतात.

"...ओ ! आग लागो त्या महत्त्वाकांक्षेला ! आणि त्यांत तळमळणाऱ्या तडफडणाऱ्या या जीविताला ! अरे हा गळफांस काढा – खुंटी नरड्यांत शिरली ! जूं दूर करा – मी मेलों ! – या बैलानें, चांडाळानें छकून किं हो शेवटीं मला असें मारलें ! – नको ! ही यातनांची तीव्र ओढाताण ! देवा ! सोडीव आतां लवकर ! आयुष्याचा डोलारा कोसळला ! सोसाट्याच्या झंझावातांत जग गिरक्या घेऊं लागलें ! – विक्राळ अंधकारानें झडप घातली ! जीवा ! जिभेचा अडसर बाजूला काढ, – पाहतोस काय ! – कानावर लाथ मारून, नाहीं तर डोळे फोडून बाहेर नीघ लवकर ! हा ! नरकांतल्या धडाधड पेटलेल्या आगींत अनंत काल उभें राहणें पुरवलें, – पण अंगांत शक्ति नसूनहि, मोहक, आमुक अशा महत्त्वाकांक्षेच्या पुरें नादीं लागून, कर्रर – ओरडून रक्त ओकणाऱ्या हाडांच्या सापळ्यांवर प्रचंड ओझीं लादून, तोंडाबाहेर दुःखांनीं चघळून चघळून, जिवाचा फेंस काढीत, फरकटत ओढीत नेणारें, देवा ! हें जगांतलें बैलाचें जिणें नको ! अरे मूर्खा, अजागळा, रोडक्या बैला ! 'माझ्या इतर सशक्त सोबत्यांप्रमाणे मी आपल्या मानेवर मोठमोठीं ओझीं घेऊन डौलानें, गर्वानें छाती फुगवून – जगांत कां मिरवूं नये ?' असें पुनः एकदां वर मान करून मला विचार पाहूं ? आ वासून रस्त्यांत धूळ चाटीत, मरणाशीं ओढाताण करीत कां बरे बाबा असा लोळत आहेस ? – हाय ! असा हंबरडा फोडून रडूं नकोस ! माझी चूक झाली – राग मानूं नकोस ! ये, मला एकदां कडकडून शेवटची मिठी मारूं दे ! मग मी आनंदानें जाईन बरें !...."

१० फेब्रुवारी १९१२

## २५. कोण मेलें म्हणजे रडूं येत नाहीं !

दिवाकरांच्या संवेदनाक्षम मनात तत्कालीन सामाजिक अन्यायाची जाणीव आणि अन्यायाबद्दल एक चीडही होती, हे त्यांच्या नाटयछटांतून वारंवार येणाऱ्या काही काही विषयांनी, उल्लेखांनी आपल्याला मागेच जाणवले आहे.

आनंदी नावाची विधवा मरते. बिचारी सोळा-सतरा तर वर्षांची. पण इतर कोणी तर राहोच, पण तिची जन्मदात्रीसुद्धा शोक करीत नाही. उलट दोन वर्षे आधी जावई गेला तेव्हा केवढा 'आकान्त' माजला होता. या प्रसंगाचे एका जवळपासच्या बाईच्या तोंडून धावते वर्णन ऐकवताना दिवाकर एक वेगळा संभवही दर्शवितात. समजा, हीच आनंदी नवरा असताना मरती तर ? तर मुलेबाळे रडली असती तेवढीच; बाकी जग म्हणाले असते, "बरे झाले ! सवाष्ण मेली ! भाग्यवान आहे !" म्हणजे तेव्हाही कोणाला दुःख झाले नसते. तत्कालीन स्त्रियांच्या जिण्याचे मर्मभेदक दर्शन घडविणे एवढाच या 'छटे'मागचा हेतू होता. यातली विसंगती, विरोध आणि त्यापोटचे नाटय आहे ते मुख्यतः वैचारिक. यामुळेच ही 'छटा' एखाद्या प्रभावी निबंधाचा हेतू आपल्या आटोपशीर स्वरूपात तेवढ्याच प्रभावीपणे साधते आणि हेच हिचे वैशिष्टय.

"....कोण हो कोण ? – काय ! अव्वचितराव करकऱ्यांची सून ? आणि ती एकाएकीं कशानें हो मेली ? – वाऱ्यानें का ? बरें झालें हो ! सुटली एकदांची आपल्या दुःखांतून ! बिचारीचा नवरा वारल्याला दोन वर्षें व्हायला आलीं असतील नाहीं ? – बाई ! बाई ! ! केवढा आकान्त माजला होता त्या वेळेला या घरांत ! घरांतल्या बायकांच्या ओरडण्यानें सगळी आळी किं हो गर्जून गेली होती ! आणि आतां ? या सोळा-सतरा वर्षांच्या मुलीकरतां – आनंदीच नाहीं का हिचें नांव ? – बिचारीकरतां या घरांतलें एक चिटपांखरूं तरी आतां ओरडत आहे का ? – बरोबरच आहे ! नवरा मेलेली पोर ! हिच्या मरणाबद्दल हो कोणाला वाईट वाटणार आहे ! उलट जें तें हेंच म्हणणार कीं, 'विधवा मेली ना ? बरें झालें चला!

सुटली एकदांची ! ' इतकेंच काय, पण कितीएक तर असेंसुद्धां म्हणायला कमी करणार नाहींत कीं, 'बरें झालें ! आमच्या घरांतला अपशकुन—बरेच दिवस खिळलेली अवदशा लवकरच नाहींशी झाली ' म्हणून ! नवरा मेलेल्या बायका गेल्या, तर त्यांच्याबद्दल हें अशा तऱ्हेचें दुःख जगाला होत असतें ! – सवाष्ण मेली तर ? अहो कशाचें आलें आहे ! तिचीं लहान मुलेंबाळें जीं काय रडतील, गागतील तेवढींच ! बाकी जग तर हेंच म्हणतें, ' सवाष्ण मेली ? भाग्यवान आहे ! बरोबर कायमचें – अखंड ! सौभाग्य घेऊन स्वर्गाला गेली ! ! ' – हं, पाहिलें तर तें 'अखंड सौभाग्य ! ' नदींत तिच्या प्रेताची पुरती राख विरघळेपर्यंतसुद्धां टिकत नाहीं ! लागलीच दुसरी कोणी तरी पाठीमागून धांवत येऊन, झिंज्या धरून, पाठींत लाथ मारून, तें 'अखंड सौभाग्य ! ' बिचारीच्या हातांतून हिसकावून घेऊन, पुनः जगांत परत येतेंहि ! – खरेंच तर काय ! बायकांचें जगणें आणि मरणें सारखेंच ! – जगल्यास जगा ! मेल्यास मरा ! अहो नाहीं तर, या आनंदीच्या नवऱ्यासाठीं तिच्या सासू-सासऱ्यांनीं कसा पाण्यासारखा पैसा खर्च केला होता ना ? आणि आतां ? नाहीं, तुम्हीच समक्ष पाहिलें आहे म्हणून विचारतें ! अहो ! आनंदीचा नवरा जगावा म्हणून जशी यांनीं खटपट केली, तशीच ही एकदांची मरावी म्हणून यांनीं निष्काळजीपणाची खटपट केली असेल बरें ! – ती पाहा ! ती पाहा ! तिला बाहेर आणली आहे ! आई ! आई ! ! कशी कोंवळी पोर ! काय रे देवा हिला जगांत आणून हिची हौस पुरविलीस ? – तिला पाणी घातलेली तिची प्रत्यक्ष आईच ना हो ती ? – जांवयाकरितां कशी ऊर बडवून किं हो रडत होती ? आणि आतां ? – अहो, हिच्या पोटचा गोळा ना तो ? – पण नाहीं, ही मेली म्हणून तिला – प्रत्यक्ष आईलासुद्धां – मनांतून बरें वाटत असेल !..."

२० फेब्रुवारी १९१२

## २६. शेवटची किंकाळी !

दिवाकरांच्या स्वतःच्या मनात व्यथा कायम जळत असावी. त्यात वृत्ती मूळची हळवी. त्यामुळे भोवतालच्या साऱ्या व्यथा – माणसांच्या, प्राण्यांच्या, अगदी निर्जीव वस्तूंच्यादेखील – त्यांना दिसत, भासत. किंवा वाटल्यास असे म्हणू की, त्यांचीच व्यथा ते भोवतालच्या सजीव आणि निर्जीव सृष्टीत पाहात आणि ती सापडली की अधिकच हळवे होऊन ती मनात वागवीत, अनावर झाली की शब्दात मांडीत. अजाणता तिला एक व्यापक स्वरूप येई. एका मनाचा ठाव सोडून ती व्यथा दिवाकरांच्या शब्दांनी पसरत अनेकानेक मनांची होत असे. काहीतरी मूलभूत सांगू पाहात असे. आणि असे होई तेव्हाच ती 'छटा' असामान्य होत असे. आणि असे होत नसे तेव्हा 'छटे'ला एक मर्यादित सामान्य स्वरूप देई.

"ओझ्याखाली बैल मेला" ही या प्रकारची असामान्य 'छटा' आणि ही 'किंकाळी' ही सामान्य 'छटा'. प्राण्यांचे माणसांविरुद्ध गाऱ्हाणे यापलीकडे हिचा आशय पोहोचत नाही. तसा तो पोहोचण्याचा जाणता प्रयत्नही दिसत नाही. केवळ एक चांगली, हळवी 'छटा' यापलीकडे हिचे वर्णन करता येणार नाही.

"...कसें कोवळें ऊन पडलें आहे पण! अशा वेळेला नाचण्या-बागडण्यानें जिवाला किती आनंद वाटतो! – हो, हा माझा देह सडलेला असला म्हणून काय झालें? जीव कोठें सडला आहे, आणि या कुत्र्याच्या आयुष्याला कंटाळला आहे? – अरे! आज असें छातींत धसके बसल्या-सारखें काय होत आहे? मघाशीं त्या माणसानें हंसत हंसत माझ्यापुढें काय वरें खायला टाकलें होतें? – असेल कांहीं तरी! गोड होतें ना? झालें तर! – रात्रभर या देहाला ओरबडून – कुरतडून – खाणाऱ्या यातना जर आतां अमळ थकून भागून निजल्या आहेत, तर आतां मजेनें इकडे तिकडे फिरायला काय हरकत आहे? – चला! जरा त्या बाजूला धांवत धांवत जाऊं! – क्या! क्या!! – अरे, सोड मला, इतक्या

जोरानें – कडकडून – चावूं नकोस ! सोड मला ! ! – हंसत आहे कोण ? मला कासावीस होऊन ओरडतांना ऐकून, कोणाचें बरें राक्षसी हृदय खिदळलें हें ! – अरे ! हा तर रस्त्यांतून खरडत – खरडत – गांवांत भीक मागत फिरणारा तो महारोगी ! काय रे ए ! पांगळ्या – सडक्या – महारोग्या ! माझें ओरडणें ऐकून तूं कां रे असा खदखदां हंसलास ? काय ? – काय म्हटलेंस ? मला गोळी – विष – घातलें आहे ! आणि मी आतां मरणार ? अस्सें ! – पण मीं – आ ! माझ्या मस्तकावर व छातीवर उभें राहून कोण बरें मला एकसारखें दडपतो आहे ? – पण मी कोठें आधीं मरायला तयार होतों ? माझी इच्छा नसतांना मला कां मारलें रे ? – तुम्हीं माणसांनीं माझा कां जीव घेतला रे ? काय ? – थांब ! पुनः – पुनः बोल ! माझा त्रास होतो म्हणून मला मारलें ? आपल्या वेदनांनीं विव्हळ होऊन मी रात्रभर रडत होतों – तुम्हांला त्रास देत होतों – म्हणून मला विष घातलें ? मी पिसाळेन ? तुम्हांला चावेन ? म्हणून माझा जीव घेतला ? होय ! – आणखी काय म्हटलेंस ? माझ्या जिवाला होत असलेल्या यातना तुम्हांला पाहवत नाहीत म्हणून मला विष चारलें ? बरें तर ! आपल्या जगण्यानें जर इतरांना त्रास होतो तर कशाला उगीच जगा ? – पण हो ! काय रे महारोग्या ! माझ्याप्रमाणें तूंहि सडलेला नाहींस का ? माझ्याप्रमाणें तूंहि नाहीं कां आपल्या रडण्यानें – गागण्यानें – जगाला त्रास देत ? आपल्या भटकण्यानें तूं नाहीं का गांवांत महारोग पसरवीत ? तुझ्या यातनांची नाहीं जगाला कींव येत ! आणि माझ्या यातनांची तेवढी येते काय ? – आ ! आ ! ! मला भाजलें ! मला जाळलें ! हा ! – दुष्टा ! चल, नीघ येथून ! – अरेरे ! या जगांत देहानें तडफडून सडणारीं – मनानें पिसाळलेलीं – एकमेकांचे हंसत हंसत गळे कापणारीं भयंकर माणसें – किती ! – कितीतरी सांपडतील ! – कां नाहीं – त्यांना कां नाहीं गोळी घालून – विष घालून – जाळून पोळून मारीत ? – नाहीं ! तसें नाहीं ! अरे कुत्र्या ! तीं माणसें ! – ईश्वराचीं लाडकीं

शहाणीं माणसें आहेत ! जग त्यांचें आहे ! तुम्हां कुत्र्यांचें नाहीं ! समजलास ! नाहीं सोसवत मला या यातना ! देवा ! मला लवकर तरी मरूं दे रे ! अरेरे ! नासलेलीं कुत्रीं जशीं मारतात–तशीं नासलेलीं माणसें गोळ्या घालून कां नाहीं ठार करीत ! – दाबला ! माझा गळा कोणीं दाबला ! – अरे कुतरड्या ! माणसाशीं बरोबरी करूं नकोस ! बरोबरी करूं नकोस ! – अरे ! मनुष्यदेहांत प्रत्यक्ष परमेश्वरानें अवतार घेतलेले आहेत ! तुम्हां कुत्र्यांमध्यें कधीं – कधीं तरी त्यानें अवतार घेतला आहे का ? मग ! – आदळ ! आपट आपलें टाळकें एकदांचें या दगडावर ! – जिवाला त्रासून जर आपण होऊन कोणी माणूस मेले, तर परमेश्वर त्याला अनंत काल नरकांत लोटतो – नरकांत ! इतकी मनुष्यानें आपल्या जिवाची – आपल्या वर्तनानें ! – ईश्वराजवळ किंमत वाढवून ठेवलेली आहे ! ठाऊक आहे ! – अहा ! कसा तडफडत आहेस आतां ! – नासलेलींच काय ! – पण चांगलीं – चांगलीं कुत्रींसुद्धां मारून टाकूं ! हो ! – नासलेलीं माणसेंसुद्धां नाहीं मारायचीं आम्हांला ! मग – ओरड ! लागेल तितका ओरड ! – मनुष्याची शारीरिक असो ! – किंवा मानसिक असो ! ती घाण – तो गाळ – आम्हांला काढायचा नाहीं ! तर तो जतन करण्याकरितां आम्ही अनेक संस्था काढूं ! लागतील तितके आश्रम काढूं ! पण तीं जपून ठेवूं ! जपून ! हें जग कुत्र्यांसारख्या भिकार प्राण्यांकरितां नाहीं ! निव्वळ माणसांकरितां आहे ! माणसांकरितां – जा ! चालता हो ! – असें काय ! आम्हां कुत्र्यांकरितां हें जग नाहीं काय ? ठीक आहे ! ठीक आहे ! प्रत्येक गोष्टीला अंत आहे ! तर याद राखून असा – याद राखून ! कीं आम्ही कुत्रींहि कधीं तरी जगाचे मालक होऊं ! क्या क्या ! ! आणि मग तुमचीं हृदयें फाडून – नरड्यांचा कडकडून चावा घेऊन रक्त पिऊं – रक्त ! कधींहि सोडणार नाहीं ! – क्या ! !…. ”

२९ फेब्रुवारी १९१२

## २७. पाण्यांतील बुडबुडे

'मग तो दिवा कोणता?', 'दिव्याभोवती पतंग उडत आहेत', 'फाटलेला पतंग' या स्वरूपाची ही रूपकात्मक नाट्यछटा. मागल्यासारख्या केवळ करुणरसप्रधान 'छटां'नंतर दिवाकरांच्या नाट्यछटांचा हा आणखी एक, काहीसा वेगळा वर्ग. काहीसा म्हणण्याचे कारण वर उल्लेखिलेल्या तीनही 'छटां'त रूपकाद्वारे पुन्हा माणसाच्या व्यथेचीच वेगवेगळी दर्शने दिवाकरांनी घडविली आहेत.

ही नवी 'छटा' मात्र रूपकात्मक असूनही वेगळी आहे. हिचे स्वरूप काव्यमय, चिंतनात्मक, संथ आहे. इतके संथ की, हिच्यात फारसे नाट्य नाहीच; थोडेसे आहे ते वर्णनाच्या शैलीत आहे – पाण्यातल्या बुडबुड्यासारखेच.

बुडबुडे आणि माणसे यांची ही तुलना. त्या अनुरोधाने माणसाबाबत काही विचार ही नाट्यछटा तिच्यातल्या हळुवारपणाने, सूचक, बोलक्या शब्दांनी, तरल काव्यमयतेमुळे तत्कालीन कवितेलाच जवळची वाटते.

कविता सुचण्याऐवजी नाट्यछटाकार दिवाकरांना कविता नाट्यछटेच्या आकारात सुचली, इतकेच.

"....अग यमे! इकडे, इकडे ये! बघ कशी इथं गंमत दिसते आहे! ये, या हौदाच्या कांठावर बसूं अन् थोडा वेळ मौज तर पाहूं! – अबब! किती तरी बुडबुडे हे! तोटीचें पाणी हौदांत पडतेंच आहे, नवे बुडबुडे निघत आहेत, जुने फुटत आहेत, सारखा चालला आहे गोंधळ! – काय ग! इथं आपण बसल्यापासून किती बुडबुडे निघाले असतील, अन् किती फुटले असतील? शंभर, पांचशें का हजार? – किती सांग कीं! – काय, नाहीं सांगतां येत? हेट्! फजिती झाली तुझी! हः हः हः! केवढा बुडबुडा आतां कांठाजवळ येऊन फुटला ग! चांगला

लिंबाएवढा होता कीं ! — पण एवढा मोठा व्हायला किती तरी लहान, निदान तीसचाळीस तरी, एकमेकांत मिसळावे लागले असतील नाहीं ? — गंमतच आहे ! पहिल्यानें कसा अगदीं बारीक असतो ! आणि हळूहळू पुढें जायला लागला कीं, येईल त्याला ममतेनें आपल्यांत मिसळूं देतो ! शेवटीं तोच बुडबुडा — बरें का यमे — रुपयाएवढा, नाहीं तर उगवणाऱ्या सूर्याइतका किंवा चंद्राएवढासुद्धां मोठा होतो ! — हो, सगळेच मोठे होत आहेत ! आतां तूंच बघ कीं, निघाल्यापासून कांठाला येऊन फुटेपर्यंत जस्सेच्या तस्से — मोठे नाहींत अन् लहान नाहींत — अगदीं तिळाएवढाले बारीक किती तरी निघत आहेत अन् फुटत आहेत ! अग, आतांपर्यंत लाखों निघाले असतील ! पण त्यांत मोठे होऊन, काठां-वर शांतपणें डोकें ठेवून फुटलेले किती होते ? एक, नाहीं तर दोन ! संपलें ! बाकीचे काय ? लडबड लडबड करतात, घाईनें मोठे होतात, — अन् फटाफट फुटतात ! आणि कांहीं तर भारीच वाईट ! एखादा बिचारा कुठें चांगला मोठा व्हायला लागला कीं, त्यांत हे हळूच शिरतात, आणि त्यालाहि फोडून टाकतात, अन् आपणहि फुटतात ! — पाहा, पाहा यमे, आतां नीट पाहा अं ! कसा बुडबुडा एकसारखा मिसळत आहे तो ! — अरे वा ! चांगला रुपयाएवढा झाला कीं ! चालला, बघ, कांठाकडे चालला ! मिसळले ! आणखी तीनचार येऊन मिळाले ! ओहो ! कसा खिशांतल्या घड्याळाएवढा झाला आहे ग !—आला कांठाकडे — अहा ! — पाहिलेंस यमे ! कसा सूर्यानें त्याच्या डोक्यावर हिऱ्यांचा मुकुट घातला आहे तो ? — आला, टेकला कांठाला येऊन !....''

१५ एप्रिल, १९१२

## २८. रिकामी आगपेटी

आणखी एक ‘ रूपक ’. परंतु नाट्यछटेचा दिवाकरांच्या लेखणीने घडविलेला साचा इथे त्यांनीच मोडून वाढविलेला आढळतो. तरीही ही ‘ नाट्यछटा ’च की काय याविषयी त्यांच्याही मनात गोंधळ असावा, कारण त्यांच्या रोजनिशीत हिचा ते ‘ निपात्री संवाद ’ असा उल्लेख करतात.

केवळ एवढे वैचित्र्य म्हणूनच ही अभ्यासण्याजोगी आहे. नाट्यछटा आणि नाटुकले यांच्या अधेमधे कुठेतरी हिचे स्वरूप बसेल.

जगाचे स्वरूप कितीतरी विविध आहे. दर दृष्टीगणिक ते वेगवेगळे दिसते, हे दिवाकरांना सांगायचे आहे. यासाठी आगपेटीतल्या सत्तर काड्यांचे रूपक.

वीस काड्यांनी आपआपला अनुभव सांगताच दिवाकरांना लांबण जाणवू लागते आणि ते एक शेवट घडवितात : आगपेटीचे चिरडणे.

“....हाय रे दैवा ! सत्तर मुलें !—पण सगळीं मला टाकून गेलीं ना ! बाळांनो ! अरे माझ्या छबकड्यांनो ! या ! जेथें असाल तेथून धांवत येऊन मला – आपल्या आईला – एकदां तरी कडकडून भेटा रे ! – काय ! काय म्हणतां ? माझीं सगळीं लेंकरें मरून पडलीं आहेत ? – हाय ! अहो आणा ! मी आपल्या पायां पडतें ! पण कसेंहि करून त्यांची व माझी एकदां तरी भेट करवा ! त्यांच्या मुखाचें मला शेवटचें चुंबन घेऊं द्या ! – मरायच्यापूर्वीं त्यांचे दोन गोड शब्द तरी माझ्या कानीं पडूं द्या ! – हाय ! त्यांची व माझी आतां मुळींच भेट व्हायची नाहीं ! ते स्वर्गाला जायला निघाले आहेत ? कोठें आहेत ? अरे बाळांनो ! थांबा ! आपल्या आईशीं जातां जातां दोन शब्द तरी बोला ! –

अगबाई ! एकाएकीं हा कसला बरें गोंगाट सुरू झाला ? काय ? माझीं मुलें आलीं ? कोठें आहेत तीं ? मला नाहीं का हो दिसायचीं तीं ? नुसतें त्यांचें बोलणेंच मला ऐकूं येईल ? थांबा ! बाळांनो ! अरे, असा गलका करूं नका ! एक एक जण बोला ! – काय म्हटलेंत ? जगामध्यें गेलां होतां ? अस्सें का ? जगामध्यें काय पाहिलें ? कसें आहे जग ? बाळांनो ! अशी गर्दी करूं नका ! – सांगा ! नीट सांगा !

'१ – जग कसें आहे म्हणतेस ? अग आई ! जग म्हणजे भयंकर काळोख आहे काळोख ! आणि काय सोसाट्याचा वारा तो ! अरे राम ! नको रे बुवा पुन्हां आपल्याला तें जग !

२ – नाहीं ग आई ! हा कांहीं तरीच सांगत आहे झालें ! मी सांगूं का तुला जग कसें आहे तें ? जग म्हणजे निव्वळ चंद्रप्रकाश आहे ! चंद्रप्रकाश ! काय ती रमणीय बाग ! अहाहा ! पुष्पांच्या मधुर सुवासानें माझा जीव कसा अगदीं आनंदानें गुंग होऊन गेला होता !

३ – खरेंच ! जगांतल्या विड्यांच्या धुरानें व शौचकूपांतील नरकाच्या घाणीनें माझा जीवसुद्धां अगदीं गुंग होऊन गेला होता ! ओकून ओकून माझी कोण पुरे वाट झाली ! आणि हा म्हणतो जग मधुर सुवासानें भरलेलें आहे !

४ – कांहीं नाहीं ! सगळें खोटें आहे ! जिकडे तिकडे पाणीच पाणी ! आणि मध्यें एक दीपगृह ! याशिवाय जगांत दुसरें तिसरें कांहीं-सुद्धा नाहीं !

५ – अरे काय सांगत आहांत तरी काय तुम्ही ? आई, यांचें तूं कांहींसुद्धां ऐकूं नकोस ! अबब ! काय ती लक्षावधि माणसांची धांवपळ ! सारख्या आगगाड्या येत होत्या आणि जात होत्या ! त्यांच्या त्या कर्कश ओरडण्यानें व माणसांच्या गोंगाटानें ती प्रचंड इमारत कशी अगदीं गुदमरून गेली होती ! छे ! छे ! माझें डोकें तर अगदीं फिरून गेलें होतें !

६ – ठेवलीं आहेत लक्षावधि माणसें! जगामध्यें काय तो एकच मनुष्य आहे! आई, जगांत जिकडे तिकडे डोंगरच डोंगर आहेत! अहाहा! काय तें सुंदर व लहानसें देऊळ! प्रत्यक्ष शांततादेवीच तेथें वास करीत आहे!

७ – कांहीं नाहीं! जग म्हणजे निव्वळ सडकी घाण आहे घाण! अनंत रोगांनीं कुजविलेल्या देहांतील घाण उपसणें किंवा प्रेतें फाडणें येवढेंच काय तें जगामध्यें आहे!

८ – नाहीं – नाहीं! जग म्हणजे दारू आहे दारू! बीभत्स गाणीं, हंसणें – खिदळणें – नाचणें –

९ – अरे वा! हा तर नाचायला लागला कीं! अरे वेड्या! जगांत तुरुंगाशिवाय दुसरें तिसरें कांहींसुद्धां नाहीं! अरे बाप रे! काय तो आरडाओरडा! आणि काय ते रक्ताच्या चिळकांड्या उडविणारे – व उघड्या देहावर तडातड उडणारे भयंकर फटकारे ते! नको रे बुवा! आठवण झाली कीं कसे शहारे येतात अंगावर!

१० – आई! जग म्हणजे नाटक आहे नाटक! पोटाची खळगी भरण्याकरितां हंसणें खोटें! रडणें खोटें – आणि प्रेम करणेंहि पण खोटें! समजलीस!

११ – छे! छे! भलतेंच कांहीं तरी! सुस्वर वाद्यें – मधुर गायन आणि शुद्ध पतिपत्नीप्रेम – यांनींच सर्व जग व्यापलें आहे! हार्मोनियम वाजविणाऱ्या पतीच्या मानेभोंवती प्रेमानें आपला उजवा हात टाकून व डाव्या हातानें मुलाला कडेवर घेऊन, मधुर कंठातून सकल विश्वावर गायनामृत सिंचन करणाऱ्या त्या प्रेमळ पत्नीला पाहून मला किती आनंद झाला म्हणून सांगूं तुला! – आई! –

१२ – संपलें कीं नाहीं चऱ्हाट अजून तुझें! खून! विश्वासघात! यांनीं सगळें जग भरलें आहे ठाऊक आहे! अरे, मॅकबेथ नाटकाच्या

दुसऱ्या अंकांतील दुसरा प्रवेश वाचून पाहा, म्हणजे समजेल मी काय म्हणतों तें !

१३ – कांहीं नको वाचायला ! अरे भाऊ, श्रीरामचंद्राशिवाय या जगांत दुसरें कांहीं तरी आहे का ? अहाहा ! काय तें भव्य देवालय ! हजारों स्त्रीपुरुषांच्या हृदयांतून बाहेर पडलेला केवढा तो रामनामाचा प्रचंड गजर !

१४ – निवळ कत्तलखाना ! निर्दय खाटकांनीं – रक्तांनीं भरलेल्या मोठमोठ्या सुऱ्यांनीं – व दुष्ट मांसाहारी लोकांनीं सर्व जग व्यापलें आहे, ठाऊक आहे ! नको ! माणसाच्या तीव्र क्षुधेवर कापायला आणलेल्या निरुपद्रवी पशूंच्या आत्म्यांनीं काढलेला भयंकर रुदनस्वर ऐकणें नको !

१५ – हा ! हा ! हा ! अरे वेडयांनो ! जग म्हणजे एक सर्कस आहे सर्कस ! पशूंनींच काय, पण माणसांनींसुद्धां, त्या लहानशा वर्तुळामध्यें जगाच्या नियमाप्रमाणें वावरलें पाहिजे ! जरा कोठें चुकायचा अवकाश, कीं बसलेच चाबकाचे फटकारे अंगावर ! तेथें स्वच्छंदीपणाला यत्किंचित्सुद्धां वाव नाहीं ! हो !

१६ – कांहीं तरी सांगत आहेस झालें ! सद्गुणी आत्म्याचा छळ आणि आत्महत्या, यांनींच सगळें जग भरलें आहे ! ‘ नाहीं रे देवा आतां मला हा छळ सोसवत ! ’ असें रडत रडत म्हणून त्या गरीब बिचाऱ्या बालविधवेनें कशी धाडकन् विहिरीमध्यें उडी टाकली पण ! जग म्हणजे छळ, निराशा –

१७ – आग ! आग ! अरे बाबा, सगळें जग आगीमध्यें होरपळून – भाजून – मरत आहे ! मनाला – जिवाला – शेवटीं देहालासुद्धां आग लागते आग ! शिव ! शिव ! केवढा तो भयंकर अग्नीचा डोंब – चार-पांचशें माणसें कशीं ओरडून – ओरडून – तडफडून – अखेरी मेलीं पण !

१८ – नाहीं ग आई! ईश्वरभक्तीशिवाय जगांत दुसरें कांहींसुद्धां नाहीं! महात्मा ख्राइस्टच्या तसबिरीजवळ गुडघे टेकून – हात जोडून – आणि नेत्र मिटून बसलेली व शांत अशा ईश्वरी प्रेमानें बुडून गेलेली ती चौदा-पंधरा वर्षांची बालिका मीं पाहिली मात्र! – अहाहा! त्या वेळेस मला केवढी धन्यता आणि किती आनंद झाला म्हणून सांगू तुला! आई –

१९ – अहो धांवा! डेस्डिमोनेचा खून झाला? कॉर्डेलिया फांसावर चढली! पांखरें मेलीं – वणवा पेटला! धांवा! धांवा!! हाय! जगांत अन्याय! अन्याय!

२० – हा! हा! हा! अरे वेड्यांनो! जग मुळीं नाहींच आहे! हं! कसला अन्याय! आणि कसची ईश्वरभक्ति!

इतर मुलें – नाहीं! तूं खोटें बोलतोस! जग आहे! आम्ही सांगतों जग कसें आहे तें! ऐका! ऐका! गलका करूं नका! ऐका!

आगपेटी – बाळांनो! अरे थांबा! असा गोंगाट करूं नका! हं! सांगा! नीट पुनः एक एक जण सांगा! कसें आहे म्हटलेंस जग? सगळाच गोंधळ! एकाचेंहि सांगणें दुसऱ्याच्या सांगण्याशीं मुळींच जुळत नाहीं! खरें तरी कोणाचें मानूं! – आणि खोटें तरी कोणाचें समजूं! काय म्हटलेंस? तूं सांगतोस खरें जग कसें आहे तें? बरें तर सांग पाहूं – आई! आई! मेलें! मेलें! कोणी चांडाळानें मला पाया-खालीं चिरडली! मी मेलें!!...”

१३ मे १९१२

## २९. पंत मेले–राव चढले

नाटयछटेच्या आपणच घडविलेल्या साच्याबाहेर सरकण्याची दिवाकरांची ऊर्मी वारंवार उसळत होती. मनचा आशय साच्यात सामावण्याला नाराज होता. पुन्हा हा नवा प्रयत्न. या 'छटे'चे दिवाकरांनी आशयाच्या सोयीसाठीच दोन भाग–खंड–प्रवेश–अंक–काहीही म्हणावे–लिहिले. मागल्या प्रयत्नात साचा मोडण्याची अपरिहार्यता पटत नाही, आणि साचाही 'छटे'चा म्हणून पटत नाही. आशयाला भरीव-पणा नाही, आणि अखेरीची कृत्रिमता जाणवते. इथे हे सर्व दोष नाहीतच, पण आशय आणि 'छटे'ची नवी घडण यांचा मेळ इतका सुंदर आणि समर्थ बसला की, दिवाकर आणखी एक श्रेष्ठ नाटयछटा लिहून गेले.

पहिल्या भागातले कारुण्य आणि लागलीचच्या दुसऱ्या भागातला हर्ष यातला विरोध इतका स्पष्ट आणि तीव्र साधला आहे की, दिवाकरांना अभिप्रेत असलेला आशय वाचकांच्या अंतःकरणात चाकूसारखा रुतून बसतो. माणसाच्या जिण्याची क्षणभर मनस्वी कीव येते. उद्वेग येतो. या दोन्ही भागांत जवळजवळ त्याच तशाच शब्दांची दिवाकरांनी केलेली वेग-वेगळी पेरणी बारकाईने अभ्यासली, फरक लक्षात घेतले, तर रसनिर्मितीचे नाटककाराचे कसब त्यांच्यात केवढ्या दांडग्या प्रमाणावर होते ते दिसून येईल.

वेगळ्या अर्थाने, रसनिर्मितीचा हा एक वस्तुपाठच मानला जावा.

**[ पंतांच्या घरीं ]**

"....असें काय ? सोड मला ! चिमणे, असें वेड्यासारखें काय करावें ! रडतेस काय ? जा ! दार लावून घे – घरांत आपला गोपूबाळ निजला आहे ना ? त्याच्याजवळ जाऊन बैस हं ! रडूं नकोस, जा ! – आई

आबासाहेबांकडे भात सडायला गेली आहे, ती आतां इतक्यांत परत येईल! जाऊं मी? रडायची नाहींस ना? भूक लागली आहे म्हणून का तूं रडतेस? – असें काय? चिमे, मी येईपर्यंत तूं अगदीं गप रहा हो! – आईनें दळून ठेवलेलें हें पीठ यमुनाबाईच्या घरीं पोंचवितों आणि तसाच माधुकरी मागून मी लवकरच परत येतों! मग माझ्या ताईला भात, वरण, भाकरी – माधुकरी म्हणजे काय? ताई! माधुकरी मागणें म्हणजे भीक मागणें हो! – लोक आपल्याला भिकारी म्हणतील? म्हणूं दे! बाबा देवाच्या घरीं गेले आहेत; त्यांनीं देवाला सांगितलें म्हणजे मग देव आपल्याला श्रीमंत करील! – बाबा केव्हां येतील? छे! ते आतां कुठले यायला! हें बघ ताई! तूं बाबांच्यावद्दल पुनः कधीं आईला विचारूं नकोस हो! ती किं नाहीं लागलीच रडायला लागते! कोण? केव्हां आलीस? हें ग काय आई! – आई! आई!! कां ग अशी एकदम मोठमोठ्यानें रडायला लागलीस? मी माधुकरी मागायला जातों म्हणून? होय? – पण आई? तूं नाहीं का ग लोकांचीं भांडीं घाशीत – दळण दळीत – धुणें धुवीत? तसेंच मी – आई! गोपू उठला वाटतें. जा तूं आतां घरांत! – मी आज नको जाऊं म्हणतेस? कां बरें? ऊन फार पडलें आहे, आणि माझे पाय फार पोळतील म्हणून? असूं दे कीं! मी पळत पळत जाऊन लवकर परत येतों! जर आतां मी गेलों नाहीं तर गोपू, चिमी, तूं, मी, सगळेजण आपण भूक लागून रडायला नाहीं का लागणार? मग आपल्याला कोण बरें खाऊं घालील? आई? मी आत्तां जाऊन येतों, सोड मला!...."

[ रावांच्या घरीं ]

"....खाऊ! अरे पेढे आणले आहेत पेढे! थांबा, थांबा! अशी घाई करूं नका! सगळ्यांना देतों बरें मी! आधीं देवाला नैवेद्य दाखवूं! आणि मग – हो, हो! तुला आधीं देईन सोने मी! मग तर झालें! –

पाणी आणलेंस ? शाबास ! हं, सोने, बापू, देवाच्या पायां पडा, आणि म्हणा ‘ जय देवबाप्पा ! असेच सुखाचे दिवस आम्हांला वरचेवर दाखवीत जा ! ’ – अस्सें ! शाबास ! हं, हे घे ! सोने, तुला चार, आणि हे बापू तुला चार, झालें ना आतां ? कोण आहे ? रामभाऊ ? अरे वाः ! तुम्ही तर अगदीं वेळेवर आलांत बुवा ! हं, हें घ्या.– आधीं खा मुकाट्यानें ! मग कारण विचारा ! मला पांच रुपये प्रमोशन झालें, पगार वाढला, त्याचे हे पेढे ! समजलें ! अरे बापू ! आतां हे आंत घेऊन जा ! आणि इकडे बघ, आपल्या त्या गोविंदरावांना, आप्पासाहेब कर्व्यांना, झालेंच तर माडीवरच्यांना सगळ्यांच्या घरीं आतांच्या आतां जाऊं द्या म्हणावें ! समजलें ना ? नको, नको, मला नको ! अहो, हपिसांत मीं पुष्कळ खाल्ले आहेत ! – मंडळी ऐकेचनात ! तीन रुपयांचे पेढे द्यावे लागले मला ! – म्हटलें जाऊं द्या ! मंडळी आपली आहेत ! आणि पुनः असे आनंदाचे प्रसंग वरचेवर थोडेच येत आहेत ? – बरें झालें चला ! इतके दिवस आशेनें रात्रंदिवस वाट पाहल्याचें परमेश्वरानें शेवटीं सार्थक केलें ! अहो, पंधराचे वीस व्हायला सहा वर्षें लागलीं – सहा वर्षें ! नुकतेच आमचे दिवाकरपंत मेले, आणि त्यांची ही जागा मला मिळाली, बरें ! – असो, ईश्वराची कृपा होती म्हणून हे तरी दिवस दिसले ! हो ! करतां काय ? – बरें आपण आतां मुंबईला कधीं जाणार ? – रविवारींच ना ? मग हरकत नाहीं ! कारण मीं परवांच्या दिवशी श्रीसत्यनारायणाची पूजा करण्याचें योजिलें आहे ! तेव्हां म्हणतों, प्रसाद घेऊन मुंबईला जा ! – ठीक आहे ! अहो, परमेश्वराची कृपा असली तर उत्तरोत्तर आपल्याला आणखीहि असेच सुखाचे दिवस येतील ! काय ? म्हणतों तें खरें आहे कीं नाहीं ?....”

१७ मे, १९१२

## ३०. झूट आहे सब ! –

श्रद्धाळू वृत्तीच्या दिवाकरांनी एका अश्रद्ध माणसाचे नाट्यछटेच्या चौकटीत रेखाटलेले हे व्यक्तिचित्र.

व्यक्तिचित्र जिवंत वठूनही, नाट्यछटेला किंवा कोणत्याही ललित लेखनाला हवा तो हेतू त्यामागे शोधूनही सापडत नाही, आणि दिवाकरांच्या रोजनिशीतल्या एका टिपणाचा विस्तार एवढेच सामान्य स्वरूप त्याला उरते.

"...किती ? – बारा वाजले ! – हेः ! भलताच उशीर झाला आपल्याला ! वाद करायला बसलें, कीं वेळेचं भानच राहात नाहीं बोवा ! – अरे असें काय ! चार कोळसे टाक आणखी बंबांत कीं आतां – हां हां म्हणतां – पाणी तापेल ! उगीच वेळ गेला झालं ! बरं, इतका काथ्याकूट करून निष्पन्न कांहींच नाहीं ! – ओ हो ! काय ठिणग्या उडाल्या रे या ! ती पाहा ! किती उं – च उडाली आहे ! – पण आ – लीच शेवटीं खालीं ! – लहानपणीं विझली काय, किंवा मोठे-पणीं – उंच जाऊन विझली काय, दशा शेवटीं एकच ! – म्हणजे फरक जगली किती हाच काय तो ! एकदां ठिणगी विझली – लक्षांत आलं का ? – प्राणी मेला, कीं संपलं सगळं ! – हो हो, सगळं संपलं ! – नाहीं रे बोवा ! कांहीं पुनर्जन्म नाहीं, अन् कांहीं नाहीं ! – असतं तसं कांहीं, तर तुझा तो शेक्सपीअर नसता का आला पुन्हा ? चक्क येऊन सांगितलं असतं कीं, 'हीं नाटकं माझीं आहेत, मीं लिहिलेलीं आहेत ! कांहीं कुणा बेकनचा अन् फिकनचा संबंध नाहीं !' कशीं छान सुंदर नाटकें ! – आणि तींहि कांहीं थोडींथोडकीं नाहींत ! – सोडील होय कोणी ! – पण पत्ताच जिथं नाहीं त्याचा, तेव्हां तो पुन्हा येतो कशाचा

अन् जातो कशाचा ! – हो हो, आहे ना स्वर्गांत ! जा, आणा जाऊन मग ! ठेवला आहे, स्वर्ग अन् नरक ! थोतांडं सगळीं ! – अरे कुठला घेऊन बसला आहेस आत्मा ! – काय, आहे तरी काय तो ? – वारा ? का प्रकाश ? – हां, वाऱ्यामध्यें किंवा प्रकाशांत मिसळणें, हें जर तुमचें स्वर्गानरकाला जाणं असेल, तर मात्र कबूल ! कारण मग राजश्री मनोविकार कुठले आले आहेत तिथं ! – तें कांहीं नाहीं ! तुमचा तो आत्मा कीं नाहीं, देहांत आहे तोंवरच त्याची प्रतिष्ठा ! हो मग ? नाहीं कुठं म्हणतों आहें मी ! देहाचंहि तेंच आहे ! दोघं जोंपर्यंत एकत्र तोंपर्यंत तीं एकमेक जिवंत ! – मेलं कीं दोन्हींहि गेलीं पार ! मागमूस नाहीं कुठं मग ! – तेंच तर बाबा म्हणतों आहें मी, कीं जेवढे म्हणून प्राणी जन्माला येतात ते सगळे इथून तिथून नवीन ! आणि शेवटहि त्यांचा – बरं का ? शेवटहि पुन्हा सगळ्यांचा एकच ! – मग पाप करा, नाहींतर पुण्य करा ! – स्वर्ग, नरक आणि तुझा तो पुनर्जन्म, सगळें – सब् कांहीं झूट आहे !....”

२७ मे, १९१२

## ३१. पोरटें मुळावर आलें!

नाट्यछटा-लेखनाच्या स्वरूपात दिवाकरांची लेखणी सभोवतालची अनेक समाजचित्रे टिपून नोंदवीत होती आणि प्रसंगी, तत्कालीन सामाजिक रूढींवरही कलेच्या मर्यादेत भेदक हल्ले चढवीत होती. ‘पायगुण’ मानण्याच्या आंधळ्या रूढीवर, एका माणसाच्या अधोगतीच्या पार्श्वभूमीवर दिवाकरांनी या ‘छटे’त असाच पण बराच बोथट हल्ला चढवला आहे.

आवर्जून अभ्यासण्याजोगे या ‘छटे’त काही नाही. शेवटच्या एकाच वाक्यात ‘छटे’चा आशय देण्याचा दिवाकरांचा प्रयत्न उल्लेखनीय आहे.

“म्हणजे! म्हणतेस तरी काय? अग, काल त्याला दारावरून जातांना मीं पाहिला! अन् तूं म्हणतेस, – चल! कांहीं तरी सांगते आहेस झालें! तसं नाहीं ग, तूं खोटं सांगतेस असं नाहीं म्हणत मी. पण बाई, असं होईल तरी कसं? काल संध्याकाळीं तो चांगला होता ना? मग? – आतां तूंच तर म्हणालीस, कीं ‘रात्रीं चांगला जेवला, बाहेरून फिरून आला,’ अन् मग एकाएकींच हें! – अरे! अरे!! शेवटीं अफू खाऊन मेला ना! – कसं तरणंताठं पोर! अन् काय ग त्याला आठवलं हें! – खरंचा कां? कुणाची चोरी केली होती त्यानं? त्या....यांची? काय बाई तरी! पण मी म्हणतें जीव द्यायचं काय येवढं – आपल्याला धरतील, अन् तुरुंगांत टाकतील म्हणून का? – काय – ही संगत! संगत भोंवली बरं त्याला ही? – सदा मेली ती दारू अन् जुगार! होतं नव्हतं त्याचं वाटोळं केलं, अन् शेवटीं विचारा अस्सा जिवानिशीं गेला – अग, परवांच तो मरायचा! या कोपऱ्यावरचीच आपल्या गोष्ट! अंधारांत – रस्त्यांत आपला हा झिंगून पडलेला! त्या

टांगेवाल्याची नजर गेली, म्हणून बरं ! नाहीं तर त्याच वेळेला याचं भरायचं ! बिचारी बायको मात्र फुक्कट बुडाली हा ! – सारखी रडते आहे ना ! – रडेल नाहीं तर काय करील ? – कोणाचा आधार का आहे तिला आतां ! सांग ! – बरं, का ग, तिला कांहीं पोरबाळ ? – कांहीं नाहीं ना ? – बरं, कांहीं दिवसबिवस तरी ? – लोटले आहेत ना पांच-सहा महिने ? – असो. चला ! तेवढाच तिंच्या जिवाला आधार ! – हो, तें तर खरंच ग ! आलं पोरटं तें बापाच्याच मुळावर !....”

२९ मे, १९१२

## ३२. शिवि कोणा देऊं नये !

कोकिळाबाई गोडबोले या नावाची बाई कडू, तुरट आणि आंबटच बोलते, तसा या ‘ छटे ’तला नायक ‘ शिवि कोणा देऊं नये ’ म्हणून शिकवीत एकूण तेवीस ओळींत चौदा इरसाल शिव्या देतो. कोकिळाबाई निदान सामान्य बाई म्हणावी. या ‘ छटे ’तला नायक आहे मास्तर. कोकिळाबाईंपेक्षा ही व्यक्तिरेखा दिवाकरांच्या लेखणीतून अधिक जिवंत उतरली आहे. कदाचित त्यांच्या स्वतःच्या शिक्षकपेशाच्या अनुभवाचा हा फायदा असावा. “ शिंचीं गुढग्याइतकीं झाली नाहींत, तों लागलीं आपलीं मोठ्या माणसासारखीं शिव्या द्यायला ! ” ही या साऱ्या नाट्य ‘ छटे ’तली मेख अगदी शेवटाशी अच्चळ पण पक्की मारून दिवाकरांनी ‘ छटे ’तल्या उपरोधाचा कसा कळस गाठला आहे तो पाहा.

“....लेका नीट म्हण ! अशी रडल्यासारखी काय कविता म्हणतोस ? तुझ्या वरच्या मुलानें नाहीं, कशी छान गळ्यावर म्हटली ती ! – चल आटप्, म्हण पुनः नीट गळ्यावर ! म्हण, – शिवी को–णादे–ऊन–ये ,’ पाहा ! आहे ? लागला पुनः कुत्र्यासारखा रडायला ! चल इकडे ये, म्हसोबा ! तुला चांगला सडकला पाहिजे ! गुलामा ! चल आटप् ! – अस्सं ! लक्ष द्यायला नको, नुसता रेड्यासारखा माजला आहेस ! जा, बाकावर उभा राहा ! उद्यां जर कविता नीट म्हटली नाहींस तर दाखवितों कशीं सूर्याचीं पिलें आहेत तीं ! – काय आहे ? काय गडबड आहे ? काय झालें रे ? तुला शिवी दिली ? कुणीं ? त्या आगाशानें का ? चल उभा राहा रे आगाशा ! गोखले, तुला काय शिवी दिली रे या म्हारड्यानें ? अरे टोण्या ! तूं याला गाढव म्हणालास का ? चल इकडे ये ! – इरसाल ! – चांगला अस्सा हात पुढें केलास तर मरशील का ?

अं ! कोंबडीच्या, तूं याला काय म्हणून गाढव म्हणालास रे ? घेडा ! तूं कोण त्याचा बाप, का आजा, का मास्तर ? – चूप राहा, रडूं नको ! गाढवाच्या लेका, पुन: देशील का कधीं कोणाला अशा शिव्या ? डांबीस कुठला ! – शाळेंत येऊन हेंच शिकला वाटतें ? – शिवी कोणा देऊं नये, ही कविता काल जी येवढी घसाफोड करून मीं समजावून दिली, ती कशाकरतां रे ? तुम्हीं अशा शिव्या द्याव्या म्हणून होय ? – जा ! जागेवर बैस ! गाढवा, पुन: अशा शिव्या तर दे कोणाला, कीं पायां-पासून डोक्यापर्यंत चांगला फोडून काढतों ! – हं, चल रे भागवत, उभा राहा कविता म्हणायला ! इब्लिस कारटीं ! शिंचीं गुडघ्याएवढीं झालीं नाहींत, तों लागलीं आपलीं मोठ्या माणसासारखीं शिव्या द्यायला !...."

१८ जून, १९१२.

## २३. एका नटाची आत्महत्या

३ सप्टेंबर १९११ या दिवशी—म्हणजे ही ‘छटा’ दिवाकरांनी लिहिण्याआधी वर्षभर—मराठी रंगभूमीवरले एक अत्यंत गुणी नट गणपतराव भागवत यांनी अफू खाऊन आत्महत्या केली. त्यांच्या आत्महत्येचा या ‘छटे’शी काही ना काही संबंध नट-नाटके-नाट्य यांवर विशेष लोभ ठेवणाऱ्या दिवाकरांच्या मनात असू शकेल. परंतु पुन्हा एकवार ही ‘छटा’ नाटकातून कामे करणाऱ्या नटाची झालेली नाही. शेक्सपीअर म्हणतो, ‘जग ही एक रंगभूमी आहे.’ या अवाढव्य रंगभूमीवर ‘चुना’ नाहीतर ‘काजळ’ फासून अष्टौप्रहर हसणाऱ्या, रडणाऱ्या ‘माणूस’ नावाच्या नटाची ही ‘छटा’ आहे. सततच्या अभिनयाने, कृत्रिमतेने, असत्याने ढोंगाने आणि निरर्थकतेने विटलेला संवेदनाशील माणूस जीविताचा अंत करू पाहतो आहे. माणसातील प्राणांतिक आवेगाचा, बेहोषीचा, नाट्यपूर्ण भास निर्माण करण्याकरता दिवाकरांनी या ‘छटे’त शब्दांची केवढी किमया किती आटोपशीर जागेत केली आहे ती पाहा.·

“....ओढ ! जगा, असेल नसेल तितकी शक्ति खर्च करून ओढ ! – हं चालूं दे ! दांतओंठ खाऊन अगदीं जोरानें – अस्सें ! चालूं दे ! – आलों, आलों ! थांबा, भिऊं नका ! – अरे वेड्या जगा, कां उगीच धडपडत आहेस ! हं ! नको आपल्या जिवाला त्रास करून घेऊंस ! माझें ऐक. सोड मला. एकदां दोनदां तूं मला परत फिरविलेंस – काय सांगितलेंस ? काय माझें समाधान केलेंस रे तूं ? निव्वळ आरडा-ओरडा ! ‘वाहवा, वाहवा ! भले शाबास खूप बहार केलीस !’ – बेशरम ! हंसतोस काय ? – अरेरे ! तुझ्या नादीं लागून आजपर्यंत या तोंडाला रंग फासला काय – नाचलो काय – रडलों – हंसलों – ! – हाय ! जिवाची चेष्टा – या जिवाची

विटंबना केली ! नको ! नको ! ! मला ओढूं नकोस ! ! ! – काय वाऱ्याचा सोसाटा हा ! जिकडे तिकडे धूळ आणि पाचोळाच ! – पाचोळा उडाला आहे ! – अबब ! केवढा प्रचंड सर्प हा ! घाल, खुशाल माझ्या अंगाला विळखा घाल ! अरे जा रे ! कितीहि जोरानें तूं मागें ओढलेंस, तरी मी थोडाच आतां मागें फिरणार आहें ! खुपस, मस्तकांतून अगदीं पायांपर्यंत तूं आपला – अस्सा हा ! चालूं दे ! – दांत खुपस ! नाहीं ! मी परत फिरणार नाहीं जा ! – ओरडा ! मोठमोठ्यानें आरोळ्या मारा ! टाळ्या वाजवा ! नाटकी – ढोंगीपणानें सगळें जग भरलें आहे ! अरे जगायचें तर चांगलें जगा ! नाहीं तर – चला दूर व्हा ! अरे नका ! माझ्या तोंडाला चुना – काजळ – फांसूं नका ! कोण ? कोण तुम्ही ? मला फाडायचें आहे ? तें कां ? मी कशानें मेलों तें पाह्यचें आहे ? सल्फ्यूरिक ॲसिड प्यालों आहे मी, सल्फ्यूरिक ॲसिड ! अहाहा ! काय गार गार – वारा सुटला आहे हा ! जिकडे तिकडे बर्फच – बर्फ ! अनंतकाल झोंप – चिरकाल झोंप ! – हः हः ! वेडया जगा ! माझीं आंतडीं आपल्या कमरेभोंवतीं गुंडाळून मला मागें खेचण्यासाठीं कां इतका धडपडत आहेस ? अरेरे ! बिचारा रडकुंडीस आला आहे ! काय काय ? माझें आतां गूढ उकलणार ? अहाहा ! – उलथलें ! जग उलथून पडलें ! ओहो....”

७ नोव्हेंबर १९१२

## ३४. कशाला उगीच दुखवा !

माणसाच्या दांभिकतेला, स्वार्थसाधुपणाला इतके पैलू आहेत की, एकेका पैलूवरही अनेक उत्तमोत्तम कलाकृती प्रतिभावंतांनी निर्माण कराव्या. " कार्स्या ! अजून कसें तुला... या मागल्या एका ' छटे 'चाच विषय या ' छटे 'त तपशिलाच्या किती वेगळेपणाने हाताळला आहे तो पाहा. पहिल्या ' छटे 'तल्या बापाला स्वार्थ हुकल्यापोटची एवढी मोठी चीड आहे की, दांभिकतेचे त्याचे वस्त्र पार फाटून जाते आणि त्याचा नीचपणा आपल्याला उघड्यानागड्या स्वरूपात दिसू लागतो. शेवटच्या काही वाक्यांत तो घाईने फाटकी दांभिकता पुन्हा एकवार अंगाभोवती गुंडाळून घेतो; आणि जास्तच उद्वेगजनक वाटतो. या नव्या ' छटे 'त दांभिकतेचे वस्त्र मुळात जाडजूड आणि चिवट आहे, परंतु यातला हेड-क्लार्क नेमका शेवटच्याच काही वाक्यांत ते सुटून उघडा पडल्यासारखा होतो. माणसाचे खरे स्वरूप नेहमी त्याच्या नकळत दिसत असते; आणि त्याच्या वाचेतला, कृतीतला हा महत्त्वाचा तथाकथित अहेतुकपणा दिवाकरांनी त्यांच्या शैलीत अगदी तंतोतंत उतरविला आहे, म्हणूनच त्यांच्या असल्या ' छटा ' आजही ताज्या, प्रत्ययकारी वाटतात.

"...अहो, कोण विचारतो हेडक्लार्कला ! कसे दिवस काढीत आहोंत हें आमचें आम्हांलाच ठाऊक. म्हणायला हेडक्लार्क ! सत्ता पाहिली तर काडीइतकी देखील–घ्या. पान घ्या. -- वा ! नानासाहेब ! हें काय बोलणें ! अहो, परिचय म्हणजे कांहीं थोडाथोडका नाहीं ! डलर्ड हायस्कुलांत असतांना रोज मधल्या सुट्टींत – आठवतें का ? – आपण एकत्र बसून चिवडा खाल्लेला आहे ! मोठे गमतींत दिवस गेले नाहीं ? – कोण सुंदरे ? काय आहे ग ? मला खालीं बोलावलें आहें ? आलों म्हणावं अं ! – कांहीं विशेष नाहीं. बसा. जरुरीचें काम आहे ? मग काय बोलणेंच खुंटलें ! भेट का ? सकाळीं किंवा रात्रीं – केव्हांहि होईल. - नको ! तें नको आतां

सांगायला ! नव्याण्णव हिश्यांनीं हापिसांतली जागा ही तुमच्याच मुलाला मिळेल ! कांहीं काळजी करायला नको, समजलें ना ? – चाललेंच आहे ! यांत कशाचे आले आहेत उपकार ! – मोठा त्रास आहे ! हपिसांत कामाची दगदग, आणि घरीं यावें तर हा त्रास ! कोण पाहिजे ? – हो ! या बसा. मलाच आप्पासाहेब म्हणतात. काय काम आहे आपलें ? – भेटले होते खरेच. काल संध्याकाळींच त्रिंबकराव मला भेटले होते ! आपलें आडनांव काय ? पोंकशे नाहीं का ? अस्सें ! यंदांच एस्. एफ्. पास झालांत वाटतें ? – टाइपरायटिंगसुद्धां येतें ! मग हो काय ? फारच चांगलें ! अर्ज पाठवून दिला आहे ना ? – झालें तर ! अरे ! हें काय वेड्यासारखें ! उठा, उठा. रडूं नका ! मिळेल नोकरी, – काय आहे तिच्यांत मोठें ! अहो, लागलें नाहीं कोणाच्या ? – सगळ्यांच्या पाठीमागें दारिद्र्य लागलें आहे ! – जा ! मनाला कांहीं वाटूं देऊं नका. तुमच्या-करितां मी लागेल तितकी खटपट करीन बरें – एकदां हो म्हणून सांगितलें ना ? जा आतां – काय पाहा ! या पोटानें माणसाला कसें अगदीं भंडावून सोडलें आहे – रडायला लावलें आहे ! – येवढ्याच-करितां का खालीं हाक मारीत होतां मला ? अबब ! किती फोडी रे या ! कटकट कोठली ! हपिसांतल्या जागेकरितां आतांपर्यंत शंभर जणांच्या खेपा झाल्या असतील ! – खरेंच, गोडीला आंबे मोठे छान आहेत नाहीं ? – तें कांहीं नाहीं मोरू, उद्यां तुला साहेबांच्यापुढें उभा केलाच पाहिजे. नाहींतर – हं, अरे खाल्ल्या म्हणून काय झालें ! आणखी दोन फोडी घे – मूर्ख कोठले ! प्रत्यक्ष मुलाला टाकून माझ्या हपिसांतील जागा दुसऱ्याला मी मिळूं देईन कसा ? इतकें कसें यांना – हो, तें तर खरेंच ! आपलें हो-ला हो म्हणावें, सोडून द्यावें ! कशाला उगाच कोणाला दुखवा..."

९ फेब्रुवारी १९१३

## ३५. फ्रान्स !– सैन्य ! जोजफीन !

उवड उघडच ही नेपोलियनवरची 'छटा' आहे; आणि इथे 'नेपोलियन'ला प्रतीकाचे वा केवळ निमित्ताचे स्वरूप नसून आशय आहे तो नेपोलियनभोवतीच मर्यादित आहे. फार तर असे म्हणता येईल की, नेपोलियनसारख्या लोकोत्तर माणसाच्या अंतकाळची ही 'छटा' आहे.

माणसाच्या सूक्ष्म वा संमिश्र भावना, संवेदना आणि बेहोषीच्या सीमेपर्यंत पोचणारे बेबंद आवेग मूर्तिमंत उभे करण्यात दिवाकरांचा हातखंडा होताच. केव्हा केव्हा या प्रयत्नात ते कृत्रिम आणि नाटकी होत; परंतु मागली 'एका नटाची आत्महत्या' आणि ही 'छटा' या दोषापासून बऱ्याच मुक्त आणि म्हणून चांगल्या आहेत. 'नटाच्या आत्महत्ये'च्या बुडाशी माणसाच्या एका मूलभूत, चिरंतन व्यथेचे दर्शन घडत असल्याने ती अधिक उजवी आणि टिकाऊ ठरते. या 'छटे'चे स्वरूप त्या मानाने मर्यादित. त्यामुळेच की काय ही 'छटा' १९१३ साली दिवाकरांनी लिहिली, परंतु १९४० साली ही प्रथम—नाट्यछटांच्या दुसऱ्या आवृत्तीत—दिवाकरांच्या पश्चात आवृत्तीच्या संपादकांनी प्रसिद्ध केली.

असामान्य लेखक सतत असामान्य लेखन करीत नसतो हेच अशा नाट्यछटांवरून लक्षात येते.

"....ये ! जोजफीन ! जिवाचा भडका ! – भडका झाला आहे ग ! प्रिये ! नको थांबूस ! एक पाऊल पुढें ये – कडकडून मिठी मार ! कीं या तापलेल्या देहाचें थंड – गोड – अमृत होईल ! – अग ये ! लवकर ये ! – स्वर्गांत तर भेटूंच – कायमचेच भेटूं ग ! पण आधीं – हाय ! जोजफीन ! फ्रान्स ! फ्रान्स ! ! दाबा ! डोक्यावर हातोड्याचे घाव घाला ! पण ध्यानांत

ठेवा ! सूर्याचा गळा दाबीत आहां ! रक्तानें न्हालेल्या – संतापानें लाल झालेल्या सूर्याचें मस्तक फोडून – पाहा ! एका सूर्याला फोडलें – पण वेड्यानों ! आकाशांत – जगांत – पाहा कसे हे लक्षावधि सूर्य जळत आहेत ते ! – डॉक्टर ! माझ्या बाळाला संभाळा ! – हाय ! सेंट हेलेनांत – या जळजळीत निखाऱ्यांत मला निजवूं नका ! उचला ! ती पाहा ! माझी लाडकी फ्रान्स माझ्याकरितां ओरडत आहे ! निजवा रे ! तिच्या मांडीवर मला – आटपा ! बसूं नका ! महत्त्वाकांक्षेची दारू ठासा ! – मनुष्याच्या हृदयांत जोरानें दारू ठाशीत चला, कीं आज नाहीं उद्यां – लक्षावधि – कोट्यवधि वर्षांनीं ! – पण केव्हां तरी शेवटीं आपला – मनुष्याचा जय हा होणारच ! त्रिभुवनाला – प्रत्यक्ष ईश्वरालासुद्धां आपण जिंकणार ! त्याला आपलें कौतुक करायला लावणार ! एवढ्याचकरितां तर – अहा ! किती सोसाट्याचें व मजेदार वादळ हें ! यःकश्चित् धुळीचे कण ! पण पाहा कसें यांच्यांत महत्त्वाकांक्षेचें वारें संचारलें आहे ! – आल्पस् ? सगळें जग थरारून कोसळून पडलें पाहिजे ! चला ! पुढें व्हा ! अरे जिवाची कल्पना एका क्षणांत जर जगाला काडकन फोडून टाकते ! तर प्रत्यक्ष जिवानें खरोखर त्रिभुवन फोडून त्याचा चुराडा केलाच पाहिजे ! नाहीं तर जन्माला यायचं कशाला ? – हं ! अशा तोफांच्या गोळ्यांचा पर्वत जरी या नेपोलियनवर – पकडा ! चालूं द्या ! या चवताळलेल्या जगावर निकरानें हल्ला करा ! स्टिंगेल ! डिसेक्स ! मेसिना ! शाबास ! अस्सें ! जोरानें ठोसे मारा ! पेटूं द्या ! सगळें आंग पेटलें तरी – ओरडा ! जयजयकार ! फ्रान्सचा जयजयकार ! फ्रान्स ! फ्रान्स ! – सैन्य ! – माझें सैन्य ! – जोजफीन !....”

४ एप्रिल, १९१३

## ३६. असें केल्याशिवाय जगांत भागत नाहीं !

खुशामतखोरपणा आणि खुशामतीची अपेक्षा या दोन्ही प्रवृत्ती माणसांत प्रत्यही आढळतात. ‘ खुशामतीच्या अपेक्षेने खुशामतखोरपणा ’ असे त्यांचे एक त्यातल्या त्यात सौम्य आणि क्षुद्र स्वरूप असते. हे बुद्धिजीवी वर्गात विशेष आढळते. या ‘ छटे ’त हेच सुरेख रंगविलेले आहे. तोंडावरच्या खुशामतखोरपणाचा अपरिहार्य शेवट पश्चात निंदेत होतो. दिवाकरांनी तोही ‘ छटे ’त आणला. खुशामतखोरपणा आणि खुशामतीची अपेक्षा या ‘ दुर्गुणा ’बाबत उद्वेगाचे कृतघ्न उद्गार हेही खुशामतखोरांचे एक अपरिहार्य लक्षण. हेही या ‘ छटे ’त नेमके आढळते. ‘ असें केल्याशिवाय जगांत भागत नाहीं, ’ हा याउप्पर खुशामतखोरांचा नेहमीचा निर्लज्ज युक्तिवाद. गंमत म्हणजे तोही या ‘ छटे ’त अचूक सापडतो. अशा तऱ्हेने बुद्धिजीवी माणसांच्या या एका जातीचे निर्दोष आणि मार्मिक चित्रण आणि त्यापोटचे उत्तम नाटय या ‘ छटे ’त ग्रथित झाले आहे.

“...माझें मोठें भाग्य, यांत कांहीं शंका नाहीं ! नाहींतर, आपल्यासारख्या थोर लोकांची कोठून गांठ पडायला ! – अहो कशाचे, कशाचे ! आम्ही कसले कवि ! कोठें एका कोपऱ्यांत लोळत पडलों आहोंत झालें ! नाहीं खरेंच ! परवांची आपली कविता फारच बहारीची होती बोवा ! फारच छान ! एक्सलंट ! अहो, आधीं नांव पाहूनच थक्क झालों ! ‘ माझें आंबट अजीर्ण !’ वा ! किती सुंदर ! नाहीं, तें आले लक्षांत. आहे कविता एकंदर आत्म्यालाच उद्देशून ! पण त्यांतल्या त्यांत या दोन ओळी तर मला फारच आवडल्या ! काय पाहा ! – हां बरोबर, –

'अजीर्णामुळें ! जीव कळवळे ! ॥" काय बहार आहे यांत ! शब्द सोपे असून किती खोल, गंभीर अर्थ ! – काय म्हणतां इतका खोल अर्थ आहे का ? शावास ! 'प्रेमभंगामुळें हृदय पिळवटून डोळ्यांतून खळखळां वाहिलेल्या अश्रूंचें अजीर्ण !' क्च ! काय विलक्षण मिस्टिक कविता आहे हो ! टेरिबल ! फारच प्रतिभा अफाट ! माझें समजा हो ! – कोणती ? – कोणती बरें माझी कविता आपल्याला अतिशय आवडली ? हां, हां ! ती होय ? गेल्या मस्तकमंजनांतील चहादाणी-वरील ! अस्सें ! – हो, तीसुद्धां आहे आत्म्यालाच धरून ! – बरें आतां रस्त्यांत नको – केव्हां ? उद्यां सकाळीं येऊं आपल्या घरीं ? – ठीक आहे. – हं: 'अहो रूपम् अहो ध्वनि:' चाललें आहे जगांत ! म्हणे आपली चहादाणीवरील कविता अतिशय आवडली !' ह: ह: कमाल आहे बोवा या लोकांची ! इतकी भिकार कविता कीं, मला स्वत:लासुद्धा आवडत नाहीं ! "माझी चहादाणी, साखरपाणी ॥ आधण येई सळसळा । अश्रू येती घळघळा ॥" ह: ह: यंवरे कविता ! पण चाललें आहे कीं नाहीं ! भेंडी-रमणानें उठावें, बटाटेनंदनाची स्तुति करावी ! बटाटेनंदनानें पुढें यावें, भेंडीरमणाची वाहवा करावी ! मनांत परस्परांना त्यांची कविता मुळींच आवडत नसते ! पण जगांत यानें त्याला शेली म्हणावें, उलट त्यानें याला कीटस म्हणावें ! चालला आहे सपाटा ! बरें, असें केल्याशिवाय जगांत भागत नाहीं ! अहो नाहीं तर, आपलीं खरीं मतें सांगून जगांत तंटेच करायचे – वैरीच निर्माण करायचे कीं नाहीं ? रिकामा जिवाला ताप ! जाऊं द्या !..."

२२ मे, १९१३

## ३७. एका दृष्टीनें साहाय्यच केलें आहे !

'युक्तिवाद' हे एक प्रकारे बुद्धिजीवीपणाचे महत्त्वाचे लक्षण. दुर्गुणांचे समर्थन करणारे निर्लज्ज युक्तिवाद हा या लक्षणाचाच एक प्रचलित भाग. मागल्या 'छटे'त आपण असला एक युक्तिवाद वाचला. या 'छटे'त आणखी एक आहे. यातला नायक आहे १९१२–१३ सालचा तथाकथित सुधारणावादी, प्रतिष्ठित रावसाहेब नाहीतर राव-बहादुर—पेन्शनीत गेलेला; पेन्शन आणायला निघालेला बग्गीतून—एकीकडे पुनर्विवाहाचा तोंडी पुरस्कार करीत बारा-तेरा वर्षांच्या पोरीशी या म्हाताऱ्याने लग्न लावले आहे आणि 'छटे'त तो दुसऱ्या सुधारणा-वादी 'भाऊसाहेबा'ला आपल्या अधम कृत्याचे वेगवेगळ्या वळणांचे समर्थन ऐकवतो आहे. या वळणांचा क्रम अभ्यसनीय आहे. शेवटचे समर्थन किती भयंकर, अगदी चीड आणणारे वाटते, पाहा. त्याही पुढचे 'हीः हीः हीः' हे हसणे तर या चिडीवर कळस चढविते. चढत्या परिणामांचे असले अचूक हिशेब हे तर दिवाकरांचे आणि 'नाट्य-छटा' या प्रकाराचे विशेष सामर्थ्य.

"...कान फुटले आहेत का रे तुमचे? मघांपासून सारख्या मी इकडे हांका मारतों आहें, कुठें होतास रे तूं? घरांत काय झोंपा घेतां सगळे? जा, आतांच्या आतां गाडी जोडून तयार ठेवायला सांग! पेन्शन् आणायला जायचें आहे, लवकर मला गेलें पाहिजे!—हें काय? आपण कां उठलांत? अहो, दोघं आपण बरोबरच गाडींत जाऊं! तुम्हांला घरीं सोडतों आणि मग मी—अहो, कशाचा राग अन् काय! चालायचेंच! भाऊसाहेब, आमचें आपलें हें असें आहे. बोलून चालून कच्च्या दिलाचीं माणसें आम्ही! कितीसा टिकाव लागणार! झालें, केली बडबड! "पुनर्विवाह करावा, पुनर्विवाह करावा!" अशी हवी तितकी वटवट केली! मोठ्या दिमाखानें

मारे लांबलचक व्याख्यानेंसुद्धां झोडलीं ! पण शेवटीं ? स्वतःवर पाळी आली, तेव्हां घातलें शेपूट ! आणि केलें काय ? तर बारा-तेरा वर्षांच्या पोरीशीं लग्न ! – नाहीं. तसें नाहीं ! मी आपला स्पष्ट बोलणारा माणूस आहें ! अहो, काय वाटेल तें करा, आमच्यासारखीं हीं असायचींच ! आणि खरें आहे ! बोलल्याप्रमाणें सगळेच वागायला लागले, तर उद्यां जगाचा कार-भारच आटपेल ! नाहीं का ? ह्यः ह्यः ! – गाडी तयार आहे ? – चला ! – अरे : थांब, हा टाइम्सचा अंक, आणि तो स्पेन्सरचा व्हॉल्यूम् , हें गाडींत नेऊन ठेव – बाकी भाऊसाहेब, तुम्हीं कांहीं म्हणा, खरें आणि स्पष्ट बोलावयाचें म्हणजे मीं स्वतः पुनर्विवाह केला नाहीं म्हणून काय झालें ? काय येवढें विघडलें ? अहो, आमच्यापैकीं लवकरच कोणी तरी – काय, आलें का लक्षांत ? म्हणजे तुमच्याकरितां सामग्री तयार करून ठेवलीच आहे ! अहो, तसें नाहीं असें ! एका दृष्टीनें मीं तुमच्या कार्याला साहा-य्यच केलें आहे ! हीः हीः हीः – चला !...”

२२ मे, १९१३

## ३८. "— पण बॅट नाहीं !"

भोवतालच्या जीवनातले एक अंग नाट्यछटाकार दिवाकरांनी अस्पर्शित म्हणून ठेवले नाही. हलवाई, मर्तिकाच्या गोवऱ्यांचा व्यापारी, कवी, सुधारणावादी रावसाहेब, हेडक्लार्क, नट, शिक्षक, बुद्धिवादी, माधुकरी, चिंगीची भाबडी आई, कोकिळाबाई गोडबोले, सावकार, कारकून, तरुण विधवा, बाप, इस्टेट लाटू पाहणारा म्हातारा, स्वतः दिवाकर, अशा विविध व्यक्तिचित्रांनंतर हे नवे—क्रिकेटरचे.

शिवराळ छटेत अस्खलित शिव्या उच्चारणारे, हलवायाच्या तोंडून अस्सल अदब वदविणारे, चिंगीच्या आईचे चित्र रंगविताना स्वतः चिंगीची भाबडी आई होणारे दिवाकर या 'छटे'त कसे अव्वल 'पुणेरी क्रिकेटर' बनले आहेत, पाहा. 'छटे'तले क्रिकेटच्या क्षेत्रातले फॅशनेबल शब्दप्रयोग आणि त्यांचा चपखल वापर अभ्यासा. त्याचप्रमाणे 'मामा लेकाचा !', 'ऐसा बॉल जातो आहे !', 'बॅट म्हणजे दिलजान् आहे !', 'नाहींतर होशील बबड्याजीराव !', 'भाई, माफ कर !' असल्या वाक्यांनी, शब्दांनी क्रिकेटरची जात आणि काल कसा पक्का केला आहे तोही पाहा.

प्रत्यक्षात फारसा विरोध, विसंगती वा एखाद्या रसाचा उत्कर्ष नसतानाही या 'छटे'त नाट्य आणि चटकदारपणा आला आहे तो या गोष्टीमुळे.

"चक्... खोटा डिसिजन् ! कॅच असेल कोठून ! बॅटला बॉलच जर मुळीं लागला नाहीं तर – दुसरें काय ! वुइकिटकीपरनें विचारलें, अंपायरनें 'हो' म्हटलें. मामा लेकाचा – ! किती बेचाळीसच ना ? – उं ! कांहीं फार झाल्या नाहींत ! – अरे चांगला सेट झालों होतों ? सहज सेंचरी निघाली असती ! – हुश्श ! बॉय ! सोडा लाव ! छे बोवा, आज फारच

थकलों ! छान म्हणजे ! राव, विजली आहे विजली ! गन् अँड् मूरचा आटोग्राफ आहे ! बॅट हलकीसलकी नाहीं ! पैसेच तसे मोजले आहेत ! – अरे तिचें आर्धी केनच किती कॉस्टली आहे ! अन् खेळायला काय ! अगदीं फुलासारखी ! इतकें त्या – तो इकडचा बोलर नाहीं ? – इतकें त्याचें बोलिंग मारलें ना ! पण हाताला हूं कीं चूं नाहीं ! – कटिंगला तर बोलायलाच नको ! नुसती टाकायचा अवकाश, कीं ऐसा बॉल जातो आहे ! नुसतें पाहात राहावें ! बॅट म्हणजे दिलजान् आहे ! हजार पांचशेंतून निवडून काढली आहे ! उगीच नाहीं ! – पाहा ! आहे ? अगदीं त्रिफळा उडाला ! लाख वेळा सांगितलें कीं, बॅकवर्ड खेळूं नको म्हणून ! आले आतां हांका मारीत ! नेक्स्ट् कोण भिडे जातो आहे ना ? – जपून खेळ रे बोवा ! लेगब्रेक आहे ! जरा संभाळून ! नाहीं तर होशील बबड्याजीराव ! – काय ? बॅट् ? माझी बॅट् देऊं तुला ? हात जोडतों ! भाई, माफ कर ! तेवढें नाहीं व्हायचें ! दुसरें काय हव्वें तें – अगदीं माझ्या जिवाचें माणूस – स्वतःचा जीव मागितलास तरी देईन ! पण बॅट नाहीं हो !...”

८ ऑगस्ट, १९१२

## ३९. नासलेलें संत्रें

'फाटलेला पतंग' या जातीची ही आणखी एक रूपकात्मक नाट्य-छटा. 'पतंगाप्रमाणे हिच्यांतले रूपकही एका निर्जीव वस्तूभोवती गुंफले आहे. परंतु 'फाटलेल्या पतंगा'चा हाताळणीतला जिवंतपणा या 'छटे'त काही कारणाने न उतरल्याने निर्जीव संत्र्याप्रमाणे रूपकही बरेचसे निर्जीव झाले आहे आणि परिणामी 'छटा' नासली आहे असे म्हटले तर अन्यायाचे होणार नाही. दिवाकरांना तिच्यात काय सांगावयाचे आहे ते कळते, पण पटत नाही. संत्रे वारंवार बाजूला सारून लेखक कलाहीन धसमुसळेपणाने आपले विचार स्वतः मांडीत आहेसे वाटते.

"...ठरलेलेंच! आम्ही असेच हाल हाल होऊन–तडफडून मरायचे! छान झालें? असेंच पाहिजे! काय जोरानें त्यानें मला भिरकावून दिलें पण! रागानं लाल झाला होता! अहो, बरोबरच आहे! नासलेलीं संत्रीं! चांगल्या संत्र्यांमध्ये पाहिजे आहेत कशाला? त्यांना असेंच झुगारून दिलं पाहिजे! चांगलीं तुडवून–डोक्यांत व अंगांत खिळे ठोकून–जाळून पोळून मारलीं पाहिजेत! नाहीं तर? अहो, हीं जिवंत विचारांनीं सडून–भणाणून गेलेलीं संत्रीं जुलमी जगाला गोड मानून त्यांत आंबून–कुजून मेलेल्या संत्र्यांना आपल्यासारखींच स्वतंत्र व ईश्वरी विचारांनीं जिवंत करून–त्यांना नाचायला लावतील! आणि मग? जिकडे तिकडे प्रलय होईल! जिवंत हृदयांना पिळून काढून त्यावर मस्त होऊन बसलेलें हें जुलमी जग पार उलथून पडेल! सर्वत्र ईश्वरी साम्राज्य सुरू होईल! पाहिलेंत? तीं मार्केटांत डौलानें बसलेलीं संत्रीं माझ्याकडे पाहून कशीं हंसत आहेत! हंसा! खुशाल हंसा! मी दुर्दैवी? तें काय म्हणून? आणि तुम्ही काय असे मोठे सुदैवी लागून गेलां आहांत? अरे! जगांत येऊन

फार झालें तर सात नाहीं तर आठ जिवांना तुम्हीं पोसाल ! पण मी येथें एकटा हजारों जिवांना पोशीत आहें ! तुम्ही जगाचे गुलाम ! तुमच्यासारखीं लक्षावधि संत्रीं जग तेव्हांच गट्ट करून टाकील ! – छाती नाहीं ! माझ्याकडे आ वासण्याची जगाची छाती नाही ! माझा प्रत्येक दाणा ईश्वरी तेजानें वळवळणारा आहे ! तुमचे सगळे दाणे – सर्व विचार—एकसारखे येथून तेथून पार मेलेले ! – ! नासलेलीं संत्रीं ! ' थांबा ! आम्हीं नासलेलीं संत्रीं जुलमी जगाच्या पोटांत शिरून सर्व जग लवकरच पेटवून देऊं ! चढवा ! प्रेमाने नासलेल्या भगवान् ख्राइस्टला एक – नाहीं पन्नास वेळां क्रूसावर चढवा ! तुमचीं बिंगें बाहेर फोडणाऱ्या महाकवि डँटीला खुशाल हद्दपार करा ! वाटेल तसा सैतानी धिंगाणा घाला ! पण ध्यानांत ठेवा ! लवकरच सर्व जगाला स्वातंत्र्याची – प्रेमाची – आग ! आग लागेल ! !...”

४ सप्टेंबर, १९१२

## ४०. ता० ७ नोव्हेंबर

या ‘ छटे ’च्या साच्याला केशवसुतांचा मृत्युलेखच म्हटला पाहिजे. दिवाकरांना नैमित्तिक काही म्हणावयाचे असले म्हणजे त्यांची ‘ छटा ’ कशी वर्तमानपत्री पातळीवर उतरे त्याचा हा नमुना. हीच छटा सरळ मृत्युलेखाच्या स्वरूपात लिहिली तर तिचा आशय कदाचित अधिक पटेल, अस्सल वाटेल.

वर्तमानपत्री तसेच बरेचदा रूपकात्मक ‘ छटा ’ लिहिताना दिवाकरांच्या लेखनाचा तोंडवळा कै. शिवराम महादेव परांजपे यांच्या अशाच लिखाणाशी कसा मिळता जुळता होत असे तोही पाहण्याजोगा आहे. कै. परांजपे पाल्हाळाने लिहीत आणि दिवाकर शब्दांची काटकसर साधीत, हा प्रमुख फरक. परांजपे यांची कल्पनेची मोठी झेप आणि जळजळीत शैली दिवाकरांकडे तशी, तितक्या प्रमाणात नव्हती, हा आणखी एक फरक. लेखनामागील दोघांचे हेतू तर कितीतरी भिन्न होते, हे दोघांच्या एकूण साहित्याच्या स्वरूपाने स्पष्टच होते.

“ ...सावकाश – हळूच – नीट जपून निजवा ! – निश्चयानें अंग काय ताठून गेलें आहे ! – आतां कोणाकडे टक लावून पाहात आहेस ? बावा रे ! जिच्यापाठीमागें आतांपर्यंत धांव धांव धावलास ! जिच्याकरितां जिवाचा असा फेस केलास ! ती तुला मिळाली का ? – आपण काय करीत आहों ? कोणावर गोंवऱ्या रचीत आहों ? हुं: ! कल्लोळ ! प्रलय ! प्रलय झाला आहे ! – कजाग, भांडकुदळ परिस्थिति आणि दारुण, जिवांचें रक्त पिणारी निराशा, यांत पिळून निघालेलें चिपाड – हाय ! हाय रे केशवसुता ! ऊठ ! निजूं नकोस ! मेलेल्या विचारांत अजून जग रुतून वसलें आहे रे ! त्याला वर काढ, आणि आपल्या गोफणीनें स्वतंत्र, स्वर्गीय वातावरणांत भिरकावून दे ! विनायक, थांबा हो ! इतक्यांत नका तोंडावर

गोवरी ठेवूं!—हाय रे देवा! अरे हताश होऊन बसलेल्या महाराष्ट्रा! आतां तुला स्वर्गांतून स्फूर्ति आणून कोण पाजील?—तुला नखशिखांत स्वतंत्र विचारांनीं जळायला कोण लावील? अरे केशवसुता! ऊठ! फुंक आपली तुतारी! प्रेतांना खडबडून जागें कर! अनंताला फोडून त्यांतून गूढें आणण्याकरितां पिटाळून लाव!—थांबा! अहो जरा थांबा! त्या दिव्य पुरुषाचें पुन्हां एकदां शेवटचें दर्शन घेऊं द्या! अप्पा! अप्पा! ये! अगदीं कडकडून भेट!—ऐका! काय म्हटलेंस 'मेलेल्या गरुड पक्ष्यां-बद्दल शोक करूं नका! त्यांच्याहि पलीकडे तुमच्या भराऱ्या जाऊं द्या!' हर हर! सूर्य मावळला! अंधार! अंधार!!—काय हा दुर्दैवी दिवस! जेव्हां जेव्हां हा दिवस उगवेल, तेव्हां तेव्हां कैक हृदयांचा स्फोट होऊन, महाराष्ट्रांत कितीतरी तेजस्वी काव्यें तळपत राहतील!—नका! नका हो नका! विस्तव ठेवूं नका! आई! आई!! आई!..."

११ आक्टोबर, १९१३

## ४१. स्वर्गातील आत्मे !

ही एक गमतीशीर कल्पना. स्वर्ग म्हणजे सारी शांती, सारा आनंद असे आपण मानतो; काही तरी दुर्मिळ, अप्राप्य समजतो. मनुष्यजन्म नको म्हणतो. त्यात सारी दुःखे, शीण, कंटाळा असे मानतो. दिवाकरांनी कल्पना केली की, समजा, माणसाला स्वर्ग लाभला; तर तो सुखी होईल काय ? सोयीनेच त्यांनी नकारात्मक उत्तर दिले, आणि स्वर्गातल्या अखंड शांतीने आणि आनंदाने विटलेल्या माणसाची ही मजेशीर नाट्यछटा रचली.

'अमृत ढोंसावें', 'असा आहे हा स्वर्ग', 'सुंदर सुंदर देह' 'देवलोकची मजा', 'पडा सदा आनंदात कुजत !' असल्या काही मार्मिक शब्दप्रयोगांनी 'छटे'ची खुमारी आणि उपरोधाची धार वाढली आहे. 'कंटाळा आला की देवसुद्धा जातो तिथे !' या अखेरच्या वाक्याने कंटाळवाण्या स्वर्गाच्या कल्पनेला दिलेला कल्पक आधार 'छटे'ची खुमारी जास्तच वाढवतो.

"...कंटाळा आला बोवा आपल्याला इथचा ! — हो तर काय ! रोज तेंच, तेंच ! अग, काडीइतकासुद्धां फरक नसावा ? — उठल्या — बसल्या तें अमृत ढोंसावें, आणि खुशाल टोळासारखें भटकावें ! कांहीं उद्योग दुसरा ? — छे छे छे ! ! ओकारी आली बोवा आपल्याला येथची ! असार असार आहे हा स्वर्ग निव्वळ ! — तेंच कीं ! सदा म्हणे आपला आनंद एक वृत्ति ! केव्हां संपते आहे कुणास ठाऊक ! — आतां थोडीं का वर्षें झालीं असतील इथें येऊन ? — पण कांहीं आहे का फरक ? हें आपलें नंदनवन, होतें तस्सें आहे ! — नादीं लागलों, आणि फुकट इथें तडफडायला आलों ! चोर कुठले ! म्हणें, 'स्वर्गांत जा म्हणजे शांति मिळेल !' — वा काय छान शांति मिळते आहे इथें ! एकाला म्हणून करमत असेल तर

शपथ ! नकोसें झालें आहे.अगदीं ! हें ग काय ? तूं तर रडायला लागलीस ! उगी ! जाऊं ! लवकरच आपण मृत्युलोकांत जाऊं बरें ! तिथें मग आपल्याला सुंदर सुंदर देह मिळतील ! आणि मग काय महाराज ! — हंसली रे हंसली ! — अग तें कांहीं पुसूं नकोस ! देहलोकची मजा कांहीं और आहे ! घटकेंत आनंद आहे, तर घटकेंत दु:ख आहे ! चाललें आहे ! शेंकडों वृत्तांत जिवाला बागडायला सापडतें ! आणि हें कशामुळें ? — तर हें सगळें देहामुळें बरें का ! — आणि हो ! सगळेंच तिथें अस्थिर ! त्यामुळें अश्शी माणसाची परीक्षा होते कीं, ज्याचें नांव तें ! चांगला तावूनसुलाखूनच निघतो ! उगीच नाहीं मृत्युलोक ! — बरें का ? — म्हटलें, खरी मुक्ति तिथें आहे माझे बाई ! — नाहीं तर इथें ! पडा सदा आनंदांत कुजत ! — मृत्युलोकाशिवाय नाहींच तें ! सुख खरें तिथें ! अग आपलेंच काय, कंटाळा आला कीं देवसुद्धां जातो तिथें ! उगीच नाहीं अवतार घेत !...”

७ नोव्हेंबर, १९१३

## ४२. कारण चरित्र लिहायचें आहे !

' असें केल्याशिवाय जगात भागत नाही ' या मागल्या एका कवीच्या ' छटे 'सारखी ही दुसरी इरसाल ' छटा '. हिचा नायक आहे एक साहित्यिक–नामांकित लेखक. ' बाळाभाऊ ' याचा लंगोटी-मित्र. बाळाभाऊच्या चरित्रलेखनासाठी माहिती पुरविण्याचे काम त्याने उत्साहाने स्वीकारले आहे. ' छटा 'भर तो बाळाभाऊबद्दल अत्यंत बदनामीकारक असे काही काही निःसंकोच बोलतो. आणि अखेर ' पण लिहून थोडेंच चालतें ? ' असे म्हणून बाळाभाऊच्या फिरवलेल्या चरित्राची एक ' झलक ' ऐकवतो. चरित्र म्हणजे खऱ्या वाइटाचे खोटे उदात्तीकरण हा मथितार्थ. साहित्यिक जगातल्या एका रूढ निर्दय पद्धतीवर आणि त्या निमित्ताने–पुन्हा एकवार—भोंदूगिरीवर दिवाकरांचा परिणामकारक हल्ला. ' छटे 'चा नायक तोंड फाटेपर्यंत बडबडणाऱ्यांतला आहे; आणि त्याची ही जात आटोपशीर ' छटे 'तच कशी पक्की उतरली आहे, पाहा. शब्दवेल्हाळपणाचा भास निर्माण करून दिवाकरांनी किमान शब्दांत बाजी मारली.

"...चरित्र काय पुढच्या अंकात देणार आहांत का ?–छान. बाळाभाऊ म्हणजे नामांकितच लेखक ! अहो वा ! त्याचा माझा स्नेह लहानपणापासूनचा !–लंगोटीमित्रच आम्ही ! त्यामुळें हवी तितकी माहिती मला देतां येईल !–हां, तेवढें मात्र विचारूं नका ! लेखनांत काय त्यानें तेज दाखविलें असेल तेंच ! बाकी मनुष्य आपला–तुमच्या आमच्यांतल्या गोष्टी या–मनुष्य आपला असा तसाच !–अहो, स्वभाव काय अन् वर्तन काय ! गोंधळ ! काय सांगायचें तुम्हांला ? सरळपणा म्हणून यत्किंचित् नाहीं ! कधीं कोणाचे पैसे घेतले, आणि ते बोवा परत केले आहेत, नांव नाहीं ! याचें घे, त्याचें घे असें करून सात आठ

हजारांला तरी त्यानें बुडविलें असेल ! शिवाय लोकांचीं पुस्तकें दाबलीं तीं वेगळींच ! हा जिथें साधा व्यवहार, तिथें काय बोलायचें आणखी ! हीच तऱ्हा व्यसनाची ! अहो, परवां मरायच्या आधीं महिना दोन महिन्यांतली गोष्ट ! दिवसाढवळ्या, अगदीं भर चौकांत एका टांगेवाल्याशीं मारामारी केली ! बोला आतां ! — अहो, कसचें कारण अन् काय ! यथास्थित झोकली होती झालें ! — नीट नोकरी नाहीं, धंदा नाहीं, सदा चहा आणि विड्या ! रोज उठून घरांत भांडणें ! — कां नाहीं व्हायचीं ! वेळ नाहीं, अवेळ नाहीं, येईल त्याच्या नरड्यांत चहा ओतायचा ! कांहीं त्याला सुमार ? — आपलें बोलायचें किंवा लिहायचें नाहीं इतकेंच ! बाकी अशा एक एक गोष्टी आहेत कीं, — चांगलें बाबाचें लग्न करून दिलें, पण घटकाभर पटेल तर शपथ ! कारण बाहेर यांचा रोमान्स बोकाळलेला ! , शेवटीं एक दिवस नवरानायकोची अशी जुंपली कीं कांहीं पुसूं नका ! — झालें ! पुढें काय ? ती उठून बापाच्या घरीं चालती झाली, आणि हें काय ? यांची उप्पर मिशी ! कारण, " गेली, तर गेली ! नाकावर टिच्चून दुसरें लग्न करीन मी ! " — आणि ठणठणीत केलें लग्न ! तेव्हां अशा या भानगडी, पण लिहून थोडेंच चालतें आहे ? तिथें म्हणजे, ' यांना दोन बायका होत्या गोष्ट खरी. पण पहिलीला मूल होईना, तेव्हां ती सारखी झुरणीस लागली ! इतकी कीं, शेवटीं तिनें अंथरूण धरलें ! आणि सारखा यांच्यामागें तगादा कीं, कसेंही करून यांनीं दुसरें लग्न करावें ! शेवटीं अगदी निरुपायानें... कारण पतिपत्नींचें प्रेम अलौकिक ! — आमच्या चरित्रनायकानें दुसरें लग्न केलें ! '...म्हणजे अशा तऱ्हेनें सगळे फिरवून...कारण चरित्र लिहायचें आहे तेव्हां तें..."

३ मार्च, १९१३

## ४३. माझी डायरेक्ट मेथड ही !

मागली ' छटा ' १९१३ सालची. त्यानंतर ही नवी १९२४ सालची. म्हणजे दिवाकरांनी ही लिहिली तब्बल अकरा वर्षांनी.

मध्यंतरीच्या १९१४ ते १९१८ या काळात दिवाकरांनी काही नाट्य-संवादांची मालिका ( मी माझ्याशी ), एक नाटक ( कारकून ) काही नाटिका ( ' सगळे आपण ह्यः ह्यः ! ' आणि ' ऐट करू नकोस. ' ) आणि नाट्यछटेपासून वेगळे असे काही नाट्यप्रसंग ( पाऊस, निजलेले मूल, शाळेला सुटी, ती बिचारी रडतेच आहे ) लिहिले.

१९१८ पासून त्यांची सांपत्तिक स्थिती सुधारत गेली आणि जुन्या अप्रसिद्ध नाट्यछटांना नवी सफाई देऊन त्या ' उद्यान ', ' ज्ञानप्रकाश ' अशा नियतकालिकांतून प्रसिद्ध करण्यापलीकडे या पाच एक वर्षात नवीन त्यांनी काही लिहिले नाही.

त्यानंतरची त्यांची ही पहिली नवी नाट्यछटा.

शिक्षणात ' डायरेक्ट मेथड ' या त्या काळाच्या नवीन शिक्षणपद्धतीचा वापर करून पाहिलेल्या शिक्षक दिवाकरांनी रंगवलेली ही एका तत्कालीन पालकाची व्यक्तिरेखा. पोर नापास झाला म्हणून तो आदळआपट करतो आहे; त्या निमित्ताने शिक्षकावर आणि नव्या शिक्षणपद्धतीवरच तोंड टाकतो आहे. मुलाची कुवत ध्यानी न घेता त्याच्या अपयशाबद्दल शाळाचालकांना आणि शिक्षणपद्धतीला दोषी धरणारे सुखवस्तू पालक आजही शालेय जगतात कमी नाहीत. त्यांचाच हा केव्हाही पटेल असा नमुना.

" ...शंभरांपैकीं पंचवीस मार्क ?...कांहीं जिवाला शरम ! जा ! आतांच्या आतां हें कार्ड घेऊन, दाखव तुझ्या त्या मास्तरला नेऊन ! बेशरम ! शिकवतात का हजामती करतात ?...या ! छान झालं ! ऐन वेळेवर आलांत ! पाहा हे आमच्या चिरंजिवांचे प्रताप ! इंग्रजींत सारे

पंचवीस मार्क !...काय पोरखेळ आहे ?...मोठा अगदीं तुमच्या शिफारशीचा मास्तर ! कारण तुम्ही आमचे स्नेही...अन् शिक्षणपद्धतीचे अगदीं गड्डे—म्हणून तुम्हांला आम्हीं विचारलें !—तोंडांत मारायला नव्हते कुणी त्या वेळीं माझ्या—दरमहा वीस रुपयेप्रमाणें आज अडीचशें रुपये त्या मास्तरड्याच्या उरावर घातले त्याचें हें फळ होय ? म्हणे नवीन पद्धति ! विद्वान् कीं नाहीं मोठे !—काल मॅट्रिक झाला नाहीं, तो आज मास्तरच्या खुर्चीवर जाऊन बसतां, काय येत असतें रे तुम्हाला !—हीच रड तुमच्या त्या सुपरिंटेंडेंटची !—आज एम्. ए. होतो काय, अन् शाळा चालवतो काय ! इकडे पालक तर विचारायलाच नको ! सगळेच अवलिया ! स्वत:ला मुलें किती आहेत याची तरी त्यांना शुद्ध असते कीं नाहीं कुणास ठाऊक ! वर आणखी नवीन नवीन खुळें हीं ! आग लावा त्यांना ! यापेक्षां आमची जुनी पद्धति खरोखरच चांगली ! एवढा मोठा ' दाऊ 'चा धडा अवघड ना ! पण एकदां चांगली गालफडांत देऊन, मास्तरांनी इ—एस—टी लावायला सांगितली कीं काय बिशाद आहे पोरटें विसरेल ! पक्की जन्माची आठवण ! तें राहिलें बाजूलाच ! आतां धड इ—एस—टी नाहीं, अन् आय—एन्—जी नाहीं ! कारट्यांना पाठ म्हणून करायला नको मुळीं !—आज त्या मास्तरकडे पाठवून याला वर्ष होत आलें. अन् खरोखरच सांगतों—चेष्टा नाहीं—या टोणग्याला सी—ए—टी कॅट करतां येत नाहीं !—तेव्हां नांव काढूं नका तुम्ही अगदीं ! —' नवीन—नवीन ' म्हणतां तुम्ही हें ! पण सगळें फुकट—ऑल बॉश—आहे !—तें कांहीं नाहीं ! यापुढें माझी डायरेक्ट मेथड आतां ही —उठतांक्षणींच कांहीं अपराध न केल्याबद्दल पांच छड्या, अन् निजण्यापूर्वी अपराध केल्याबद्दल पांच छड्या ! रोजचा हा खुराक ! मग पाहतों कसा पोरटीं अभ्यास करीत नाहींत !..."

३ एप्रिल, १९१३

## ४४. हें काय उगीचच ?—

दिवाकरांनी १९२४ साली पुन्हा नाट्यछटा-लेखनाला सुरुवात केली. आणि त्यांनीच अकरा वर्षांपूर्वी निर्माण केलेला 'छटे'चा साचा (विरोध, विसंगती, एकाच विशिष्ट रसाचा परिपोष) त्यांना गैरसोयीचा वाटू लागला असावा. आता त्यांच्या 'छटां'ना 'नाट्यप्रसंगा'पेक्षा 'क्षणचित्रां'चे स्वरूप येऊ लागले होते. त्यातला आशय अधिकाधिक तरल होऊ लागला.

या 'छटे'त एका हुन्नरी माणसाचे तत्त्वज्ञान ग्रथित झाले आहे. मोडलेली पन्नास वर्षांपूर्वीची घड्याळे, 'एक सूर धड असेल तर शपथ' छापाच्या वाजाच्या पेट्या तो दुरुस्त करतो आणि या आत्मविश्वासावर त्याचे एक तत्त्वज्ञान बनले आहे. ते कसे आणि काय ते पाहा. हा माणूस आणि त्याचे तत्त्वज्ञान—त्यातला सीधा-साधा, किंचित नवा आशावाद, प्रयत्नवाद, हाच या 'छटे'चा विषय.

"....पन्नास—नाहीं शंभर वर्षांचें असतें म्हणून काय झालें असतें ! आहे काय त्यांत ? आणायचा अवकाश, तेव्हांच नीट करून दिलें असतें. —एकदां नीट पाहाल तर खरें ! ऐसें झकास तुमचें घड्याळ झालें आहे कीं नांव नको आतां पुन: विघडण्याचें !—अलबत ! आमचें इस्पितळच असें आहे ! आला रोगी कीं बरा झालाच पाहिजे !—ती पाहा ! ती बाजाची पेटी दुरुस्त करायला आणली, तेव्हां एक सूर धड असेल तर शपथ ! हाडेंन् हाडें खिळखिळीं झालीं होतीं ! पण तीच आतां ? अशी गोड गाते आहे कीं, ज्याचें नांव तें !—सांगतों ना ! एकदां जिथल्या तिथं ठाकठीक होऊन जेव्हां तिचे सूर निघायला लागले, तेव्हां किती मनस्वी आनंद झाला म्हणून सांगूं तुम्हांला !—मालक तर उड्या

मारायला लागला !—बरोबरच आहे ! करावयाचें कांहीं तर असेंच केलें पाहिजे ! नाहीं तर सांगा, जन्माला घातलें कशाला ?–असें हें सगळें मोडलेलें चालू करावयाचें, याचकरितां कीं नाहीं? अन् खरी मौज यांतच नाहीं का ?–तेव्हा एकंदर क्रमच असा आहे कीं, विघडलेलें म्हणून कांहीं राह्यचेंच नाहीं–हो मग ! शंका आहे काय !–तें जें प्रेत चाललें आहे, तेंसुद्धां पुन्हां धड व्हायलाच !–मला सांगा, आपण केलेलें कांहीं नादुरुस्त झालें, तर काय हव्वें तें करून, नीट करतोंच कीं नाहीं आपण ? –झालें तर ! हें जसें माणसाचें, तेंच आपल्या निर्माणकर्त्याचें ! तेंव्हां इथं आपल्या हृदयाचें ठोकें बंद पडले, तर काय विघडलें त्यांत ? पुन: कुठें तरी चालू होतातच ते !–आणि असें आहे, म्हणूनच आपण सगळे हे–हव्या तशा हालअपेष्टा सोसतों, जिवाचीं माणसें जातात–तेंही सोसतों, अन् सगळें हें नेटानें करीत राहतों !—हें काय उगीचच ?…"

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. ७०८२ दिनांक . . .
विषय . . . . क्र. . . . . . . . .

१२ जुलै, १९२४

## ४५. तेवढेंच ' ज्ञानप्रकाशां 'त !

पुन्हा मध्यंतरी दोन वर्षे एकाही ' छटे 'विना गेली.

त्यानंतरची ही ' छटा '. या कालात दिवाकरांनी ' भावकथा ' या साहित्यप्रकाराकडे आपले मन किंचित वळवले होते असे दिसते. पुढल्या पाच वर्षांत त्यांनी ( अहो, मला वाचता येतंय !, कमीचा मन्या, मसालेदार ताजा चिवडा, इ० ) एकूण पाच की दहा भावकथा लिहिल्या.

ही ' छटा ' पुन्हा ' क्षणचित्रा 'च्याच स्वरूपाची. परंतु फरक असा की, दिवाकरांच्या आधीच्या अनेक ' छटां 'प्रमाणे हिच्या शेपटात हिचा दणका आहे.

श्रीमती रमाबाई रानडे कालवश झाल्या त्यासंबंधात ही लिहिलेली आहे; पण या घटनेनंतर तब्बल दोन वर्षांनी लिहिली आहे. म्हणजेच रमाबाईंचे निधन हे हिचे खरे निमित्त नव्हतेच; तर ' ज्ञानप्रकाशा 'त प्रसिद्ध व्यक्तींच्या निधनानंतर मृताच्या अंत्यदर्शनास आलेल्या प्रतिष्ठित माणसांची—बहुंशी प्रोफेसरांची—एक यादी प्रसिद्ध होत असे. तीच या ' छटे 'चे खरे निमित्त असावी. रमाबाईंच्या स्तुतीच्या मुक्त हुलकावण्या दाखवीत दिवाकरांनी शेवटच्या दोन-तीन वाक्यांत मनचा हेतू कसा एखाद्या कुशल गोलंदाजाच्या फसव्या चेंडूसारखा ' छटे 'त झोकून दिला आहे आणि अचूक ' दांडी ' घेतली आहे ती पाहा.

तसेच मागल्या ' कारण चरित्र लिहायचे आहे ! ' या ' छटे 'तल्या बाळाभाऊच्या नालस्तीशी या ' छटे 'तल्या बाईच्या प्रशंसेची तपशीलवार तुलना करून पाहिली तर दिवाकरांचे संवादावाटे स्वभावरेखाटनाचे कसब समजून येईल.

"...हो, बरोबर, दोनदां आपल्याकडे येऊन गेलों मी. – नाहीं, काल नाहीं, संध्याकाळीं आलों होतों तें परवां आणि सकाळचें जें म्हणता, ती कालची गोष्ट. असो, गांठ पडली. चला. – हो, तेंच विचारणार होतों, कीं

शेजारीं एवढी गडबड कसली ? सारख्या मोटारी अन् गाड्या येताहेत ! बायकांची तर ही गर्दी लोटली आहे ! – केव्हां ? आतां मधाशीं सहाच्या सुमारास ? – नाहीं बोवा, तुम्हीं सांगेपर्यंत वार्तासुद्धां नव्हती याची मला ! आज बरेच दिवस आजारी आहेत, फारशा कुठें जात-येत नाहींत, येवढें ठाऊक होतें ! पण इतक्यांत असें कांहीं होईलसें...बाकी बऱ्याच थकल्या होत्या म्हणा !...साठ कां हो ! साठाच्या पलीकडे खास गेल्या होत्या !...असो. चला ! मोठी एक कर्तीसवर्ती बाई गेली ! पेशवाईनंतर महाराष्ट्रांत इतक्या योग्यतेची मला नाहीं वाटत दुसरी कोणीं असेलशी ! खरें आहे. अगदीं खरें आहे ! मनुष्य आपल्यामध्यें असतें, तोंपर्यंत आपल्याला त्याची कल्पना नसते ! – स्वभावानें ना ? वा ! फारच छान ! अतिशय मनमिळाऊ आणि शांत ! कटकट म्हणून नाहीं !—हळूहळू, थोडं थोडं, पण खरोखरच मोठं कार्य केलं ! अन् फारसा गाजावाजा न करतां ! – आधींच थोरामोठ्यांतली ती ! आणि रावसाहेबांचें वळण ! मग काय विचारतां ! – बोलणें काय, चालणें काय आणि – हो ! लिहिणें-सुद्धां – तेंच म्हणतों मी – कीं, ‘ आठवणी ’ कशा नमुनेदार लिहिल्या आहेत ! – मराठींत असें पुस्तक नाहीं आहे ! – तें काय विचारायला नको ! आज गर्दी म्हणजे – सगळा गांव लोटायचा आतां ! – मोटारी अन् गाड्यांचा चालला आहे धडाका ! – काय ! खूपच लोटली आहे हो ! दर्शनाकरतां दिवाणखान्यांतच ठेवलेलें दिसतें आहे त्यांना ! – चला येत असलांत तर...जाऊं म्हणतों ! इतकीं माणसें जात आहेत तेव्हां – हो गर्दी तर आहेच ! – राहूलं. तब्येत बरोबर नसली तर नाहीं गेलें ! मला तरी कुठें येवढें जावेंसें वाटतें म्हणा ! कारण आतां गेलं काय, अन् न गेलें काय सारखेंच ! पण बोवा ‘ अमूक एक फलाणे प्रोफेसरद्वय आले होते शेवटच्या दर्शनाला ’ ! तेवढेंच ‘ ज्ञानप्रकाशां ’त...’

१५ एप्रिल, १९२६

## ४६. काय! पेपर्स चोरीला गेले?

शिक्षक दिवाकरांचा मागल्या 'डायरेक्ट मेथड'च्या चालीवरचा आणखी एक अनुभव : पेपर्स तपासणे. हे मुळात रुक्ष आणि जिकिरीचे काम. होईल तितके शिक्षक हे लांबणीवर टाकतो आणि मग इतकी घाई होते की, वाटते, चोरीला जावेत हे—नाहीतर हरवावेत. असे घडले तर कसे होईल त्याचे हे खुशखुशीत, हृद्य क्षणचित्र.

माणसागणिक संवादाची धाटणी साफ बदलणाऱ्या कसबी दिवाकरांनी 'बस! आज मैं तो बादशहा हूँ!' हे चक्क हिंदी वाक्य एरवी अस्सल मराठी नाट्यछटेत कसे आणि कुठे वापरले आहे ते नीट पाहा. त्यामुळे साधणारा अप्रतिम परिणाम अजमावा. उत्कृष्ट संवादलेखनाची मख्खी शब्दाच्या, शब्दप्रयोगांच्या, वाक्यांच्या अशा अचूक योजनेत असते.

"...तर काय हो! जिवावर केवढी थोरली धोंड आहे माझ्या! एक नाहीं, दोन नाहीं, आठ तुकड्यांचे दणदणीत पेपर्स! शिवाय प्रत्येक तुकडींत चाळीस पंचेचाळीस कार्टी! रोज एक गठ्ठा म्हटला, तरी दिवस पाहिजेत आठ! अन् राहिलेत सारे चार!—तितकेहि नाहींत? अरे म्हणजे म्हणतां आहां काय तुम्ही! वेडबीड तर नाहीं लागलें!—एक-वीस तारीख आज?—छे:! भलतेंच कांहीं तरी! आणा पाहूं ती डायरी इकडे!—उगीच आपलें कांहीं तरी...अरे भाई, खरेंच कीं, हें तर वीस तारखेचें पान! धडधडीत मीं लिहिलें आहे—हो, हो, अगदीं शंकाच नको! बापरे! आज एकवीस तारीख, आणि उद्यांला तर हें खलास व्हायला हवें! राम राम! प्राण खातील माझा आतां! काय, करूं तरी काय आतां!—हो, रात्रीचे आतां आठ वाजलेले, अन् सकाळींच उद्यां आठाला सगळे हजर करायचे! तेव्हां काय जीव देऊं इथं?—बरं, आतां रातोरात

बसून तपाशीन म्हटलें तर पोरट्यांनीं थोडं का हो लिहिलं आहे !--आग लागो त्या पेपरांना ! नाहींसे कुठें होतील तर देव पावेल ! हो, आतां मी तरी...अरे कोण आहे तिकडे, काय बडबडतां आहां रे ? गोंगाट कसला येवढा ?–काय...काय...म्हणतोस विष्ण्या ? अरे ! काय सांगतो आहेस तरी काय ! पेपर्स चोरीस गेले ? चल ! कांहीं तरी बरळतो आहेस झालें ! गाढवा ! पेपर्स का कधीं चोरीस गेले आहेत ?–थांब, मीच उठून... माय गॉड ! खरेंच कीं ! पार सगळेच्या सगळे गड्डे...वा, वा ! फारच छान झालं ! पेपर्स चोरीस गेले ! बस, बस ! केवढा आनंद...काय आनंद झाला आहे म्हणून सांगूं ! जा जा, पळ लवकर ! आधीं चहा ठेवायला सांग !–आणि हें बघ विष्ण्या ! साखर थोडी जादा ढकलायला सांग ! बस ! आज मैं तो बादशाहा हूँ !–अरे ! काय मांडलें आहेत काय तुम्हीं ! इतक्या लवकर चहा आणलास ?–आधींच ठेवला होता होय ? शाबास ! हुशार आहांत रे सगळे तुम्ही ! पण काय रे ! हें सगळें स्वप्न तर नाहीं ना ? नाहीं तर....हो बाकी लागतो आहे खराच....हाताला चांगलाच पेला कढत लागतो आहे ! आणि वास तर काय झकास सुटला आहे ! रंगसुद्धां खुलून आला आहे कीं !–थांब बेटा विष्णु ! मला एकदां चांगला मनापासून... अस्सा अगदीं हात पाय ताणून आ....आळस— अरे ! कां....काय रे हें ! अरे माझ्या टाळक्यांत काय पडलें हें !—हर हर ! हे तर पेपर्स ! आणि मघांशीं चोरीस गेले ते ?—स्वप्नांतच का ?...."

३ फेब्रुवारी, १९२८

## ४७. हें काय सांगायला हवें !

परीक्षक दिवाकरांनीच नेमक्या शब्दांत रंगविलेले हे आणखी एक ' क्षणचित्र ' अमकातमका परीक्षक नेमला आहे एवढे कळताच एका पोराला पास करण्याकरिता वशिला लावायला कोणी सोमाजी गोमाजी येतो आणि मग प्रौढीने ढेपाळलेला अमकातमका त्यावर काय काय प्रतिक्रिया कसकशा देतो त्याची ही प्रत्ययकारी चुणूक. माणसाच्या स्वभावाचे नमुने अचूक हेरून नाटकात रंगविण्यावद्दल शेक्सपीअरचा हातखंडा होता असे मानतात. दिवाकरांकडेही हा गुण वराच मोठ्या प्रमाणावर होता. मागल्या ' छटे 'तल्या प्रारंभी उल्लेखिलेल्या एका-वाक्यासारखेच या ' छटे 'तले " हॅ! हा!" हे हसणे कसे नेमकी व्यक्ती आपल्यापुढे उभी करते ते पाहा. ' फादर लगबगमन 'सारखे एखादे नाव ' छटे 'तला उपरोध कसा पेलून राहते तेही पाहा. कमीत कमी शब्द हे दिवाकरांच्या ' छटे 'चे एक बंधन होतेच; परंतु आशयाकडे एका निश्चित पद्धतीने सतत आणि अचूक धावणारे शब्द हा असाच दुसरा महत्त्वाचा विशेष होता.

कमीत कमी शब्दांच्या साहित्य-कृतीत वदसूर शब्द किती खटकेल याचे प्रत्यंतर हवे असेल तर एखादा मूळ शब्द उचलून तिथे दुसरा शब्द वापरून पाहावा.

....हां, आतां बरोबर ! वरचेच तुमच्या वातमीदार ! तेव्हां इतक्यांत तुम्हांला कळलें हें ठीकच ! – छे ! मला अजून वार्तासुद्धा नाहीं ! आपली कुणकुण लागली आहे इतकेंच ! – बाकी आहे काय त्यांत म्हणा ! कळेल आज नाहीं उद्यां !—कां ऽऽ हीं खटपट नाहीं अन् कांहीं नाहीं ! पत्रंहि कोणाला घातलीं नाहींत, किंवा कोणाकडे जोडेही फाडले नाहींत ! – अन् अर्ज तरी काय, खरडायचा म्हणून खरडला इतकेंच ! वांकड्यांत असा शिरलोंच नाहीं ! म्हटलें काय होईल तें आपलें सरळ !—नेहमींचेंच माझें आहे हें ! काम मनापासून करायचें, अन् चोखपणानें वागायचें !

ह्यात कशाला इतर खटपटी आणि लटपटी ! — आतां तुम्ही म्हणाल कीं, हें जमलें कसें ? अहो ! तेंच तर मोठें आश्चर्य आहे ! अर्ज जेव्हा म्हणतात माझा दृष्टीस पडला तेव्हां...आपले लोक बाजूला राहिले, पण एका युरोपियननें म्हणे हट्टच धरला कीं, ‘ अमुक एक गृहस्थ माझ्या जोडीला परीक्षक असतील, तरच मीही परीक्षक होईन ! नाहींतर साफ जरूर नाहीं मला युनिव्हर्सिटीची ! ’—तेव्हां बोला आतां ! फादर लगबगमननेंच असें म्हटल्यावर...अन् तें म्हणजे बडें प्रस्थ !... कोण पुढें काय बोलणार ? मुकाट्यानें सगळे कबूल !—छेः ! ओळख ना देख ! काळा का गोरा त्यानें अजून पाहिलंसुद्धा नाहीं मला ! कुठं कांहीं लिहितोंसवरतों, तें त्यानें मला वाटतें वाचलेलें ! तेवढ्यावरून हें सगळें, बाकी खटपटीचें म्हणून नांव नाहीं !—हॉ ! हॉ ! कसें बोललात ! सरळ आपलें काम करीत असावें, पारख करणारा, आज ना उद्यां, भेटतो कोणी तरी जगांत ? – ब...रें ! कांहीं नवल विशेष ? – कुशाभाऊ जोशी; कोण बुवा हा ? – ओ ! आय सी ! आपल्या तो...नागुअण्णाच्या...बायडीचा कुशा ? तो का बसणार आहे आमच्या परीक्षेला ? – काय इतका मोठा झाला आहे ! अहो, परवां ना त्याला पाहिला आपण ? धड नाकसुद्धां पुसतां येत नव्हतें ! आणि तो आतां कॉलेजांत का आला आहे – काय ! दिवस कसे हां हां म्हणतां जातात पाहा ! – हो, तेंहि खरेंच आहे ! प्रकृतीमुळेंच जे नागुअण्णा कोल्हापूरला गेले, ते तेहि तिकडेच, आणि कुशाहि तिकडेच ! तेव्हां काय मध्यंतरीं दिसायचें कारण ? बरें कामाशिवाय आम्ही थोडेच कुठें हालतों आहों ! आपलं पुणें, नाहीं तर मुंबई ! बाकी म्हणून....बरें आहे. येऊं आतां ? – वा, वा ! भलतेंच ! त्याची नको काळजी ! कसें झालें तरी आपल्या बायडीचा कुशा ! तेव्हां हें काय सांगायला हवें ? हळूच केव्हां तरी बरं का ? – हळूच केव्हां तरी नंबर वगैरे...”

१९ मार्च, १९२८

## ४८. सायकॉलॉजिकली !

आज या शब्दाचा वापर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात एवढा वाढला आहे की, तो लक्षात घेतला, त्याचा बरेचदा मतलबी वापर ध्यानात घेतला तर या ‘ छटे ’ची लज्जत अधिक मिळेल.

दिवाकरांच्या अनेक चांगल्या ‘ छटां ’त आरंभापासून बांधणी एवढी चिरेबंदी असते की, सैलपणा कसा तो सापडत नाही. इथे आरंभी किंचित सैलच आहे. ‘ छटे ’च्या आशयापेक्षा त्याचा संबंध वातावरणाशी आहे. तसा तो सैल ठेवून प्रतिष्ठित बुद्धिजीवी माणसाच्या घरच्या सुट्टीच्या दिवसाचे वातावरण दिवाकरांनी थोडया शब्दांत चांगले निर्माण केले आहे. पुढचे ‘ सायकॉलॉजी ’चे प्रकरण सारे बिनबुडाचे—आणि मतलबीही–आहे. तसाच अखेरचा टॉलस्टॉय आणि टागोरांचा उल्लेख.

“....थांब, ये नारू ! – अरे, आधीं नीट ऐकून घेतलेंस का काय काय आणायचें तें ? – हां बरोबर, पानाच्या तीन पट्टया आणि एक सिगरेटस्‌ची पेटी ! – पण ती कोणती ठाऊक आहे का ? – सीझर्स ! कैंची छाप ! भलतीसलती उगीच आणूं नकोस ! – चल आटप, ठोक धूम लवकर ! सगळे आम्ही इथें वाट पाहात आहोंत ! – छे बोवा ! काय तुम्ही मघांपासून उगीच पिरपिर लावली आहेत हो ? – तुम्हांलाच तेवढी घाई अन् आम्ही काय इथें राहाला आलों आहोंत ? अनायासें सुट्टी मिळाली आहे, बसूं थोडा वेळ आणखी ! समजलें हो ! कामं...काम...काय कामाचें सांगतां येवढें ? येऊन जाऊन स्नान करून जेवायचें, अन् खुशाल आढ्याला पाय लावून ताणून द्यायची, हेंच कीं नाहीं ? सत्तेची येवढी बायको असल्यावर मग हो कां इतकी घाई ? – असें ! हें नव्हतें मला ठाऊक ! तुमची आमची विशेष ओळखहि नुकतीच झालेली ! त्यामुळें....

कधींची बरें गोष्ट ही ?—म्हणजे जवळ जवळ चार वर्षें झालीं म्हणानात ! —ब....रं ! फिरून कांहीं मग ?—ना....हीं ! ! अरे, म्हणजे सांगतां आहां काय तुम्ही ! खरेंच का ?—मग मोठें विलक्षण आहे बोवा ! बायको जाऊन चार वर्षें झालीं आणि अजून लग्न नाहीं म्हणतां ?—हे: स्टुपिड !—रागावूं नका तुम्ही ! पण खरें सांगायचें म्हणजे...साफ इथें चुकतां आहां तुम्ही ! यावरून होतें काय ठाऊक आहे का ?—अहो, बायकोवर तुमचें प्रेम नाहीं हें उघड उघड दिसतें ! —भलतेंच एखादें ! —असें आहे त्याचें...इतकें कशाला प्रत्यक्ष माझेंच घ्या ना ! पहिली बायको माझी मेली, तेव्हां लगेच दुसरी केली ! म्हणजे झालें काय ?—पहिलीवर झालें माझें दुप्पट प्रेम ! पुढें दुसरी गेल्यावर तिसरी ! त्यामुळें... लक्षांत आलें का काय झालें तें ?...पहिलीवर माझे झालें तिप्पट, दुसरीवर दुप्पट अन् तिसरीवर एकपट, म्हणजे सर्वांत कमी प्रेम तिच्यावर ! असें मोठें हें ...'सायकॉलॉजिकली'—म्हणजे मानसशास्त्रदृष्ट्या...बरें का ? —मानसशास्त्रदृष्ट्या हें मोठें विचित्र त्रांगडें आहे ! —भले महाराज ! टॉलस्टॉय आणि टागोर वाचून हेंच का शेवटीं सार काढलेंत ?..."

१६ मे, १९२८

## ४९. त्यांत रे काय ऐकायचंय् !

आणखी एकवार दिवकरांचे लक्ष्य : पालक. त्यातही सुखवस्तू पालक. एकीकडे शाळेतल्या बेशिस्तीबद्दल तक्रारी करणारे आणि त्याच वेळी शिस्तपालनापासून पोटच्या पोराला बाजूला खेचणारे. आरंभ पाहा : " पेट्रोल वगैरे आहे ना रे भरपूर ?" या वाक्याने व्यक्तिरेखा निमिषार्धात निश्चित होते. मागल्या ' हें काय सांगायला हवें ' मधले ' हॉ ! हॉ !' आणि या ' छटे 'तले ' हॅः !' यातला फरक नेमका जाणून त्या अनुषंगाने व्यक्तिरेखांचा मागोवा घेतला तर कशी अचूक उत्तरे मिळतात पाहा. भोवतालच्या जगातला असा वैशिष्ट्यपूर्ण, बारीक बारीक तपशील अखंड टिपून घेत राहणे आणि नेमका वापरणे हे थोर ललितलेखकाचे लक्षण.

" ....पेट्रोल वगैरे आहे ना रे भरपूर ? – ठीक आहे ! तबेल्यातून आणलीस कीं निघालोंच आम्ही ! – छे हो ! नाहीं जमलें बोवा आज सकाळीं फिरायला जायचं ! सगळा वेळ त्या बक्षीससमारंभांत मोडला ! आठ वाजल्यापासून जें सुरू झालं, तें दहा साडेदहापर्यंत चाललं होतं आपलं ! अस्सा कंटाळा आला होता कीं, ज्याचं नांव तें ! – नकोसं झालं होतं अगदीं ! बरं, मधेच उठून येईन म्हटलं, तर तिकडूनहि पंचाईत ! कारण समारंभाची मुख्य देवता...अध्यक्षच पडलों आम्ही, तेव्हां थोडंच कुठं हालतां येतं आहे ? – हें म्हणा रे, तें म्हणा रे, स...गळं कांहीं होईपर्यंत मग – शीः कसली व्यवस्था अन् काय !...चाललं होतं आपलं कसं तरी ! – अहो, मुळीं हेडमास्तरनाच कुणी विचारीना, तिथं कोण जुमानतो अध्यक्षाला अन् फध्यक्षाला ! मारे जोरजोरानं ओरडून विचारा सांगत होता कीं, ' हें पाहा ! हे जे आपले आजचे सन्माननीय पाहुणे आहेत कीं नाहीं, ते या शाळेचे माजी विद्यार्थी आहेत ! फार त्यांना शाळेचा

अभिमान आहे!' – झा...लं! असं म्हणतांच, जो कांहीं टाळ्यांचा, अन् बाकांवर हातपाय आपटण्याचा धडाका सुरू झाला, तो कांहीं....राम राम! – पुसूं नका! म्हटलं आतां शाळा पडते कीं काय होतंय तरी काय! पुढं हीच रड आमच्याहि भाषणाच्या वेळीं! – अहो, कारटीं आवरतां आवरेनात! हा उठतो आहे, तो ओरडतो आहे, गोंधळ इथून तिथून! अन् जरा कांहीं झालं कीं नाहीं, कीं टाळ्या अन् दणदण हातपाय आपटायचे! – काय हें! छे बोवा! आपल्या वेळेला होतं कांहीं असं? – हॅ: ! तऱ्हाच कांहीं वेगळी आजची! काय पोरं, अन् काय मास्तर! वा रे वा!! – जाऊं द्या झालं! सगळी जिथं घाण....रॉटन झालं आहे, तिथं काय आपण तरी – चला! आली मोटार वाटतं दाराशीं – पण हे ....चिरंजीव कुणीकडे निघाले आहेत आमचे? फिरायला न्यायचं म्हणतों मी त्याला! – अप्पू, ए अप्पा! कोणीकडे निघाला आहेस? ग्राउंडांत – काय असतं रे रोज उठून तिथें? चल आज बरोबर फिरायला! – पुरे रे बोवा! असेल बोलावलं मास्तरांनीं! – आहे ठाऊक किती ऐकतां तुम्ही तें! – हॅत्तेच्या! येवढंच ना? म....ग रे काय! चल ये बैस लवकर! भिकार स्काउटिंग तें काय! अन् त्यांत रे काय ऐकायचं येवढं त्यांचं!...''

२६ डिसेंबर, १९२९

## ५०. बोलावणं आल्याशिवाय नाहीं !

' पण वॅट नाहीं ' या मागल्या ' छटे 'च्या वळणाची आणि तोडीची ही आणखी एक उत्तम ' छटा '. शालेय जगातल्या नटश्रेष्ठावर हिचा रोख आहे. एकीकडे नाटकातल्या कामाबद्दल पदके मिळवीत, एकेका इयत्तेत तो तीन तीन वर्षे देखील काढतो आणि आता ' बोलावणे ' येत नाही म्हणून तो आखडून बसला आहे.

शाळा-कॉलेजातल्या नाट्यजगतात या व्यक्ती नेहमीच पाहायला मिळणाऱ्या आणि यांचे प्रातिनिधिक आणि खुमासदार चित्र दिवाकरांनी या ' छटे 'त रेखाटले आहे. म्हणूनच ही ' छटा ' केव्हाही टिकणारी आणि आनंद देणारी आहे. ' अबे जा रे ', ' फासकीफुसकी नोटीस ', ' मास्तरचा जर एवढा ऐटा आहे ' असले काही शब्दप्रयोग, शब्द अभ्यासण्याजोगे आहेत. ' मास्तरांचाच जर इतका तोरा आहे, तर साफ यायचा नाही मी बोलावणं आल्याशिवाय '...या अखेरच्या वाक्यातील गंमत जरा उकलून पाहा. अशी सहजसुंदर आणि आशयपूर्ण वाक्ये हा नाट्यछटेचा प्राण.

"....सांगू तरी आतां किती जणांना ? येतो तो हेंच विचारतो ! असतील ! चार नाहीं छप्पन्न नोटिसा निघाल्या असतील ! करायचंय काय मला त्यांच्याशीं ! जायचं असेल, त्यांनीं जावं खुशाल ! मी थोडाच जातोंय् तसा ! — अरे राह्यलं ! नाहीं, तर नाहीं ! इथं थोडंच माझं कांहीं अडलं आहे ! हपापलेलीं चार खतरुड पोरं गोळा करा, आणि हव्वं तें करा म्हणावं ! — नाहीं सगळ्या गॅदरिंगच्या नाटकाचा बट्ट्याबोळ झाला, तर नांव कशाला ! — अबे जा रे ! मोठा शाळेचा मला अभिमान सांगतो आहे ! आम्हांला तेवढा अभिमान असावा ! आणि शाळेला ? तिनं हवं तसं आम्हांला लाथाडावं होय ? — अलबत् ! नाहींच भागायचं नुसत्या

नोटिशीनं ! कांही थोडींथोडकीं वर्षं नाहीं कामं केलेलीं मीं ! अन् तींहि पुनः अशीं तशीं ? – चौथींत आल्याबरोबर घडाक्याला कॅन्यूटचं काम ! सारख्या टाळ्या ! तीच तऱ्हा दुसऱ्या वर्षीं ! पुढें पांचवींत येतांच... अश्वत्थाम्याचं काम ! जो कांहीं त्यांत माझा आवाज लागला, तसा अद्याप एकाचाहि कोणाचा लागला असेल तर शपथ ! – दोन रे का ? पांचवींत तर ओळीनें तीन वर्षं कामं केलीं मीं ! अन् सहावींतलीं दोन ठाऊकच आहेत तुम्हांला ! – नाहीं, संभाजीचं काम तें दुसऱ्या वर्षीं ! वा ! त्या वर्षीं तर किती जणांनीं आंत येऊन सांगितलं कीं, धंदेवाल्यापेक्षांहि तुझं काम छान झालं !' – अरे त्या वर्षीं तर स्पेशल पदक मिळालं मला ! – तेंच पुनः सातवींत आल्यावर ! पहिलंच अगदीं सीझरचं काम ! दुसऱ्याला चांगलं दिलेलं....पण त्याचं काढून मुद्दाम मला दिलं ! नाटक पाहयला कोणी युरोपियन आला होता, त्यानं काम पाहून....विशेषतः ॲक्सेंट्स् ऐकून...तोंडांत बोट घातलं म्हणतात ! – पुढं दुसऱ्या वर्षीं ? – हां बरोबर ! धुंडिराजाचं काम ! – तेव्हां तर काय....हंसतां हंसतां पुरेवाट झाली लोकांची ! अन् सगळ्यांत बाबा कळस झाला गेल्या वर्षीं ! – शॉयलॉकचं काम ! – पाहून लोक इतके चिडले कीं, एकानं तर चक-चकीत धोंडा मारला स्टेजवर ! – तेव्हां बोला आतां ! इतका जिथं माझा अनुभव...आणि दर्जा वाढलेला, तिथं असल्या फासक्याफुसक्या नोटिशीनं जायचं ! – साफ नाहीं यायचा तसा मी ! मास्तरचा जर एवढा ऐटा आहे....सांगितलं ना ! मास्तरांचाच जर इतका तोरा आहे, तर साफ यायचा नाहीं मी बोलावणं आल्याशिवाय..."

३१ डिसेंबर, १९२९

# यांतहि नाहीं निदान—?

नाट्यछटाकार दिवाकरांची शेवटची नाट्यछटा.

त्यांच्या या नाट्यछटेत एकूण तीन मृत्यू आणि दोनतीन अपघात आहेत. खोटे वाटावे अशा तऱ्हेने एका मर्यादित कालखंडात एकाच माणसावर या सर्व आपत्ती कोसळल्या आहेत. चाचणी परीक्षेला पुरेशा गुणाअभावी आपल्याला नाकारण्यात आलेला फॉर्म आपल्याला मिळावा म्हणून तो हेडमास्तराकडे खटपट करतो आहे आणि या आपत्ती हेच त्याचे मुख्य भांडवल आहे. दुय्यम भांडवल : बोलण्याची शैली. तो काय आणि कसे बोलतो आहे ते नीट पहा. शेवटचा त्याचा :' फॉर्म मिळाला तर पास होऊ ' हा विश्वास कुठल्या युक्तिवादावर आधारलेला आहे तोही पाहा.

" ...यंदां नाहीं म्हणजे मग कायमचेंच नाहीं ! कारण कांहीं जमण्यासारखे असलें, तर तें याच वर्षी. नाहीं तर....हो, तें खरें ! नाहीं म्हणतों आहें कुठें मी ! मार्क कमी पडले आहेत, दोन तीन विषयांत नापास झालों आहे, सर्व कांहीं कबूल आहे. पण...मी तरी काय बरं करणार ? गेल्या सबंध वर्षांत कोण माझी ओढाताण आणि दुर्दशा झाली म्हणून सांगूं ! – वडलांचा तर पत्ताच नाहीं ! – कोणास ठाऊक कुठें गेले आहेत ते ! रात्रीं एक दिवस घरांतून नाहींसे झाले – अहो छे ! कांहीं भांडण नाहीं अन् कांहीं नाहीं ! दैव ओढवलें इतकेंच ! – झालें ! वडलांच्या शोधांत कुठें आहोंत न आहोंत तों एक दिवस सकाळीं आपली मेहुणा गेल्याची बातमी ! भोराहून इकडे पुण्याला येत होते, तों गाडीवानाला म्हणतात रस्ता नीट दिसला नाहीं, अन् जी गाडी भलतीकडे उताराला लागली, ती उपडी होऊन, पार कोणीकडच्या कोणीकडे फेकली गेली ! गाडीवाला

काय तो कसावसा जिवंत निघाला, बाकी सगळीं माणसें...माझा मेहुणा त्याचा एकुलता एक बरोबरीचा मुलगा, सर्व कांहीं निकाल! बहीण इकडे आजारी म्हणून हवा पालटायला आलेली, कळतांच जी तिची वाचा बसली, तो अद्यापपर्यंत एक शब्द नाहीं! विचारलेंच कोणीं कांहीं, तर तोंडाकडे पाहते आणि रडूं लागते घळघळां—आहे! आई आहे घरांत! पण ती तरी काय करते बिचारी! धीर तरी तिनें कोठवर द्यायचा?—बरं वडलांच्या आणि मेव्हण्यांच्या या प्रसंगांतून आम्ही कुठें हातपाय हालवतों आहोंत तों....महिनापंधरा दिवसांचीच गोष्ट! काय बाबाला बुद्धि झाली कुणास ठाऊक! बंधुराज आमचे सहज कोणाबरोबर तरी पोहायला म्हणून गेले, तेहि...तिकडे कायमचेच!—घरांत मिळवता... आधार असा तोच काय तो उरलेला! पण तोहि असा....तेव्हां कशाची प्रिलिमिनरी, अन् कसला अभ्यास होतो नीट? त्यांतूनही करायची तेवढी धडपड केली मीं! आणि याहिपुढें...येवढें सांगतों मी आपल्याला कीं, जर मिळाला फॉर्म, तर तो....वाया नाहीं जायचा! कारण...काय असेल तें असो! सारखें मला आपलें वाटतें आहे येवढें खरें! कीं सगळीकडून असें...इथें नाहीं, तिथें नाहीं, चोहोंकडूनच जर असें अपयश, तर....मी म्हणतों...देव यांतहि नाहीं निदान मला?..."

२७ ऑक्टोबर १९३०

दिवाकरांच्या काही नाट्यछटा, लिहिल्यापासून तेरा तेरा वर्षे त्यांच्या दप्तरी पडलेल्या राहिल्या होत्या. परंतु आता जवळजवळ साऱ्या नाट्य-छटांना प्रसिद्धी मिळून या साहित्य-प्रकाराचा आणि दिवाकरांचा बोल-बालाही महाराष्ट्रात झालेला होता. साऱ्या नाट्यछटांचे मिळून एक पुस्तक काढावे ही कल्पना दिवाकरांच्या मनात घोळत होती; त्या दृष्टीने ‘ छटा ’ दुरुस्त करण्याचे, त्यांच्या नकला काढण्याचे कामही त्यांनी सुरू केलेले होते. चारदोन वर्षांत शिक्षकाचा व्यवसाय मानाने मागचा सुटणार होता आणि मग खूप भरीव, अगदी मनाजोगते काही निर्बंधपणे लिहिण्याचा विचार ठरला होता. त्यामुळेच की काय, दिवाकरांची वृत्ती आनंदी बनली होती.

आणि १ ऑक्टोबर १९३१ रोजी एन्फ्लुएंझा हे निमित्त होऊन दिवाकर कालवश झाले.

वा. क्र. ५०८२
विषय ....

कॉन्टिनेन्टल

## काही नवीन प्रकाशने

### नाटक

| | |
|---|---|
| घरोघरी हीच बोंब | वसंत सबनीस |
| मृत्युंजय | शिवाजी सावंत |
| अरे अश्वत्थामा | श्रीनिवास भणगे |
| मरणगंध | वा. रा. कांत |

### कथा

| | |
|---|---|
| रमलखुणा | जी. ए. कुलकर्णी |
| अनवांछित् | अरविंद गोखले |
| सहा कथाकार | सं. भालचंद्र फडके |

### कादंबरी

| | |
|---|---|
| शहेनशहा | ना. सं. इनामदार |
| पद्माराजे | तारा शास्त्री |
| बेघर | शांता निसळ |

### ललित लेख

| | |
|---|---|
| माझे पण विश्व | दीपा गोवारीकर |
| छायावन | केशव मेश्राम |